अध्याय चवदावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो स्वामी सद्गुरू । तूं निजांगें क्षीरसागरू । तुझा उगवल्या प्रबोधचंद्रू । आल्हादकरू जीवासी ॥ १ ॥ ज्या चंद्राचे चंद्रकरीं । निबिड अज्ञान अंधारीं । त्रिविध ताप दूर करी । हृदयचिदंबरीं उगवोनी ॥ २ ॥ ज्या चंद्राचे चंद्रकिरण । आर्तचकोरांलागीं जाण । स्वानन्दचंद्रामृतें स्रवोन । स्वभावें पूर्ण करिताती ॥ ३ ॥ अविद्याअंधारीं अंध बंधें । संकोचलीं जीवदेहकुमुदें । तीं ज्याचेनि किरणप्रबोधें । अतिस्वानंदें विकासलीं ॥ ४ ॥ जो चंद्र देखतांचि दिठीं । सुख होय जीवाच्या पोटीं । अहंसोमकांत खोटी । उठाउठी विरवितू ॥ ५ ॥ पूर्णिमा पूर्णत्वें पूर्ण वाढे । देखोनि क्षीराब्धी भरतें गाढें । गुरुआज्ञामर्यादा न मोडे । स्वानन्द चढे अद्वयें ॥ ६ ॥ सद्गुरु क्षीराब्धी अतिगहन । सादरें करितां निरीक्षण । वेदांतलहरीमाजीं जाण । शब्दचिद्रत्नें भासती ॥ ७ ॥ तेथ विश्वासाचा गिरिवर । वैराग्यवासुकी रविदोर । निजधैर्याचे सुरासुर । मथनतत्पर समसाम्यें ॥ ८ ॥ मथनीं प्रथम खळखळाटीं । लयविक्षेप हाळाहळ उठी । तें विवेकनीळकंठें कंठीं । निजात्मदृष्टीं गिळिलें ॥ ९ ॥ मग अभ्यास प्रत्यगावृत्ती । क्रियेसी झाली विश्रांती । प्रकटली रमा निजशांती । जीस श्रीपती वश्य झाला ॥ १० ॥ तेथ ब्रह्मरस आणि भ्रमरस । ईहीं युक्त अमृतकलश । मथनीं निघाला सावकाश । ज्याचा अभिलाष सुरसुरां ॥ ११ ॥ ते विभागावयालागुनी । माधवचि झाला मोहिनी । अहंराहूचें शिर

ॐकाररूप सद्गुरुस्वामीस नमस्कार असो. तूं स्वतःच क्षीरसागर आहेस. तुझ्या ज्ञानरूपी चंद्राचा उदय जीवांना आनंद देणारा आहे. १ ज्या चंद्राचे ज्ञानकिरण हृदयरूपी चिदाकाशांत प्रकाश पाडून अज्ञानरूपी घोर अंधार घालवितात व देहबुद्धीमुळें उत्पन्न होणारे देहाचे त्रिविध ताप नाहींसे करितात; २ ज्या चंद्राचे किरण स्वानंदरूपी अमृताचा वर्षाव करून चकोररूपी आर्त जीवांना स्वभावतःच तृप्त करितात; ३ अविद्यारूपी अंधारा-मुळें देहयुक्त जीवकमलें मिटलीं होतीं, तीं ज्याच्या ज्ञानकिरणांनीं प्रफुल्लित झालीं. (जीव पूर्ण व्यापक असून अविद्ये-मुळें त्याची व्यापक दृष्टि संकुचित होते व देहालाच 'मी' म्हणूं लागतो. पण अखंड स्वरूपाकार वृत्तीच्या योगानें ती पुनः विकास पावते.) ४ तो चंद्र दृष्टीस पडतांच जीवांचें अंतःकरण आनंदानें उचंबळतें व तो अहंकाररूपी चंद्रकांत मण्याला जागच्याजागीं विरवून टाकितो. ५ आपल्या पुत्राची म्ह० चंद्राची पौर्णिमेच्या पूर्णत्वानें पूर्ण वृद्धि झालेली पाहून समुद्राला जोराची भरती येते (आपला शिष्य ज्ञानानें पूर्णत्वाला पोंचलेला पाहून सद्गुरूला तसेंच आनंदाचें भरतें येतें.) गुरुगौरवाच्या मर्यादेचें उल्लंघन करितां येत नाहीं. अद्वयानुभवामुळें स्वानंद वाढतच असतो. ६ सद्-गुरुरूपी सागर अत्यंत खोल आहे. त्याचें लक्षपूर्वक निरीक्षण केलें, तेव्हां वेदान्तरूपी लहरीमध्यें शब्दरूपी ज्ञानरत्नें आढळलीं. ७ विश्वासरूपी मंदराचलाची रवी करून वैराग्यरूपी वासुकीच्या दोरीनें धैर्यरूपी देव-दानव समत्वानें मंथन करण्यास तत्पर झाले. ८ त्या मंथनाच्या खळखळाटांत आरंभालाच लय, विक्षेप इत्यादि हलाहल विष बाहेर आलें. तेव्हां विवेकरूपी नीलकंठानें तें विष आत्मदृष्टीनेंच गिळून टाकिलें ९ व पुनः मंथन चालविलें. शेवटीं ती क्रिया विराम पावून शांतिरूप लक्ष्मी त्यांतून प्रकट झाली व तिला श्रीपति वश झाला. (लय व विक्षेप विवेकानें नाहींसे झाल्यावर 'सोहं' वृत्तीचा अभ्यास करीत असतां ती क्रिया थांबून शेवटीं शांति प्रकट होते व त्यायोगें परमात्म्याची प्राप्ति होते.) १० त्या मंथनांतून देव आणि दानव यांना अभीष्ट असलेले ब्रह्मरस व भ्रमरस यांनीं भरलेले अमृतकलश निघाले. ११ तें अमृत वाटून देण्यासाठीं भगवानांनीं स्वतःच मोहिनीचें रूप धारण केलें व 'अहं' या राहूचा शिरच्छेद करून देवांना अमृतप्राशनानें तृप्त केलें. (ऋद्धि-सिद्धीचा संभ्रम हाच भ्रमरस

छेदूनी । अमृतपानी निववीले ॥ १२ ॥ ते वृत्तिरूप मोहिनी । पालटली तत्क्षणीं । ठेली नारायण होउनी । पहिलेपणीं उठेना ॥ १३ ॥ ते क्षीरसागरीं नारायण । समाधि शेषशयनीं आपण । सुखें सुखावला जाण । अद्यापि शयन केलें असे ॥ १४ ॥ ऐसा सद्गुरु चित्सागरू । ज्याचा वेदांसी न कळे पारू । नारायणादि नानावतारू । ज्याचेन साचारू उपजती ॥ १५ ॥ ज्याचीं चिद्रत्नें गोमटीं । हरिहरांचे कंठीं मुकुटीं । बाणलीं शोभती वेदपाठीं । कविवरिष्ठीं वानिलीं ॥ १६ ॥ ऐशिया जी अतिगंभीरा । जनार्दना सुखसागरा । अनंतरूपा अपारा । तुझ्या परपारा कोण जाणे ॥ १७ ॥ विवेकें न देखवे दिठीं । वेदां न बोलवे गोठी । तेथ हे माझी मराठी । कोणें परिपाटीं सरेल ॥ १८ ॥ हो कां राजचक्रवर्तीचे माथां । कोणासी न बैसवे सर्वथा । तेथ माशी जाऊनि बैसतां । दुर्गमता तंव नाहीं ॥ १९ ॥ कां राजपत्नीचे स्तन । देखावया शके कोण । परी निजपुत्र तेथें जाण । बळें स्तनपान करीतसे ॥ २० ॥ तेवीं माझी हे मराठी । जनार्दनकृपापरिपाटीं । निःशब्दाच्या सांगे गोठी । चिन्मात्रीं मिठी घालूनी ॥ २१ ॥ असो आकाश घटा सबाह्य आंतू । तेवीं शब्दामाजीं निःशब्दवस्तू । रिता बोल रिघावया प्रांतू । उरला प्रस्तुतू दिसेना ॥ २२ ॥ बाळक बोलों नेणे तत्त्वतां । त्यासी बोलिके बोल बोलवी पिता । तैसीच हेही जाणावी कथा । वाचेचा वक्ता जनार्दन ॥ २३ ॥ त्या जनार्दनाचे कृपादृष्टीं । भागवत सांगों मराठिये गोष्टी । जें कां आलोडितां ग्रंथकोटी । अर्थी दृष्टी पडेना ॥ २४ ॥ तेंचि श्रीमहाभागवत । जनार्दनकृपें येथ । देशभाषा हंसगीत । ज्ञान सुनिश्चित सांगीतलें ॥ २५ ॥ सद्भावें करितां माझी भक्ती । तेणें ज्ञानखड्गाची होय प्राप्ती । छेदोनि संसारआसक्ती । सायुज्यमुक्ती मद्भक्तां ॥ २६ ॥ माझेनि भजनें मोक्ष पावे । ऐसें बोलिलें जें देवें । तें आइकोनियां उद्धवें । विचारु जीवें आदरिला

आसुरी प्रकृतीच्या असुरांना म्हणजे अभक्तांना दिला व दैवीप्रकृतीच्या भक्तांना भगवानांनीं ब्रह्मरस अर्पण केला.)॥ १२ नंतर त्या वृत्तिरूपी मोहिनीनें आपलें रूप पालटून तो नारायण होऊन राहिला. त्याच्या देहात्मबुद्धीनें पुनः उचल खाल्ली नाहीं. १३ त्या हृदयरूपी क्षीरसागरांत शेषावर पडून त्यानें समाधि लावली व तेथेंच तो अद्यापि चिदानंदाच्या सुखानें निजलेला आहे. १४ असा जो ज्ञानसागर सद्गुरु त्याचा वेदांनाहि अंत लागत नाहीं. नारायणादि अनेक अवतार याच्याच योगानें होतात. १५ त्याचीं ज्ञानरूपी अमूल्य रत्नें हरि व हर या दोघांच्याहि गळ्यांत व मस्तकावरील मुकुटांत शोभत आहेत. त्याचें वर्णन वेद व श्रेष्ठ कवि यांनींहि केलें आहे. १६ हे जनार्दना ! असा तूं सौख्यसागर असून अत्यंत खोल आहेस. तुझें रूप अनंत व अपार आहे. तुझा थांग कोणाला लागणार ! १७ विवेकाला जें स्वरूप दृष्टीनें पहावत नाहीं, वेदांना ज्याचें वर्णन करवत नाहीं, तेथें माझी ही मराठी भाषा कशी पुरी पडणार ! १८ अहोपण, सार्वभौमराजाच्या मस्तकावर इतर कोणाला जरी बसतां न आलें तरी माशी तेथें जाऊन खुशाल बसते. तिला कांहीं तें अवघड नसतें. १९ किंवा राजाच्या पट्ट-राणीचें अंगहि पहाण्यास कोणी समर्थ नसतो, पण राजपुत्र तिचें खुशाल स्तनपान करितो; २० त्याप्रमाणें माझी ही मराठी भाषा जनार्दनस्वामींच्या कृपाप्रसादानें आत्मज्ञानाला मिठी घालून अनिर्वाच्य ज्ञानाच्या गोष्टी सांगत आहे. २१ आकाश जसें घटाच्या आंत-बाहेर व्यापून रहातें, त्याप्रमाणें शब्दातीत असलेलें परब्रह्म शब्दांनाहि व्यापून राहिलें आहे. त्यामुळें वायफळ शब्द बोलावयास प्रस्तुत प्रसंगीं जागाच उरली नाहीं. २२ वास्तविक लहान मुलाला बोला-वयाचें समजत नसतें; परंतु त्याचा पिता त्याच्या तोंडांतून शब्द काढवीत असतो. त्याप्रमाणेंच ही कथा समजावी. माझ्या वाणीला बोलविणारा जनार्दनच आहे. २३ त्या जनार्दनाच्या कृपादृष्टीनेंच मी भागवत मराठींत सांगत आहे. अगणित ग्रंथ पालथे घातले तरी ज्याचा अर्थ कळत नाहीं, २४ त्याच श्रीमहाभागवतांतील हंसगीतज्ञान जनार्दन-स्वामींच्या कृपेनें मीं देशी भाषेंत निश्चितपणें सांगितलें. २५ सद्भावानें माझी भक्ति केली असतां, त्यायोगें ज्ञानशस्त्र प्राप्त होतें. त्यानें संसारावरील आसक्तीचा छेद करून माझ्या भक्तांना सायुज्यमुक्ति लाभते. २६ ‘ माझ्या भजनानें मोक्ष मिळतो ’ असें जें श्रीकृष्णानें म्हटलें होतें, तें ऐकून उद्धवानें मनांत विचार केला कीं, २७ देव भजनानें मुक्ति

॥ २७ ॥ देवो सांगे भजनेंचि मुक्ती । आणिका ज्ञात्यांची व्युत्पत्ती । आणिकें साधनें मोक्षाप्रती । सांगताती आनआनें ॥ २८ ॥ एवं या दोन्हीं पक्षीं जाण । मोक्षीं श्रेष्ठ साधन कोण । तेचि आशंकेचा प्रश्न । उद्धवें आपण मांडिला ॥ २९ ॥

उ० उ०–वदन्ति कृष्ण श्रेयांसि बहूनि ब्रह्मवादिनः । तेषां विकल्पप्राधान्यमुताहो एकमुख्यता ॥ १ ॥

उद्धव म्हणे गा श्रीपती । मोक्षमार्गीं साधनें किती । वेदवादियांची व्युत्पत्ती । बहुत सांगती साधनें ॥ ३० ॥ तीं अवघींच समान । कीं एक गौण एक प्रधान । देवें सांगीतलें आपण । भक्तीचि कारण मुक्तीसी ॥ ३१ ॥

भवतोदाहृतः स्वामिन् भक्तियोगोऽनपेक्षितः । निरस्य सर्वतः सङ्गं येन त्वय्याविशेन्मनः ॥ २ ॥

आणिकां साधनां नापेक्षिती । सर्व संगातें निरसिती । मोक्षमार्गीं मुख्य भक्ती । जिणें स्वरूपप्राप्ती तत्काळ ॥ ३२ ॥ माझ्या स्वरूपीं ठेवूनि मन । फळाशेवीण माझें भजन । हेंचि मोक्षाचें मुख्य साधन । देवें आपण बोलिलें ॥ ३३ ॥ स्वामी बोलिले मुख्य भक्ती । इतर जे साधनें सांगती । त्यांसी प्राप्तीची अस्तिनास्ती । देवें मजप्रती सांगावी ॥ ३४ ॥ याचि प्रश्नाची प्रश्नस्थिती । विवंचीतसे श्रीपती

मिळते असें सांगतो, पण विद्वानांचें मत याहून निराळें आहे. त्यांनीं मोक्षप्राप्तीला दुसरींहि भिन्न भिन्न अनेक साधनें सांगितलीं आहेत. २८ तेव्हां या दोन पक्षांतील मोक्षप्राप्तीचें सर्वांत श्रेष्ठ साधन कोणतें ! या आशयानें उद्धवानें प्रश्न करण्यास आरंभ केला. २९

[या चवदाव्या अध्यायांत भक्तीच परम श्रेयःसाधन आहे, दुसरें कांहीं नाहीं व साधनासह ध्यानयोग यांचें वर्णन केलें जातें.]

—याप्रमाणें भगवद्भक्तीनें मोक्ष मिळतो असें सांगितलें व इतर उपदेशक मोक्षांचीं अन्य साधनें सांगतात. त्यांतील विशेष साधनाचा निश्चय करण्यासाठीं उद्धव आरंभीं प्रश्न करीत आहे—

उद्धवः उवाच–उद्धव म्हणाला, कृष्ण–हे श्रीकृष्णा ! ब्रह्मवादिनः बहूनि श्रेयांसि वदन्ति–ब्रह्मवेत्ते अनेक श्रेयःसाधनें सांगतात. तेषां विकल्पप्राधान्यं उताहो एकमुख्यता–पण त्यांचें विकल्पानें प्राधान्य आहे म्ह० तीं एकसारखींच प्रधान आहेत किंवा त्यांतील एकालाच मुख्यत्व आहे ! १.

उद्धव म्हणाला कीं, अरे बाबा श्रीकृष्णा ! मोक्षमार्गाचीं साधनें तरी किती आहेत ! वेदवेत्यांच्या मताप्रमाणें पुष्कळ साधनें प्रतीत होतात. ३० तेव्हां तीं सर्व सारखींच आहेत कीं, कांहीं गौण, व कांहीं मुख्य, अशीं आहेत आणि देवानें स्वतः तर सांगितलें आहे कीं, केवळ भक्तीच मुक्तीचें कारण आहे ! ३१.

—' एकालाच मुख्यत्व आहे ' या पक्षाला उत्थापित करण्याचें कारण उद्धव सांगतो—

स्वामिन्–हे प्रभो ! भवतः अनपेक्षितः भक्तियोगः उदाहृतः–तूं निरपेक्ष म्ह० निष्काम भक्तियोग सांगितलास, येन मनः सर्वतः सङ्गं निरस्य त्वयि आविशेत्–ज्याच्या योगानें मन सर्व विषयांवरील आसक्ति सोडून तुझ्यामध्यें प्रवेश करील. [असा निष्काम भक्तियोग तूं सांगितलास. याचा भावार्थ असा—तूं जो भक्तियोग सांगितलास व इतर ब्रह्मवेत्ते जीं श्रेयःसाधनें सांगतात तीं सर्वच साक्षात् फल देणारीं असल्यामुळें त्या सर्वांनाच प्राधान्य आहे कीं, इतरांना अंगत्व व त्यांतील कोणत्या तरी एकाला अंगित्व आहे ! जर सर्वांनाच प्राधान्य असेल तर त्यांतील सर्वांचेंच फल एकसारखें आहे कीं, त्यांत कांहीं विशेष आहे !] २.

माझे भक्त इतर साधनांची इच्छाच करीत नाहींत. ते सर्व संग सोडून देतात. मोक्षमार्गानें माझी भक्तीच मुख्य आहे. तिच्यायोगें तत्काल आत्मस्वरूपाची प्राप्ति होते. ३२ माझ्या स्वरूपांत चित्त ठेवून, फलाची आशा टाकून, माझें निष्काम भजन करणें, हेंच मोक्षाचें मुख्य साधन आहे, असें देवानें स्वतःच म्हटलें आहे. ३३ स्वामीनें तर भक्तीच मुख्य सांगितली आहे; पण इतर लोक जीं साधनें सांगतात, त्यांनीं स्वरूपप्राप्ति होते किंवा नाहीं, हेंहि देवानें आतां मला सांगावें. ३४ या प्रश्नाचा विचार श्रीकृष्ण करूं लागले. ते म्हणाले कीं, उद्धवा ! विद्वानांचा

त्रिगुण ज्ञात्याची प्रकृती । साधनें मानिती यथारुची ।। ३५ ।। ज्याची आसक्ती जिये गुणीं । तो तेंचि साधन सत्य मानी । यापरी ज्ञानाभिमानी । नाना साधनीं जल्पती ।। ३६ ।। परंपरा बहुकाळें । ज्ञात्याचें ज्ञान झालें मैळें । तें सत्य मानिती तुच्छ फळें । ऐक प्रांजळें उद्धवा ।। ३७ ।। चौदाव्यामाजीं निरूपणस्थिती । इतुकें सांगेल श्रीपती । साधनांमाजीं मुख्य भक्ती । ध्यानयोगस्थिती समाधियुक्त ।। ३८ ।। इतर साधनांचें निराकरण । तुच्छफलत्वें तेंही जाण । सात श्लोकीं श्रीकृष्ण । स्वमुखें आपण सांगतू ।। ३९ ।।

श्रीभ०—कालेन नष्टा प्रलये वाणीयं वेदसंज्ञिता । मयाऽऽदौ ब्रह्मणे प्रोक्ता धर्मो यस्यां मदात्मकः ।। ३ ।।

माझी वेदवाणी प्रांजळी । ज्ञानप्रकाशें अतिसोज्ज्वळी । ते नाशिली प्रळयकाळीं । सत्यलोकहोळी जव्हां झाली ।। ४० ।। ब्रह्मयाचा प्रळयो होतां । वेदवाणीचा वक्ता । कोणी नुरेचि तत्त्वतां । यालागीं सर्वथा बुजाली ।। ४१ ।। तेचि वेदवाणी कल्पादीसी । म्यांचि प्रकाशिली ब्रह्मयासी । जिच्याठायीं मद्भक्तीसी । यथार्थेंसी बोलिलों ।। ४२ ।। जे वाचेचें अनुसंधान । माझे स्वरूपीं समाधान । ऐसें माझें निजज्ञान । ब्रह्मयासी म्यां जाण सांगीतलें ।। ४३ ।।

तेन प्रोक्ता च पुत्राय मनवे पूर्वजाय सा । ततो भृग्वादयोऽगृह्णन् सप्त ब्रह्ममहर्षयः ।। ४ ।।

तो सकळ वेद विवंचूनू । ब्रह्मेनि उपदेशिला मनू । सप्त ब्रह्मर्षी त्यापासूनू । वेद संपूर्ण पावले ।। ४४ ।। ब्रह्मेनि दक्षादि प्रजापती । उपदेशिले त्याचि स्थिती । यापासून नेणों किती । ज्ञानसंपत्ती

स्वभाव त्रिगुणात्मक असल्यामुळें ते आपापल्या आवडीप्रमाणें साधनें मानितात. ३५ ज्या गुणाची ज्याला आवड असते, तेंच साधन तो खरें मानितो. याप्रमाणें ज्ञानाभिमानी अनेक साधनांची व्यर्थ बडबड करितात. ३६ दीर्घ काळाच्या परंपरेनें विद्वानांचें ज्ञान मलिन झालें आहे. त्यामुळें ते तुच्छ फलांना सत्य कसे मानितात, तेंच तूं आतां स्पष्टपणें ऐक. ३७ या चवदाव्या अध्यायांत समाधियुक्त ध्यानयोगस्थितीच्या साधनांत भक्तीच मुख्य आहे यांचें श्रीपति निरूपण करणार आहे. ३८ त्याचप्रमाणें तुच्छफलत्वानें इतर साधनांचेंहि निवारण श्रीपति आपल्या मुखानें पुढील सात श्लोकांनीं करणार आहे. ३९.

—त्या सर्वांमध्यें भक्तीच महाफल देणारी असल्यामुळें मुख्य आहे व इतर साधनें पुण्याच्या स्थानीं असलेल्या स्वर्गादिकांमध्यें फलबुद्धि ठेवणाऱ्या प्राण्यांकडून आपापल्या प्रकृतीप्रमाणें प्राधान्यानें कल्पिलेलीं पण क्षुद्र फल देणारीं आहेत, असा विवेक करण्यासाठीं प्रकृतीच्या अनुसार अनेकप्रकारचें वेदार्थज्ञान भगवान् पुढील सात श्लोकांनीं सांगतात—

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाले, इयं वेदसंज्ञिता वाणी कालेन प्रलये नष्टा—ही वेदसंज्ञक वाणी काळाच्या ओघानें प्रलयामध्यें नष्ट झाली. मया आदौ ब्रह्मणे प्रोक्ता—मीं सृष्टीच्या आरंभीं ती ब्रह्मदेवाला सांगितली. यस्यां मदात्मकः धर्मः—ज्या वेदवाणीमध्यें माझ्या ठिकाणींच ज्याचें चित्त आहे असा धर्म रहातो. [ती वाणी सांगितली.] ३.

प्रलयकाळीं जेव्हां सत्यलोकाची होळी झाली, तेव्हां ज्ञानप्रकाशानें अत्यंत उज्ज्वल अशी माझी सरळ वेदवाणी नाश पावली. ४० ब्रह्मदेवाचा प्रलय झाल्यावर मग वेदवाणी सांगणारा कोणीच उरला नाहीं. त्यामुळें ती सर्वथा लुप्त झाली. ४१ त्याच वेदवाणीचा सृष्टीच्या आरंभीं मीं ब्रह्मदेवाला उपदेश केला. त्यांत मीं माझ्या भक्तीचें यथार्थ आचरण सांगितलें आहे. वाणीचें जें चिंतन व माझ्या स्वरूपांतील समाधान, असें तें माझें आत्मज्ञान मीं ब्रह्मदेवाला सांगितलें. ४३.

तेन च सा पूर्वजाय मनवे पुत्राय प्रोक्ता—त्यानें ती आपल्या ज्येष्ठ मनु नांवाच्या पुत्राला सांगितली. ततः सप्त ब्रह्ममहर्षयः भृग्वादयः अगृह्णन्—त्या मनूपासून सात प्रजापति व महर्षि असे जे भृग्वादिक त्यांनीं तिचें ग्रहण केलें. ४.

त्या सर्व वेदाचें विवेचन करून ब्रह्मदेवानें मनूला उपदेश केला. मनूपासून त्याचे मानसपुत्र जे सात महर्षि त्यांना संपूर्ण वेद प्राप्त झाला. ४४ ब्रह्मदेवानें दक्ष प्रजापतीसारख्यांना तसाच उपदेश केला. त्यानें कितीजण

पावले ॥ ४५ ॥ सप्त ऋषींची जे मातू । भृगु मरीचि अत्रि विख्यातू । अंगिरा पुलस्त्य पुलह क्रतू । हा जाण निश्चितु ऋषिभागू ॥ ४६ ॥

तेभ्यः पितृभ्यस्तत्पुत्रा देवदानवगुह्यकाः । मनुष्याः सिद्धगन्धर्वाः सविद्याधरचारणाः ॥ ५ ॥
किंदेवाः किन्नरा नागा रक्षःकिंपुरुषादयः । बह्वयस्तेषां प्रकृतयो रजःसत्त्वतमोभुवः ॥ ६ ॥

तिहीं ऋषीश्वरीं पुत्रपौत्र । उपदेशिले नर किन्नर । देव दानव अपार । सिद्ध विद्याधर चारण ॥ ४७ ॥ गुह्यक गंधर्व राक्षस । किंदेव आणि किंपुरुष । नागसर्पादि तामस । परंपरा उपदेश पावले ॥ ४८ ॥ मुखाकृतीं दिसती नर । शरीरें केवळ वनचर । ऐसे जे कां रीस थोर । त्यांसी किन्नर बोलिजे ॥ ४९ ॥ मुखाभासें दिसती पुरुष । शरीर पाहतां श्वापदवेष । ऐसे जे वानर रामदास । त्यांसी किंपुरुष बोलिजे ॥ ५० ॥ स्वेदुर्गंधिकल्मषरहित । शरीरें अतिभव्य भासत । मनुष्यदेवांऐसे दिसत । ते बोलिजेत किंदेव ॥ ५१ ॥ यापरींच्या बहुधा व्यक्ती । रजतमादि सत्वप्रकृती । उपदेशपरंपरा प्राप्ती । ज्ञान बोलती यथारुचि ॥ ५२ ॥

याभिर्भूतानि भिद्यन्ते भूतानां मतयस्तथा । यथाप्रकृति सर्वेषां चित्रा वाचः स्रवंति हि ॥ ७ ॥

जैशी प्रकृति तैशी भावना । जैसा गुण तैशी वासना । जे वासनेस्तव जाणा । भूतें विषमपणा आणि भेदु ५३ ॥ देवमनुष्यतिर्यगता । हे वासनेची विषमता । येवढा भेद करी भूतां । अनेकतां यथारुचि ॥५४॥ ज्यांची जैशी प्रकृती । ते तैसा वेदार्थू मानिती । तेंचि शिष्यांसी सांगती । परंपरास्थिती

ज्ञानसंपन्न झाले, त्यांची गणतीच नाहीं. ४५ भृगु, मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलस्त्य, पुलह व ऋतु असे ते सात प्रसिद्ध महर्षि आहेत. ४६

तेभ्यः पितृभ्यः तत्पुत्राः देव०—त्या पित्यांपासून त्यांचे पुत्र जे देव, दानव, गुह्यक इत्यादिकांनीं त्याचें ग्रहण केलें, तेषां रजःसत्त्वतमोभुवः बह्वयः प्रकृतयः—त्याच्या रजोगुण, सत्त्वगुण व तमोगुण हीं ज्यांचीं जन्मस्थानें आहेत अशा अनेक प्रकारच्या वासना असतात. ५-६.

त्या श्रेष्ठ ऋषींनीं मनुष्य, किन्नर, असंख्य देव, दानव, सिद्ध, विद्याधर, चारण, ४७ गुह्यक, गंधर्व, राक्षस, किंदेव व वानरादि किंपुरुष, नाग-सर्पादि तामस या सर्वांस परंपरेनें उपदेश केला. ४८ ज्यांचें मुख मनुष्यासारखें व शरीर वनचरासारखें असतें अशीं जीं अस्वलें त्यांना किन्नर असें बोलतात; ४९ ज्याच्या मुखावरून पुरुषाचा भास होतो व शरीर श्वापदासारखें दिसतें, असे जे श्रीरामचंद्राचे दास वानर त्यांना किंपुरुष असें म्हणतात. ५० घाम-दुर्गंधि-मलरहित अशीं ज्यांचीं भव्य शरीरें असतात व जीं देव-माणसेंच दिसतात त्यांना 'किंदेव' असें नांव आहे. ५१ याप्रकारें रज-तम-सत्त्वप्रकृतींच्या अनेक व्यक्तिपरंपरेनें उपदेश प्राप्त झाल्यामुळें आपापल्या रुचीप्रमाणें ज्ञान सांगतात. ५२.

याभिः भूतानि भिद्यन्ते—ज्या प्रकृतींच्या योगानें देव-असुर-मनुष्य इत्यादि भूतांचा भेद होतो, तथा भूतानां मतयः—त्याचप्रमाणें भूतांच्या मतीहि भिन्न भिन्न होतात, सर्वेषां चित्राः वाचः यथाप्रकृति स्रवन्ति हि—त्याचप्रमाणें सर्वांच्या वेदार्थव्याख्यानविषयक विचित्रवाणी ज्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणें प्रवृत्त होतात. ७.

जशी प्रकृति तसा स्वभाव असतो. जसा गुण तशीच वासना असते. त्या वासनेमुळेंच प्राण्यांमध्यें विषमपणा व भेद झालेला आहे. ५३ देव, मनुष्य व पशु या योनी वासनेप्रमाणेंच प्राप्त होतात. वासनाच प्राण्यांमध्यें एवढी विषमता व भेद उत्पन्न करिते व त्याच्या त्याच्या रुचीप्रमाणें अनेकत्व प्राप्त होतें. ५४ ज्याचा जसा स्वभाव असतो, तसा तो वेदाचा अर्थ करितो व तोच शिष्यांना शिकवितो. ही उपदेशाच्या परंपरेची स्थिति आहे. ५५ वेदाचा भलताच

उपदेशू ॥ ५५ ॥ विचित्र वेदार्थ मानणें । विचित्र संगति साधनें । विचित्र उपदेश करणें । प्रकृतिगुणें मतवाद ॥ ५६ ॥

एवं प्रकृतिवैचित्र्याद्भिद्यन्ते मतयो नृणाम् । पारंपर्येण केषांचित्पाखण्डमतयोऽपरे ॥ ८ ॥

यापरी गा निजप्रकृती । वाढली जाण नाना मतीं । तो मतवाद ठसावला चित्तीं । यथानिगुतीं सत्यत्वें ॥ ५७ ॥ मिथ्या स्वप्न जेवीं निद्रिता । सत्य मानलेंसे सर्वथा । तेवीं नानामतवादकथा । सत्य तत्त्वतां मानिती ॥ ५८ ॥ हे वेदपढियंत्यांची कथा । ज्यांसी वेदीं नाहीं अधिकारता । त्यांसी उपदेशपरंपरता । नानामतता सत्य माने ॥ ५९ ॥ एकाची वेदबाह्य व्युत्पत्ती । ते आपुलालिये स्वमतीं । पाषंडातें प्रतिष्ठिती । तेंच उपदेशिती शिष्यांतें ॥ ६० ॥

मन्मायामोहितधियः पुरुषाः पुरुषर्षभ । श्रेयो वदन्त्यनेकान्तं यथाकर्म यथारुचि ॥ ९ ॥

नानावासनागुणानुवृत्ती । नाना परींच्या पुरुषप्रकृती । यांसी माझी माया मूळकर्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६१ ॥ माझिया मायें मोहिले वरिष्ठ । जन केले विवेकनष्ट । भुलवूनियां मोक्षाची वाट । विषयनिष्ठ विवेकू ॥ ६२ ॥ ऐक उद्धवा पुरुषश्रेष्ठा । यापरी भ्रंशली जनांची निष्ठा । चुकोनि मोक्षाचा दारवंटा । साधनकचाटा जल्पती ॥ ६३ ॥ त्या नाना साधनांच्या युक्ती । ज्या मतवादें प्रतिपादिती । त्याही दीड श्लोकीं श्रीपती । उद्धवाप्रती सांगत ॥ ६४ ॥

अर्थ करून तो खरा मानणें, भलतींच साधनें समजणें व भलताच उपदेश करणें, हा केवळ स्वतःच्या स्वभावानुसार ग्रहण केलेल्या मताचा अभिमान आहे. ५६.

—पूर्वोक्त अर्थाचा उपसंहार—

एवं प्रकृतिवैचित्र्यात् नृणां मतयः भिद्यन्ते—याप्रमाणें प्रकृतीच्या वैचित्र्यामुळें मनुष्यांच्या मति भिन्न भिन्न होतात. **केषांचित् पारंपर्येण**—अध्ययनादिकांनीं शून्य असलेल्याहि कित्येकांच्या मती उपदेशपरंपरेनें भेद पावतात. **अपरे पाखंडमतयः**—व दुसरे कित्येक पाखंड मती होतात म्ह० त्यांच्या मती वेदविरुद्ध अर्थीं दृढ होतात. ८.

याप्रकारें आपलीच प्रकृति अनेक मतांनीं वाढली आहे, असें जाण. तो मतवाद खरा आहे, असेंच मनांत पूर्ण ठसतें. ५७ ज्याप्रमाणें निजलेला मनुष्य मिथ्याच स्वप्न सर्वथा खरें समजत असतो, त्याप्रमाणें अनेक मतांच्या वादकथा ते तत्त्वतः खऱ्या मानितात. ५८ वेदवेत्यांची ही कथा ! मग ज्यांना वेदाचा अधिकार नाहीं. त्यांना ही उपदेशपरंपरा व अनेक प्रकारचीं मतें खरींच वाटलीं, तर त्यांत आश्चर्य कसलें ! ५९ एखाद्याचें वेदविरुद्ध मत असतें. तो आपल्या मताप्रमाणें पाखंडी मत स्थापन करितो व त्याचा आपल्या शिष्यांना उपदेश करितो. ६०.

पुरुषर्षभ—हे पुरुषश्रेष्ठा ! **मन्मायामोहितधियः पुरुषाः**—पुरुषांच्या प्रकृतीचें कारण मायागुण असल्यामुळें माझ्या मायेनें ज्यांच्या बुद्धि मोहित झाल्या आहेत, असे पुरुष, **यथाकर्म यथारुचि अनेकान्तं श्रेयः वदन्ति**—आपापल्या कर्माप्रमाणें व रुचीप्रमाणें नानाप्रकारचें श्रेयःसाधन सांगतात. ९.

उद्धवा ! विविध गुणांच्या अनुसार वासनाहि अनेक प्रकारच्या होतात व त्याप्रमाणें भिन्नभिन्न स्वभावाचीं मनुष्यें होतात. माझी माया या सर्वांचें मूळ कारण आहे, असें खात्रीनें समज. ६१ माझ्या मायेनेंच श्रेष्ठ लोकांनाहि मोह पाडून त्यांना विचारशून्य बनविलें. मोक्षमार्गांत मोहित करून त्यांच्या विवेकाला विषयनिष्ठ केलें. ६२ हे पुरुषश्रेष्ठ उद्धवा ! त्यामुळें लोकांची निष्ठा ढळली व ते मोक्षाचें दार सोडून साधनाच्या खटपटीची व्यर्थ वटवट करितात. ६३ अनेक मतवाद्यांनीं प्रतिपादन केलेल्या त्या विविध साधनांच्या युक्ति आतां श्रीपति उद्धवाला पुढील दीड श्लोकानें सांगत आहे. ६४.

धर्ममेके यशश्चान्ये कामं सत्यं दमं शमम् । अन्ये वदन्ति स्वार्थं वा ऐश्वर्यं त्यागभोजनम् ।
केचिद्यज्ञतपोदानं व्रतानि नियमान्यमान् ॥ १० ॥

मीमांसकाचें मत येथ । काम्य निषिद्धरहित । कर्मचि साधन मानित । मोक्ष येणें प्राप्त म्हणताती ॥ ६५ ॥ काव्य नाटक अळंकार करिती । ते कवित्वाचि साधन मानिती । कविताप्रबंध-व्युत्पत्ती । मोक्ष मानिती तेणें यशें ॥ ६६ ॥ कवीश्वरांचें मत ऐसें । आपुले कवित्वाचेनि यशें । मोक्ष लाहों अनायासें । हें कवितापिसें कवीश्वरां ॥ ६७ ॥ वात्स्यायनकोकशास्त्रमत । त्यांचा अभिप्रायो विपरीत । कामसुखें मोक्ष मानित । काम सतत सेवावा ॥ ६८ ॥ सांख्ययोगांची वदंती । सत्य शम-दमादि संपत्ती । हेंचि साधन मोक्षाप्रती । नेम निश्चितीं तिंहीं केला ॥ ६९ ॥ नीतिशास्त्रकारांचें मत । सार्वभौम राज्य प्राप्त । त्यातेंचि मोक्ष मानित । सामदानादि तेथ साधन ॥ ७० ॥ एकांचा मतविभाग । शिखासूत्रमात्रत्याग । त्याचें नांव मोक्षमार्ग । परमश्लाघ्य मानिती ॥ ७१ ॥ देहात्मवाद्यांचा योग । स्वेच्छा भोगावें यथेष्ट भोग । कैंचा नरक कैंचा स्वर्ग । मेल्या मग कोण जन्मे ॥ ७२ ॥ अश्वमेध राजसूय-याग । हाचि एकांचा मोक्षमार्ग । एकां मूर्ति उपासना सांग । पूजाविभाग तें साधन ॥ ७३ ॥ एकांचें मत साक्षेप । कडकडाटेंसी खटाटोप । शरीरशोषणादि जें तप । तो मार्ग समीप मोक्षाचा ॥ ७४ ॥ एक

—पुढील दीड श्लोकानें त्याचींच उदाहरणें सांगतात—

एके धर्मं वदन्ति—कर्ममीमांसक धर्म हेंच श्रेयःसाधन सांगतात. (मोक्षार्थी पुरुषानें काम्य व निषिद्ध कर्में करूं नयेत. प्रत्यवायपरिहारासाठीं नित्य व नैमित्तिक कर्में मात्र करावीं, असें त्यांचें म्हणणें आहे.) **अन्ये यशः वदन्ति**-काव्या-लंकारशास्त्रज्ञ यश हेंच श्रेयःसाधन आहे, असें सांगतात. (याविषयीं ' मनुष्याची पवित्र कीर्ति या लोकीं जोंवर गात असतात तितकीं सहस्र वर्षें तो स्वर्गलोकांत पूज्य होतो, ' असें त्यांचें म्हणणें आहे.) **अन्ये कामं सत्यं दमं शमं वदन्ति**—वात्स्या-यनप्रभृति कामशास्त्रज्ञ कामच श्रेयःसाधन आहे असें सांगतात. योगशास्त्रकर्ते सत्य, शम व दम हीं मोक्षांचीं साधनें सांगतात. **अन्ये वै ऐश्वर्यं स्वार्थं**—दुसरे ऐहिक फलवादी दंड, नीतिकर्ते प्रसिद्ध ऐश्वर्य, हाच पुरुषार्थ सांगतात. वास्तव सामादि उपाय हेंच श्रेयःसाधन आहे, असें त्यांचें मत आहे, **त्यागभोजनं च**—कित्येक त्यागालाच श्रेयःसाधन म्हणतात व लोकायतिक भोग हेंच श्रेयःसाधन समजतात. **केचित् यज्ञतपोदानं व्रतानि नियमान् यमान् वदन्ति**—कित्येक देवतापूजन, तप, दान, व्रतें, नियम यम हींच श्रेयःसाधनें आहेत, असें सांगतात. १०.

याविषयीं मीमांसकांचें मत असें आहे कीं, निषिद्ध व काम्य कर्म वर्ज करून इतर सर्व कर्में हेंच मोक्षाचें मुख्य साधन आहे. ६५ काव्य, नाटक, अलंकारशास्त्र यांचें ज्ञाते कवित्वालाच साधन समजतात. उत्तम कविता, पद्य इत्यादिकांत यश मिळविणें यांतच मोक्ष आहे, असें ते म्हणतात. ६६ अलंकारशास्त्रज्ञ श्रेष्ठ कवि तर असें प्रति-पादन करितात कीं, आमच्या कवित्वाच्या यशानेंच आम्ही अनायासें मोक्षाला प्राप्त होतों. असें कवीश्वरांना कवि-तेचें वेड लागलेलें असतें. ६७ वात्स्यायन कोकशास्त्रज्ञांचें मत तर अगदीं विलक्षणच आहे. ते कामसुखानेंच मोक्ष मिळतो, असें मानितात. म्हणून सतत कामासक्त व्हावें, असें त्यांचें मत आहे. ६८ सांख्ययोगवाद्यांच्या मतें सत्य, शम-दमादि हीच खरी संपत्ति आहे व हेंच मोक्षाचें साधन आहे, असा त्यांनीं निश्चित नियम ठरवून टाकिला आहे. ६९ ज्या नीतिशास्त्रकारांच्या मतानें सार्वभौम राज्याची प्राप्ति होणें हाच खरा मोक्ष आहे. ते साम-दान इत्यादि मोक्षाची साधनें समजतात. ७० कोणी शेंडी व जानवें यांचा त्याग करणें यालाच मोक्षमार्ग म्हणतात व तोच अत्यंत श्रेष्ठ मार्ग आहे असें समजतात. ७१ देहात्मवादी जे चार्वाक ते स्पष्ट सांगतात कीं, इच्छेला येईल तसें खुशाल स्वैर वागावें व इष्ट भोग भोगावे. स्वर्ग कोठचा व नरक कोठचा ! एकदां शरीर मरून त्याचें जळून भस्म झाल्यावर मग पुनर्जन्म कोठचा ! ७२ अश्वमेध, राजसूय यज्ञ हाच याज्ञिकांच्या मोक्षाचा मार्ग आहे. कोणी मूर्तीची सांग उपासना व पूजा हेंच साधन मानितात. ७३ कोणी म्हणतात कीं, शरीराला क्लेश देऊन, उपास-तापास करून, शरीर कष्टवून, हठयोगासारखें तप करणें हाच मोक्षप्राप्तीचा अगदीं जवळचा मार्ग आहे. ७४ कोणाच्या मतानें दान देणें हेंच

म्हणती श्रेष्ठ साधन । मोक्षमार्गी केवळ दान । दीक्षित म्हणती व्रतग्रहण । हेंचि साधन मोक्षाचें ॥ ७५ ॥ एकांच्या मताचा अनुक्रम । अवश्य करावे व्रत नियम । एवं मतानुसारें उपक्रम । नानासाधनसंभ्रम बोलती ॥ ७६ ॥ या साधनांची पाहतां स्थिति । आद्यंतवंत निश्चितीं । तेंचि पैं उद्धवाप्रती । कृष्ण कृपामूर्ती सांगत ॥ ७७ ॥

आद्यन्तवन्त एवैषां लोकाः कर्मविनिर्मिताः । दुःखोदर्कास्तमोनिष्ठाः क्षुद्रानन्दाः शुचार्पिताः ॥ ११ ॥

सांडूनि फळाशा देहाभिमान । मज नार्पिती जे साधन । त्यांचे फळ दुःखरूप जाण । जन्ममरणदायक ॥ ७८ ॥ तिंहीं साधनें साधिले लोक । ते अंतवंत नश्वर देख । ते लोकींचें जें सुख । साखरेंसीं विख रांधिलें ॥ ७९ ॥ त्याचे जिह्वाग्रीं गोडपण । परिपाकीं अचूक मरण । तैसा तो क्षुद्रानंद जाण । शोकासी कारण समूळ ॥ ८० ॥ निजकर्में निर्मिले लोक । त्यांच्याठायीं कैंचें सुख । उत्तरोत्तर वाढतें दुःख । अंधतमदायक परिपाकू ॥ ८१ ॥ भोगासक्त जें झालें मन । त्यासी अखंड विषयांचें ध्यान । विषयाध्यासें तमोगुण । अधःपतनदायक ॥ ८२ ॥ इंहींच साधनीं माझी भक्ती । जो कोणी करील परम प्रीती । ते भक्तीची मुख्यत्वें स्थिति । स्वयें श्रीपती सांगत ॥ ८३ ॥

मय्यर्पितात्मनः सभ्य निरपेक्षस्य सर्वतः । मयात्मना सुखं यत्तत्कुतः स्याद्विषयात्मनाम् ॥ १२ ॥

मोक्षाचें श्रेष्ठ साधन आहे. दीक्षित म्हणतात कीं, यज्ञ करण्यासाठीं यज्ञकंकण बांधणें हेच मोक्षाचें साधन आहे. ७५ व्रत, वैकल्य, नेम-धर्म हेंच मोक्षसाधन आहे, असें कोणी सांगतात. याप्रमाणें आप-आपल्या मतानुसार अनेक साधनांचा महिमा सांगत असतात. पण या सर्व साधनांचा विचार केला असतां तीं सर्व अनित्य आहेत, असें कृपेची मूर्तीच असलेला श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. ७७.

—'पण या सर्वांचें फल तुच्छ आहे' असें भगवान् सांगतात—

एषां कर्मविनिर्मिताः लोकाः आद्यन्तवंतः एव-पण या सर्व साधनांनीं प्राप्त होणारीं कर्मजन्य फलें उत्पत्ति-विनाशशीलच आहेत, क्षुद्रानंदाः दुःखोदर्काः तमोनिष्ठाः शुचार्पिताः–तसेच त्यापासून होणारे क्षुद्र आनंद परिणामीं दुःख देणारे, मोहामध्यें पर्यवसान पावणारे व भोगकालींहि असूयादिकांच्या योगानें संतापानें व्याप्त असतात. ११.

—आतां येथून अध्यायसमाप्तीपर्यंत भक्तीचें मुख्यत्व सांगतात—

फलासक्ति व देहाभिमान टाकून कर्म केलें व साधन मदर्पण केलें नाहीं तर त्याचें जन्म-मरण देणारें दुःखरूप फल मिळतें. ७८ त्या साधनांच्या योगानें ज्या स्वर्गादि लोकांची प्राप्ति होते, ते लोक अशाश्वत व नाशवंत असतात. विष घालून शिजविलेल्या साखरेच्या पदार्थांप्रमाणें त्या लोकींचें सुख असतें. ७९ तो पदार्थ जिभेच्या अग्राला तेवढा गोड लागतो. पण परिणामीं अचूक मरण देणारा असतो. त्याप्रमाणें तो स्वर्गांतील क्षुद्र आनंद समूळ शोकाला कारण होतो. ८० आपल्या कर्मानें निर्माण केलेल्या लोकीं सुख कोठचें! तेथें उत्तरोत्तर वाढतें दुःखच असणार. तें अंधतम नांवाच्या नरकांत नेणारें आहे. ८१ भोगासक्त झालेल्या मनाला सतत विषयांचेंच ध्यान असतें. त्या विषयचिंतनामुळें नरकाला नेणारा तमोगुण वाढतो. ८२ पण याच साधनांनीं जो कोणी मोठ्या प्रेमानें माझी भक्ति करितो, त्या भक्तीचा मुख्य प्रकार श्रीपति स्वतः सांगत आहे. ८३.

सभ्य–हे सभ्या, मयि अर्पितात्मनः सर्वतः निरपेक्षस्य–माझ्याठिकाणीं ज्यानें आपलें चित्त अर्पण केलें आहे व जो सर्व विषयापासून विरक्त झाला आहे, अशा पुरुषाला–मया आत्मना यत्सुखं स्यात्–परमानंदरूप व अनन्यत्वानें स्फुरणारा अशा माझ्या योगानें जें सुख होतें, तत् विषयात्मनां कुतः–तें सुख विषयांमध्यें ज्यांचें चित्त आसक्त आहे, त्यांना कोठून होणार! १२.

भक्ती निजसुखाची मातू । सांगावया उद्धवासी संबोधितू । भक्तिसुखालागीं भाग्यवंतू । तूंचि निश्चितू उद्धवा ॥ ८४ ॥ भक्तिसुखाचें भाग्य यासी । म्हणोनि सभ्य म्हणणें त्यासी । ऐसें पुरस्करोनि उद्धवासी । भक्तिसुखासी देवो सांगे ॥ ८५ ॥ पावावया माझी स्वरूपप्राप्ती । इहलोकींची भोगासक्ती । निःशेष नातळे चित्तवृत्ती । जेवीं निजपती रजस्वला ॥ ८६ ॥ साधूनि माझिया अनुसंधाना । परलोक नातळे वासना । धिक्कारी पैं ब्रह्मसदना । इतर गणना कोण पुसे ॥ ८७ ॥ ऐशिया गा निरपेक्षता । माझेनि भजनें सप्रेमता । तेथ मी जाण स्वभावतां । प्रकटें तत्त्वतां निजरूपें ॥ ८८ ॥ मी प्रकटलों हें ऐसें । बोलणें तें आहाच दिसे । सदा मी हृदयींचि वसें । प्रकटलों दिसें निर्विकल्पें ॥ ८९ ॥ आभाळ गेलिया सविता । सहजेंचि दिसे आंतौता । तेवीं गेलिया विषयावस्था । मी स्वभावतां प्रकटचि ॥ ९० ॥ एवं भक्ताचिया भावार्था । भावबळें मज प्रकटतां । तेव्हां भक्ताचिया चित्ता । विषयवार्ता स्फुरेना ॥ ९१ ॥ सांडूनि विषयावस्था । मद्रूपीं लागल्या चित्ता । भक्तासी होय मद्रूपता । स्वभावतां निजबोधें ॥ ९२ ॥ लोह एकांगें स्पर्शमणी । लागतां सर्वांग होय सुवर्णी । तेवीं मद्भक्त माझ्या ध्यानीं । चिद्रूपपणीं सर्वांग ॥ ९३ ॥ ते काळीं सहजसुख । भक्तांसी जें होय देख । त्यासी तुकावया तुक । कैंचें आणिक कांटाळें ॥ ९४ ॥ ज्या निजसुखाकारणें । सदाशिव सेवी श्मशानें । ब्रह्मा तें सुख काय जाणे । त्याकारणें म्यां उपदेशिलें ॥ ९५ ॥ भक्तीं भोगितां माझें सुख । विसरले देहादि जन्मदुःख । विसरले ते तहानभूक । निजात्मसुख कोंदलें ॥ ९६ ॥ ऐशिया निजसुखाची गोडी । विषयीं काय जाणती बापुडीं । वेंचितां लक्षालक्षकोडी । त्या सुखाची कवडी लाभेना ॥ ९७ ॥ धन धान्य पुत्र स्वजन । सर्वस्व वेंचितांही जाण । त्या सुखाचा रजःकण । विषयी जन न लाभती ॥ ९८ ॥ हो कां

भक्तीनें प्राप्त होणाऱ्या सुखाची थोरवी सांगण्यासाठीं श्रीकृष्णानें उद्धवाला हांक मारून म्हटलें कीं, हे उद्धवा ! भक्तिसुखाला योग्य असा भाग्यवान् तूंच एक आहेस. ८४ याच्या ठिकाणीं भक्तिसुखाचें भाग्य आहे, म्हणून याला 'सभ्य' म्हणणें उचित आहे, अशा आशयानें उद्धवाचा सत्कार करून देव भक्तिसुख सांगूं लागले. ८५ ज्याप्रमाणें रजस्वला स्त्रीला तिचा पति स्पर्श करीत नाहीं. त्याप्रमाणें चित्तवृत्ति माझ्या स्वरूपप्राप्तीसाठीं इहलोकींच्या भोगासक्तीला मुळींसुद्धा स्पर्श करीत नाहीं. ८६ माझें चिंतन साधून भक्त परलोकप्राप्तीचीहि इच्छा करीत नाहीं. ते ब्रह्मलोकाला सुद्धां तुच्छ लेखितात. मग इतरांची काय कथा ! ८७ जो इतका निरिच्छ असतो, माझ्या भजनांतच ज्याचें प्रेम असतें, त्याच्यापाशीं मी स्वभावतःच आत्मस्वरूपानें प्रकट होतो. ८८ पण 'मी प्रकट होतों' हें बोलणेंहि व्यर्थ आहे. कारण मी निरंतर हृदयांतच असतों. परंतु चित्त निर्विकल्प झालें म्हणजे त्याला माझी प्रतीति येते व 'मी प्रगटलों' असें म्हणतात. ८९ आकाशांतील अभ्र नाहींसें होतांच सूर्य जसा सहजच दिसूं लागतो, त्याप्रमाणें विषयावस्था नाहींशी होतांच मी स्वभावतः प्रकट होतों. ९० अशा प्रकारें भक्तांच्या भावबलानें मी प्रकट झालों म्हणजे त्यांच्या चित्तांत विषयाची वार्ताहि येत नाहीं. ९१ विषयावस्था सोडून चित्त माझ्या स्वरूपाकडे लागलें असतां भक्त आत्मज्ञानामुळें स्वभावतःच मद्रूप होतो. ९२ लोखंडाच्या एका बाजूला जरी परीसाचा स्पर्श झाला, तरी तें सगळेंच जसें सोनें बनतें, तसा माझा भक्त केवल माझ्या ध्यानानें पूर्णपणें मद्रूप होतो. ९३ त्यावेळीं भक्ताला जें सहज सुख प्राप्त होतें, त्याची तुलना करण्यास दुसरी वस्तूच नाहीं. ९४ त्या आत्मसुखासाठीं शंकर स्मशानांत जाऊन राहिला, ब्रह्माला तर तें सुख ठाऊकच नव्हतें. म्हणून तर मीं त्याला उपदेश केला. ९५ माझ्या भक्तांनीं आत्मसुखाचा अनुभव घेतांच ते देहादि जन्म-मरणाचें दुःख, तहान-भूक सर्व विसरले व आत्मसुखानें ओतप्रोत भरले. ९६ अशा त्या सुखाची गोडी बापड्या विषयी लोकांना काय कळणार ! त्यांनीं अगणित द्रव्य खर्च केलें तरी त्यांस या सुखाची कवडीहि मिळत नाहीं. ९७ धन, धान्य, पुत्र, आप्त या सर्वांवर पाणी सोडिलें तरीहि त्या सुखाचा एक कणहि विषयी लोकांच्या हातीं लागत नाहीं. ९८ अहो, सत्यलोकांत

सत्यलोकनिवासी । तेही न पावती त्या सुखासी । इतरांची कथा कायसी । मुख्य प्रजापतीसी हें सुख कैंचें ॥ ९९ ॥ मज निजात्म्याचे सुखप्राप्ती । सकळ इंद्रियें सुखरूप होती । त्या सुखाची सुखस्थिती । लोकांतरप्राप्ती कोट्यंशीं न तुके ॥ १०० ॥ निष्काम निर्लोभ निर्दंभ भजन । निर्मत्सर निरभिमान । ऐशिया मद्भक्तांसी जाण । माझें सुख संपूर्ण मी देतों ॥ १ ॥ जे कां देशतां कालतां । अनवच्छिन्न गा वस्तुतां । ऐशिया निजसुखाचे माथां । माझिया निजभक्तां रहिवासू ॥ २ ॥

अकिञ्चनस्य दान्तस्य समचेतसः । मया सन्तुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः ॥ १३ ॥

ऐक अकिंचनाची गोठी । नाहीं मठ मठिका पर्णकुटी । पाचांपालवीं मोकळ्या गांठी । त्यांसी ये भेटीं निजसुख माझें ॥ ३ ॥ जो दमनशीळ जगजेठी । अकरांचीही नळी निमटी । तो निजसुखाचे साम्राज्यपटीं । बैसे उठाउठीं तत्काळ ॥ ४ ॥ देखतां नानाभूत विषमता । ज्यासी साचार दिसे समता । तो माझिया निजसुखाचे माथां । क्रीडे सर्वार्थतां समसाम्यें ॥ ५ ॥ सर्पत्वचा जेवीं पांपरीं । माथा हालविल्या फडा न करी । तेवीं धनदारागृहपुत्रीं । छळितां ज्यांभीतरीं क्रोध नुमसे ॥ ६ ॥ कामक्रोध मावळले देहीं । साचार शांति ज्याच्याठायीं । माझें निजसुख त्याच्या पायीं । लोळत पाहीं सर्वदा ॥ ७ ॥ तो जरी तें सुख नेघे । तरी तें सुख तयापुढेंमागें । जडोनि ठेलें जी सर्वांगें । सांडितां वेगें सांडेना ॥ ८ ॥ तो जेउती वास पाहे । तें दिग्मंडळ सुखाचें होये । तो जेथ कां उभा राहे । तेथ मुसावलें राहे महासुख ॥ ९ ॥ त्याचें पाऊल जेथें पडे । तेथें निजसुखाची खाणी उघडे । तो प्रसंगें पाहे जयाकडे । तेथें स्वानन्दें

राहणाऱ्यांनाहि जर तें सुख मिळत नाहीं, तर इतरांची काय कथा ! मुख्य ब्रह्मदेवाला तरी हें सुख कोठचें ! ९९ मज निजात्म्याचें सुख प्राप्त झालें असतां सर्व इंद्रियें सुखरूप होतात. त्या सुखाशीं इतर लोकींच्या सुखाची तुलना करूं गेल्यास तीं त्याचा कोट्यंशहि भरत नाहींत. १०० निष्काम, निर्लोभ, निर्दंभ भजन करणाऱ्या, निर्मत्सर, निरभिमान अशा माझ्या भक्तांना मी पूर्ण आत्मसुख देतों. १ मी माझ्या भक्तांना देश व काल यांनीं मर्यादित नसलेल्या माझ्या अनुपम आत्मसुखाच्या शिखरावर नेऊन बसवितों. १०२.

—इतरांना त्या त्या लोकादिकांनीं परिच्छिन्न झालेलें सुख होतें; पण माझ्या भक्ताला परिपूर्ण सुख मिळतें, असें या श्लोकांत सांगतात—

अकिंचनस्य—ज्याच्याजवळ परिग्रहभूत असें कांहीं नाहीं, दान्तस्य—ज्यानें बाह्य इंद्रियांचें दमन केलें आहे, शान्तस्य—ज्यांनीं अंतरिंद्रियांचें नियमन केलें आहे, समचेतसः—ज्याचें चित्त सर्व भूतांमध्यें सम आहे, मया संतुष्टमनसः—माझ्या योगानेंच ज्याचें चित्त संतुष्ट झालें आहे त्याला, सर्वाः दिशः सुखमयाः—सर्व सुखमय होतात. १३.

आतां दरिद्री भक्तांचा वृत्तान्त ऐक. ज्याला मठ, मठी, झोंपडी इत्यादि कांहीं नसतें, ज्याच्या पांचहि पदरांच्या गांठी मोकळ्या सुटलेल्या असतात त्याला माझें आत्मसुख भेट देतें. ३ जो श्रेष्ठ दमनशील पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें व मन मिळून अकराहि इंद्रियांचा गळा दाबून त्यांना ताब्यांत ठेवितो तोच आत्मसुखाच्या साम्राज्यपदावर तत्काल बसतो. ४ अनेक प्राण्यांतील भिन्नपणा दिसत असतांहि त्या सर्वांस जो समत्वानेंच पहातो, तो माझ्या आत्मसुखाच्या शिखरावर चढून सर्व विषयांशीं सम-साम्यानें क्रीडा करितो. ५ सर्पानें टाकिलेली कात जशी तिच्या डोकीवर लाथा हाणिल्या तरी फडा वर करीत नाहीं, त्याप्रमाणें द्रव्य-स्त्री-पुत्र-गृह इत्यादिकांच्या योगें कितीहि छळ झाला तरी ज्याला यत्किंचित्हि क्रोध येत नाहीं. ६ ज्याचे काम-क्रोध देहांतच मावळले आहेत, त्याला सहज शांति प्राप्त होते व माझें आत्मसुख त्याच्या पायांशीं सदा लोळत असतें. ७ त्यानें तें सुख जरी घेतलें नाहीं तरी तें त्याच्या मागेंपुढें येऊन चिकटतें. सोडिलें तरी सुटत नाहीं. ८ तो ज्या बाजूला रहातो ती दिशा सुखानें भरून जाते; तो जेथें उभा रहातो, तेथें महासुख मूर्तिमंत प्रकट होतें. ९ त्याचें जेथें पाऊल पडतें, तेथें आत्मसुखाची खाणच उघडते. तो सहज ज्याच्याकडे

वाढे परमानंदू ॥ ११० ॥ तो ज्यासी भेटे अदृष्टें । त्यांस सुखाची पहांट फुटे । त्यासी पावों लागलिया अवचटें । सुखाचें गोमटें निजसुख लाभे ॥ ११ ॥ ज्याचे श्वासोच्छ्वासांचा परिचार । कीं निमेषोन्मेषांचे व्यापार । माझेनि निजसुखें साचार । तेथेंचि घर बांधलें ॥ १२ ॥ तो सकळ सुखांचा मंडपू । कीं निजसुखाचा कंदर्पू । तो सर्वांगें सुखस्वरूपू । सबाह्य सुखरूपू समसुखत्वें ॥ १३ ॥ त्याचे सुखाची परिपूर्णता । पुढिले श्लोकें तत्त्वतां । स्वयें देवोचि झाला सांगता । सुखसंपन्नता भक्ताची ॥ १४ ॥

न पारमेष्ठ्यं न महेंद्रधिष्ण्यं न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ।
न योगसिद्धीरपुनर्भवं वा मय्यर्पितात्मेच्छति मद्विनाऽन्यत् ॥ १४ ॥

माझे ठायीं अर्पितचित्त । ऐसे माझे निजभक्त । माझेनि सुखें सुखी सतत । ते अनासक्त सर्वार्थीं ॥ १५ ॥ माझ्याठायीं नित्यभक्ती । आणि लोकलोकांतरआसक्ती । ते भक्ती नव्हे कामासक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १६ ॥ सकळ द्वीपांसमवेत । सार्वभौम वलयांकित । येवोनियां होतां प्राप्त । माझे निजभक्त थुंकिती ॥ १७ ॥ विष्ठेमाजील सगळे चणे । ते सूकरासी गोडपणें । त्यांतें कांटाळती शहाणे । तेवीं मद्भक्तीं सांडणें सार्वभौमता ॥ १८ ॥ रसातळादि समस्त । पाताळीं भोग अमृतयुक्त । ते प्राप्त होता माझे भक्त । लाता हाणत अनिच्छा ॥ १९ ॥ खात्या सांडूनि अमृतफळा । शाहाणा न घे पेंडीचा गोळा । तेवीं सांडूनि माझा सुखसोहळा । भक्त रसातळा न वचती ॥ १२० ॥ सुर नर पन्नग वंदिती । येणें महत्त्वें आलिया अमरावती । जेवीं कां कस्तूरीपुढें माती । तेवीं उपेक्षिती मद्भक्त ॥ २१ ॥ जें

पहातो, तेथें परमानंद स्वानंदानें वाढतो. ११० तो दैवयोगानें ज्याला भेटतो त्याच्या सुखोदयालाच आरंभ होतो. त्याला अकस्मात् पाय जरी लागला तरी श्रेष्ठ आत्मसुखाचा अलभ्य लाभ घडतो. ११ त्याच्या श्वासोच्छ्वासाबरोबर व निमेषोन्मेषाबरोबर आत्मसुखानें घरच बांधिलें आहे. १२ तो सर्व सुखाचा मंडपच, किंवा आत्मसुखाचा कंदच, तो सर्वांगानें सुखस्वरूप, आंतून बाहेरून सारखाच आत्मसुखानें भरलेला असतो. १३ त्याच्या सुखाचा पूर्णपणा व भक्तांची सुखसंपन्नता पुढील श्लोकांत देव स्वतः तत्त्वतः सांगत आहे. ११४.

—त्याच्या सुखाचीच परिपूर्णता सांगतात—

मयि अर्पितात्मा—ज्यानें आपलें चित्त माझ्या ठिकाणीं अर्पिलें आहे, असा माझा भक्त, **पारमेष्ठ्यं न इच्छति**—ब्रह्मलोकाची इच्छा करीत नाहीं, **महेंद्रधिष्ण्यं न**-इंद्रपदाची इच्छा करीत नाहीं, **सार्वभौमं न**-सार्वभौम राज्याची इच्छा करीत नाहीं. **रसाधिपत्यं न**—पातालादिकांचें स्वामित्व इच्छित नाहीं, **योगसिद्धीः न**—अणिमादि योगसिद्धींची इच्छा करीत नाहीं, **अपुनर्भवं वा न**—किंवा मोक्षाचीहि इच्छा करीत नाहीं. **मद्विना अन्यत् न इच्छति**—मजवांचून दुसरें कांहींहि इच्छीत नाहीं. (मीच त्याला अतिशय प्रिय असतों, असा याचा भावार्थ.) १४.

मलाच आपलें चित्त अर्पण करणारे माझे भक्त माझ्या सुखानेंच नेहमीं सुखी होतात. ते कोणत्याच विषयांत आसक्त नसतात. १५ नित्य माझी भक्ति करून स्वर्गादि लोकांची ज्यांस आसक्ति असते त्यांची खरोखर ती माझी भक्ति नसून कामासक्तीच होय, हें तूं निश्चयानें जाण. १६ सप्तद्वीपांसहित समुद्रवलयांकित पृथ्वीचें सार्वभौम राज्य जरी माझ्या भक्तांना प्राप्त झालें, तरी ते त्यास तुच्छ मानितात. १७ विष्ठेमध्यें असलेले चणे डुकरांना गोड लागतात, पण शहाण्या लोकांना त्याची किळस येते. त्याप्रमाणें माझे भक्त सार्वभौम राज्यपद टाकून देतात. १८ रसातलादि सर्व पाताळांतील अमृताचे भोग प्राप्त झाले असतां, माझे भक्त निरिच्छपणानें त्यांना लाथेनें दूर सारितात. १९ खाण्यासारखें आंब्याचें फळ टाकून शहाणा मनुष्य कधीं पेंडीचा गोळा जसा घेत नाहीं, त्याप्रमाणें माझे भक्त आत्मसुखाचा सोहळा टाकून पाताळाला भाळत नाहींत. १२० देव, मनुष्य, नाग इत्यादि सर्व जिला वंदन करितात, ती महत्त्वानें युक्त असलेली इंद्राची नगरी अमरावती जरी पुढें आली तरी माझे भक्त कस्तुरीपुढें मातीला जसे तुच्छ लेखावें, तशी तिची उपेक्षा करितात. २१ इंद्रादिकांनाहि वंद्य असलेला जो उत्तमोत्तम ब्रह्मलोक

इंद्रादिकां वंद्य स्थान । उत्तमोत्तम ब्रह्मसदन । तें तुच्छ करिती भक्तजन । जे सुखसंपन्न मद्भावें ॥ २२ ॥ ताकदूध पाहतां दिठीं । सारिखेपणें होतरो भेटी । सज्ञान दूध लाविती ओंठीं । त्यागिती वाटी ताकाची ॥ २३ ॥ तेवीं सत्यलोक आणि भक्तिसुख । समान मानिती केवळ मूर्ख । मद्भावें माझे भक्त जे चोख । ते सत्यलोक धिक्कारिती ॥ २४ ॥ इंद्रपद ब्रह्मसदन । पाताळभोग अमृतमान । एके काळें द्यावया जाण । सर्वसिद्धिदान आलिया ॥ २५ ॥ ज्या साधावया महासिद्धी । योगी शिणताती नाना विधी । त्या प्रकटल्या त्रिशुद्धी । भक्त सद्बुद्धी नातळती ॥ २६ ॥ त्या आणिमादि सिद्धींच्या माथां । मद्भक्तीं हाणोनि लाता । लागले माझ्या भक्तिपंथा । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ २७ ॥ या सिद्धींची कायसी कथा । सलोकता समीपता । माझी देतां स्वरूपता । भक्त सर्वथा न घेती ॥ २८ ॥ जेथ न रिघेचि काळसत्ता । नाहीं जन्ममरणवार्ता । ऐशी देतां माझी सायुज्यता । भक्त सर्वथा न घेती ॥ २९ ॥ आधीं असावें वेगळेपणें । मग सायुज्यें एक होणें । हें मूळचें अबद्ध बोलणें । सायुज्य न घेणें मद्भक्तीं ॥ १३० ॥ भक्तिसुखें सुखावली स्थिती । यालागीं आवडे माझी भक्ती । पायां लागती चारी मुक्ती । भक्त न घेती मजवीण ॥ ३१ ॥ एक मजवांचूनि कांहीं । भक्तांसी आणिक प्रिय नाहीं । माझेनि भजनसुखें पाहीं । लोकीं तिहीं न समाती ॥ ३२ ॥ आदिकरूनि चारी मुक्ती । मजवेगळी जे सुखप्राप्ती । भक्त सर्वथा न घेती । माझ्या अभेदभक्ती लाधले ॥ ३३ ॥ मजवेगळें जें जें सुख । तुच्छ करूनि सांडिती देख । माझ्या भजनाचा परम हरिख । अलोलिक मद्भक्तां ॥ ३४ ॥ म्हणाल भक्त केवळ वेडीं । तुझ्या भजनीं धरिती गोडी । परी तुज तयांची आवडी । नसेल गाढी अतिप्रीती ॥ ३५ ॥ जेवीं गोचिडा आवडे म्हशी । परी गोचीड नावडे तिसी । तेवीं भक्तांची प्रीती तुजसरिसी । तुज त्यांच्याऐशी प्रीती नसेल ॥ ३६ ॥ भज्य भजन भजता । हे त्रिपुटी अविद्यकता । अविद्यायुक्त भजनपंथा । नसेल सर्वथा तुज प्रीती ॥ ३७ ॥ जेवीं कां स्वप्नींचें आंवतणें । जागत्यासी

त्यालाहि मद्भावानें सुखसंपन्न झालेले माझे भक्त तुच्छ मानितात. २२ ताक व दूध दोन्ही दिसावयास सारखींच दिसतात, पण शहाणीं माणसें दुधाची वाटी तोंडाला लावितात व ताकाची वाटी तशीच ठेवितात. २३ त्याप्रमाणें केवळ मूर्खच सत्यलोक व भक्तिसुख हीं दोन्हीं सारखीं समजतात. पण मद्भावानें जे माझे खरे भक्त असतात, ते सत्यलोकाचा धिक्कार करितात. उद्धवा! इंद्रपद, ब्रह्मलोक, पाताळांतील भोग, २४ अमृतपान व ज्या महासिद्धि साध्य करून घेण्यास योगी अनेकप्रकारें स्वतःला शिणवीत असतात, त्या सर्व सिद्धी, यांचें दान एकाच वेळीं जरी प्राप्त झालें, तरी माझे सद्बुद्धि भक्त त्यांस स्पर्शोहि करीत नाहींत. २५-२६ त्या अणिमादि सिद्धींना लाथेनें झुगारून भक्त माझ्या भक्तिमार्गाला लागतात, हें निश्चयानें जाण. या सिद्धींची गोष्ट कशाला पाहिजे! सलोकता, समीपता व माझी स्वरूपता या मुक्तींनाहि भक्त सर्वथा स्वीकारीत नाहींत. २८ अगोदर वेगळें असावें व मग सायुज्यमुक्तीनें एक व्हावें, हें बोलणेंच मुळीं विसंगत आहे; म्हणून माझे भक्त सायुज्यताहि कबूल करीत नाहींत. १३० भक्तांची स्थिति भक्तिसुखानेंच सुखावलेली असते त्यामुळें त्यांना माझी भक्ति फार आवडते. म्हणून चारी मुक्ति पायांशीं जरी आल्या तरी माझे भक्त माझ्यावांचून त्यांना स्वीकारीत नाहींत. ३१ माझ्या भक्तांना माझ्यावांचून दुसरें कांहींहि प्रिय नसतें. माझ्या भजनसुखामुळें ते त्रिभुवनाहूनहि व्यापक होतात. ३२ माझ्या अभेदभक्तीला प्राप्त झालेले माझे भक्त माझ्याहून भिन्न असलेलें जें चारी मुक्तींचें सुख तें कधींहि घेत नाहींत. ३३ माझ्यावांचून असलेलें जेवढें सुख तेवढें सगळें ते तुच्छ लेखितात. माझ्या भक्तांना माझ्या भजनाचा आनंदच फार आवडतो. ३४ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, ते भक्त वेडे असतात, म्हणून त्यांना तुझ्या भजनाची गोडी असते. परंतु तुला कांहीं त्यांची अतिशय प्रेमानें आवड नसेल. ३५ गोचिडीला म्हैस अतिशय आवडते; पण म्हशीला ती आवडत नाहीं, त्याप्रमाणें भक्तांची तुझ्यावर प्रीति असेल, पण तुझी त्यांच्यावर नसेल. ३६ कारण भज्य, भजन व भजन करणारा भक्त ही त्रिपुटी अविद्येमुळें उत्पन्न झाली आहे व अविद्यायुक्त भजनमार्गावर तुझें प्रेम नसेल. ३७

नाहीं जेवूं जाणें । तेवीं अविद्यायुक्त मिथ्याभजनें । त्वां प्रीती करणें हें घडेना ।। ३८ ।। ऐसा आशंकेचा अभिप्रावो । तेचि अर्थी सांगताहे देवो । भजनीं भक्तांचा शुद्ध भावो । तेथमजही पहावो अतिप्रीती ।। ३९ ।। जो जैसा मजकारणें । मी तैसाचि त्याकारणें । भक्त अनन्य मजकारणें । मीही त्यांकारणें अनन्य ।। १४० ।।

न तथा मे प्रियतम आत्मयोनिर्न शङ्करः । न च सङ्कर्षणो न श्रीर्नैवात्मा च यथा भवान् ।। १५ ।।

माझ्या भक्तांची मज प्रीती । ते मीचि जाणें श्रीपती । ते उपमेलागीं त्रिजगतीं । नाहीं निश्चितीं कांटाळें ।। ४१ ।। जो अनन्य झाला माझे भक्तीं । तेव्हांचि त्याची अविद्यानिवृत्ती । ऐशिया भक्तांची जे मज प्रीती । तें सांगू मी किती उद्धवा ।। ४२ ।। ब्रह्मा माझे पोटींचें बाळ । त्याचे लळे मी पुरवीं सकळ । परी भक्तांच्या ऐसा प्रबळ । प्रीतिकल्लोळ तेथ नाहीं ।। ४३ ।। म्यां ब्रह्मा लाविला कर्मपंथा । भक्तांसी दिधलीं निष्कर्मता । यालागीं न वचें मी ब्रह्मा प्रार्थितां । होय भात खाता गोवळ्यांचा ।। ४४ ।। उणें आणूनि ब्रह्मयासी । मी तों झालों वत्सें वत्सपांसी । एवं निजभक्तांच्या ऐसी । प्रीती ब्रह्मयासी मज नाहीं ।। ४५ ।। असो ब्रह्मयाची ऐसी कथा । संकर्षण माझा ज्येष्ठ भ्राता । परी भक्तांच्या ऐसी सर्वथा । नसे प्रीति तत्त्वतां तयासी ।। ४६ ।। कौरवांच्या पक्षपातासी । उणे आणोनि बळिभद्रासी । म्यां वांचविलें निजभक्तांसी । पांडवांसी निजांगें ।। ४७ ।। तुजदेखतां भीष्माच्या पणीं । म्यां हारी घेऊनि रणांगणीं । वांचविला कोदंडपाणी । भक्तचूडामणी अर्जुन ।। ४८ ।। रमा माझ्या

स्वप्नांत आलेल्या जेवणाच्या निमंत्रणावर जागृतींत जसें जेवायला जातां येत नाहीं, त्याप्रमाणें अविद्येनें होणाऱ्या मिथ्या भजनावर तूं प्रीति करशील, हें संभवत नाहीं. ३८ आशंकेचें उत्तर देव सांगत आहेत कीं, माझ्या भजनामध्यें ज्या भक्तांचा शुद्ध भाव असतो, त्यांवर माझें अत्यंत प्रेम असतें. ३९ जो मला जसा भजतो, तसाच मी त्याच्याशीं असतो. (सु. गी. ४-११. पृ. ८२) जे भक्त माझ्याशीं एकनिष्ठ असतात त्यांच्याशीं मीहि अनन्य होऊन रहातों. १४०.

—मलाहि तो अतिशय प्रिय आहे असें, पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

यथा भवान् मे प्रियतमः—जसा तूं मला अतिशय प्रिय आहेस, (येथें ' भक्त ' असें म्हणावयास पाहिजे होतें, पण भगवान् मोठ्या हर्षानें भवान् असें म्हणत आहेत.), **तथा आत्मयोनिः न**—तसा माझा पुत्र ब्रह्मदेवहि मला प्रिय नाहीं, **शंकरः न**—शंकर मत्स्वरूप असूनहि तो मला प्रिय नाहीं, **संकर्षणः च न**—माझा सख्खा भाऊ बलरामहि तसा प्रिय नाहीं, **श्रीः न**—लक्ष्मी माझी भार्या आहे, तरी तीहि तितकी प्रिय नाहीं, **आत्मा च न एव**—फार काय पण माझा आत्माहि मला तेवढा प्रिय नाहीं. १५.

माझी माझ्या भक्तांवर केवढी प्रीति आहे, ते मी श्रीपतीच जाणतों. त्याला उपमा देण्यास त्रिभुवनांतहि कांहीं सांपडत नाहीं. ४१ जो माझ्या भक्तींत अनन्य झाला त्याचें अज्ञान तत्काल नाश पावतें. अशा भक्तांवर माझी किती प्रीति आहे ती काय सांगावी ! हे उद्धवा ! ४२ ब्रह्मदेव माझ्या पोटचें मूल, त्याचे सगळे लाड मी पुरवितों; पण त्याच्याजवळ भक्तासारख्या प्रेमाच्या लाटा उचंबळत नाहींत. ४३ मीं ब्रह्मदेवाला कर्ममार्गाला लाविलें व माझ्या भक्तांना निष्कर्मता दिली. यामुळें ब्रह्मदेवानें मला सन्मानानें पाचारिलें, तरी मी जात नाहीं. पण गवळ्यांच्या घरीं जाऊन त्यांच्याबरोबर भात खातों. ४४ ब्रह्मदेवाला कमीपणा आणून मीं गायींचीं वासरें व गवळी यांचीं रूपें घेतलीं. याप्रमाणें माझ्या भक्तांइतकें माझें ब्रह्मदेवावरहि प्रेम नाहीं. ४५ ब्रह्मदेवाची ही गोष्ट राहो. आतां संकर्षण म्ह० बलराम जो माझा वडील भाऊ त्याच्यावरहि माझी भक्तांच्या इतकी प्रीति नाहीं. ४६ कौरवांच्या पक्षपातांत बलरामाला कमीपणा देऊन मीं स्वतः माझे भक्त जे पांडव त्यांना वांचविलें. ४७ तुझ्या समक्षच भीष्मप्रतिज्ञेंत युद्धांत मीं हार घेतली व माझा श्रेष्ठ भक्त जो अर्जुन

पट्टाची राणी । ते म्यां सेवेसी लाविली चरणीं । खांदीं वाहिल्या गौळणी । भक्तशिरोमणी // गोपिका ।। ४९ ।। जे लक्ष्मी निःशेष उपेक्षिती । ते मज पूज्य परम प्रीतीं । जे मज लक्ष्मी मागती । त्यांसीं श्री ना श्रीपती ऐसें होय ।। १५० ।। लक्ष्मी उपेक्षूनि निश्चितीं । मज निजभक्त आवडती । मज पढियंता उमापती । त्याहून अतिप्रीती भक्ताची ।। ५१ ।। ज्या महादेवाचेनि गुणें । म्यांही श्यामवर्ण धरणें । ज्या महादेवाचेनि वचनें । म्यां मोहिनी होणें दुसरेनी ।। ५२ ।। ते मोहिनीच्या दर्शनीं । म्यां शिव भुलविला तत्क्षणीं । रुक्मांगद मोहिनीपासूनी । अर्धक्षणीं तारिला ।। ५३ ।। यापरी माझ्या भक्तांहूनी । मज प्रिय नव्हे शूलपाणी । मज पढियंता त्रिभुवनीं । भक्तांवांचूनी आन नाहीं ।। ५४ ।। आगमनिगमीं प्रतिपाद्य । माझी चतुर्भुज मूर्ति शुद्ध । ते निजहृदयीं मी परमानंद । भक्तनिजपद वाहतसें ।। ५५ ।। मज निजदेहाची नाहीं गोडी । गोवळ झालों अतिआवडीं । गायी राखें अरडीदरडी । कीं थापटीं घोडीं भक्तांचीं ।। ५६ ।। मी अवाप्तसकळकाम । परी प्रेमळांलागीं सदा सकाम । देखतां प्रेमळांचा भाव परम । मी आत्माराम उडी घालीं ।। ५७ ।। प्रेमळ देखतांचि दिठीं । मी घें आपुलिये सवसाटीं । नव्हतां वरि वदें सुखकोटी । नये तरी उठाउठी सेवक होय ।। ५८ ।। सांडूनि महत्त्वपरवडी । मी निजभक्तांचीं उच्छिष्टें काढीं । भक्तकाजाचे सांकडीं । करीं कुरवंडी देहाची ।। ५९ ।। उपेक्षूनि निजदेहासी । उद्धवा तुजसारिखिया भक्तांसी । मज आवडती ते अहर्निशीं । जीवें सर्वस्वेंसी पढियंते ।। १६० ।। आवडीं करितां माझें भजन । मज पूज्य झाले भक्तजन । त्या भक्तांचें निजलक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ६१ ।।

त्याला बांचविलें. ४८ लक्ष्मी माझी पट्टराणी असूनहि तिला मीं माझ्या पायाची सेवा करावयास लाविलें व माझ्या भक्तांतील श्रेष्ठ अशा गोपींना खांद्यावर बसविलें. ४९ जे भक्त लक्ष्मीची म्ह० संपत्तीची पूर्ण उपेक्षा करितात, ते मला अत्यंत पूज्य वाटतात. त्यांच्यावर माझी परम प्रीति असते. पण जे माझ्याजवळ ऐश्वर्य मागतात त्यांना ती लक्ष्मीहि नाहीं व मी लक्ष्मीपतीहि नाहीं, अशी स्थिति होते. १५० लक्ष्मीची उपेक्षा करूनहि मला माझे भक्त आवडतात. शंकर माझा आवडता आहे, पण त्याहूनहि भक्तांवर माझें अधिक प्रेम आहे. ५१ ज्या महादेवाच्या संगतीनें मीं श्यामवर्ण धारण केला, ज्या महादेवाच्याच शब्दावरून मीं दुसऱ्यांदा मोहिनीचें रूप घेतलें, ५२ व त्याला त्या रूपानें तत्काल भुलविलें आणि मोहिनीपासून रुक्मांगदाला अर्ध्याक्षणांत तारिलें. ५३ याप्रमाणें मला माझ्या भक्तांहून शंकर प्रिय नाहीं. मला माझ्या भक्तावांचून त्रिभुवनांत दुसरें कोणीहि प्रिय नाहीं. ५४ वेदशास्त्रांत माझ्या ज्या शुद्ध चतुर्भुज मूर्तीचें प्रतिपादन केलें आहे त्याच माझ्या हृदयावर मीं माझ्या भक्तांचें भृगुपदचिन्ह मोठ्या आनंदानें धारण करितों. ५५ मला माझ्या देहाचीहि आवड नाहीं. मी मोठ्या प्रेमानें गवळी झालों. मीं दऱ्याखोऱ्यांतून गायी राखिल्या, भक्तांच्या घोड्यांची चाकरी केली. ५६ मी जरी पूर्णकाम आहें, तरी प्रेमळ भक्तांसाठीं मी सर्वदा सकाम असतों. प्रेमळ भक्ताचा परमभाव पहातांच मी आत्माराम त्याच्यासाठीं उडी टाकितों. ५७ प्रेमळ भक्त दृष्टीस पडतांच मी त्याला आपल्या संगतीला घेतों. त्याच्याशीं प्रेमानें गोष्टी करितों. इतकेंहि करून तो जर माझ्या संगतीला न आला तर मी त्याचा सेवक होतों. ५८ मी माझी थोरवी बाजूला ठेवून भक्तांची उष्टीं काढितों. भक्तांच्या संकटप्रसंगीं मी माझा देहहि ओवाळून टाकितों. ५९ उद्धवा ! तुझ्यासारखे जे भक्त आहेत ते मला रात्रंदिवस आवडतात. त्यांच्यासाठीं मी देहाची उपेक्षा करितों. कारण ते मला प्राणाहूनहि प्रिय आहेत. १६० आवडीनें माझें भजन केल्यानें जे भक्त मला पूज्य झाले, त्या भक्तांचें लक्षण श्रीकृष्ण आतां स्वतः सांगत आहे. १६१.

निरपेक्षं मुनिं शांतं निर्वैरं समदर्शनम् । अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यङ्घ्रिरेणुभिः ॥ १६ ॥

अनन्य करितां माझें भजन । माझ्या स्वरूपीं झगटलें मन । सकळ वासना गेल्या विरोन । वृत्तिशून्य अवस्था ॥ ६२ ॥ आटाटीवीण न प्रार्थितां । अयाचित अर्थ प्राप्त होतां । तोही हातीं घेवों जातां । निरपेक्षता बुडाली ॥ ६३ ॥ अर्थ देखोनि जो लाविन्नला । तो जाण लोभें बोणवा केला । तोही उपेक्षूनि जो निघाला । तो म्यां वंदिला सर्वस्वें ॥ ६४ ॥ मार्गीं अर्थ पडतां । कोणी नाहीं माझा म्हणतां । तोही स्वयें हातीं घेतां । निरपेक्षता बुडाली ॥ ६५ ॥ वृत्तिशून्य जे अवस्था । ती नांव जाण निरपेक्षता । ते काळींची जे मननता । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ६६ ॥ वेदशास्त्रार्थें परम प्रमाण । तें माझें शुद्ध स्वरूप जाण । न ये स्वरूपीं निजनिर्धारण । त्या नांव मनन बोलिजे ॥ ६७ ॥ करितां स्वरूपविवेचन । स्वरूपरूप झालें मन । तेथें धारणेवीण मनन । करितां स्मरण होतसे ॥ ६८ ॥ या नांव मननावस्था । सत्य जाण पां सर्वथा । याहीवरी शांतीची जे कथा । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ६९ ॥ कामक्रोध सलोभता समूळ मूळेंसी न वचतां । देहीं आली जे निश्चळता । ते न सरे सर्वथा येथ शांती ॥ १७० ॥ मत्स्य धरूनियां मनीं । बक निश्चळ राहिला ध्यानीं । ते शांती कोण मानी । अंतःकरणीं सकाम ॥ ७१ ॥ देहीं स्फुरेना देहअहंता । विराली कामक्रोधसलोभता । हे शांती बाणे भाग्यवंता । मुख्य शांतता या नांव ॥ ७२ ॥ उद्धवा जाण पां निश्चितीं । मजही मानली हेचि शांती । याहीवरी जे समतेची स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७३ ॥ विचित्र भूतें विचित्र नाम । विचित्राकारें जग विषम । तेथें देखे सर्वीं सर्व सम । परब्रह्म समत्वें ॥ ७४ ॥ फाडाफाडी न शिणतां । ताडातोडी न करितां । माझेनि भजनें मद्भक्तां । सर्वसमता मद्भावें ॥ ७५ ॥ मद्भावें समता आल्या हाता । खुंटली भूतभेदाची वार्ता ।

अंघ्रिरेणुभिः पूयेय इति–याच्या चरण धुळीनें माझ्या आंत असलेल्या ब्रह्माण्डांना मी पवित्र करीन, अशा आशयानें, अहं निरपेक्षं शान्तं निर्वैरं समदर्शनं मुनिं नित्यं अनुव्रजामि–मी विरक्त, शांत, शत्रूंशींहि वैर न करणाऱ्या व सर्वत्र समब्रह्म पहाणाऱ्या मुनीला सतत अनुसरतों. (त्याच्या मागोमाग जातों.) १६.

एकनिष्ठेनें माझें भजन केलें असतां, मन माझ्या स्वरूपीं जडतें. सर्व वासना विरून वृत्तिशून्य अवस्था होते. ६२ श्रमावांचून व मागितल्यावांचून अनायासें प्राप्त झालेलें ऐश्वर्य जरी स्वीकारिलें, तरी निरपेक्षता बुडाली ! ६३ द्रव्य पाहून जो वांकला, त्याला लोभानें ओणवा केलाच म्हणून समजावें. पण त्याची उपेक्षा करून जो निघून जातो त्याला मी सर्वस्वीं वंदन करितों. ६४ रस्त्यांत पडलेल्या द्रव्याचा कोणीहि धनी सांपडला नाहीं, म्हणून त्या द्रव्याचा जरी स्वीकार केला तरी निरपेक्षता बुडाली. ६५ वृत्तिशून्य अवस्थेला निरपेक्षता म्हणतात. त्यावेळचें चिंतन तत्त्वतः सांगतों, तें ऐक. ६६ वेद-शास्त्रार्थानें परम प्रमाण म्हणून सांगितलेलें जें माझें शुद्धस्वरूप त्याचा मनानें निर्धार करणें याला मनन म्हणतात. ६७ आत्मस्वरूपाचें ध्यान करीत असतां मन तद्रूप होतें, त्यावेळीं धारणेवांचूनच स्मरणरूप मनन होतें. ६८ खरोखर तीच मननावस्था आहे, हें सर्वथा सत्य जाण. याच्याहि पुढची शांतीची कथा सांगतों. ती ऐक. ६९ काम, क्रोध व लोभ यांस समूळ सोडल्यावांचून देहाला जरी निश्चलता आली, तरी तेथें शांति सर्वथा रहात नाहीं. १७० बगळा माशाचें ध्यान करीत अगदीं निश्चल होऊन बसतो, पण त्याला शांति कोण म्हणेल ! कारण त्याचें अंतःकरण सकाम असतें. ७१ ज्याच्या देहांत देहाभिमान जागृत होत नाहीं, ज्याच्या काम-क्रोध-लोभ या सर्व वृत्ति लीन झाल्या आहेत, त्या भाग्यवंताच्याच अंगीं शान्ति बाणते. यालाच मुख्य शांतता असें म्हणतात. ७२ उद्धवा ! मला देखील हीच शान्ति मान्य आहे, हें तूं निश्चयानें जाण. आतां समतेची स्थिति तुला सांगतों, ती ऐक. ७३ हें विषम जगत् विचित्र प्राणी, विचित्र नांवें व विचित्र आकार यांनीं युक्त असतां, जो त्या सर्वांकडे परब्रह्माच्या भावनेनें समत्वानें पहातो, ७४ भूतांमध्यें वैर उत्पन्न करण्याचें मनांतहि आणीत नाहीं व कोणाशीं निष्ठुर भाषण करीत नाहीं त्या माझ्या भक्तांना माझ्या भजनानेंच मद्भावानें सर्व समता प्रतीत होते. ७५ मद्भावानें सर्वभूतसमता बाणली असतां भूतभेदाची वार्ताच खुंटते. स्वभावतः भेदशून्य होऊन

भेदशून्य स्वभावतां । निर्वैरता सहजेंचि ॥ ७६ ॥ जंववरी द्वैताचें भान । तंववरी विरोधाचें कारण । अवघा एकचि आपण । तेथ वैरी कोण कोणाचा ॥ ७७ ॥ गगन गगनासीं कैं भांडे । कीं चंद्रा चंद्रेंसीं झुंझ मांडे । कीं वायूचेनि वायु कोंडे । कीं जिव्हेचीं दुखंडें जिव्हा करी ॥ ७८ ॥ जें भेदाचें निराकरण । तेंचि निर्वैरतेचें लक्षण । उद्धवा हें सत्य जाण । निर्वैरपण या नांव ॥ ७९ ॥ निरपेक्षता आणि माझें मनन । शांती आणि समदर्शन । पांचवें तें निर्वैर जाण । पंचलक्षण हें मुख्यत्वें ॥ १८० ॥ असो पंचलक्षणकथा । एक निरपेक्षता आल्या हाता । पायां लागे सायुज्यता । पूर्णब्रह्मता ठसावे ॥ ८१ ॥ निरपेक्षाचें निश्चळ मन । निरपेक्ष तो निर्वैर जाण । निरपेक्ष तो शांत संपूर्ण । निरपेक्षाची जाण सेवा मी करीं ॥ ८२ ॥ कडेकपाटीं न रिघतां जाण । न सोशितां अतिसाधन । हें हाता आल्या पंचलक्षण । विश्वउद्धरण त्याचेनी ॥ ८३ ॥ ऐशिया भक्तांचें दर्शन । झाल्या तरती हें नवल कोण । त्यांचें करितां नामस्मरण । उद्धरण जडजीवां ॥ ८४ ॥ हें पंचलक्षण आल्या हाता । मजहोनि अधिक पवित्रता । जोडली माझ्या निजभक्तां । मीही वंदीं माथां चरणरेणु ॥ ८५ ॥ समुद्रोदक मेघीं चढे । त्यासी मधुरता अधिक वाढे । जग निववी वाडेंकोडें । फेडी सांकडें दुकाळाचें ॥ ८६ ॥ तेंचि उदक समुद्रीं असतां । उपयोगा न ये गा सर्वथा । तेवीं माझेनि भजनें मद्भक्तां । झाली पवित्रता मजहूनी ॥ ८७ ॥ केळी चाखतां चवी नातुडे । तिचींच केळें ते अतिगोडें । तेवीं मजहूनि माझ्या भक्तांकडे । पवित्रता वाढे अनिवार ॥ ८८ ॥ माझ्या ठायीं जें पवित्रपण । तें भक्तांचेनि मज जाण । यालागीं भक्तांमागें मी आपण । धांवें चरणरेणू वंदावया ॥ ८९ ॥ भक्तचरणरेणु वंदितां । मज केवढी आली पवित्रता । माझें पायवणी वाहे माथां ।

सहज निर्वैर प्राप्त होतें. जोंपर्यंत द्वैताचें भान असतें तोंपर्यंतच विरोधाचें कारण असतें. एकदां आपण सर्व एकच झाल्यावर मग कोण कोणाचा वैरी रहाणार ! ७७ आकाश आकाशाबरोबर कधीं भांडत असतें का ! किंवा चंद्रच चंद्राबरोबर कधीं युद्ध करतो का ! किंवा वायूलाच वायु कोंडीत असतो का ! किंवा जीभच जिभेचे कधीं दोन तुकडे करिते का ! ७८ उद्धवा ! भेदाचें जें निराकरण तेंच निर्वैरतेचें लक्षण आहे. हेंच खरें निर्वैरपण आहे, असें तूं जाण. ७९ निरपेक्षता, माझें मनन, शांति, समदर्शन व पांचवें निर्वैर अशीं हीं पांच मुख्य लक्षणें आहेत. १८० पांच लक्षणांची गोष्ट तर दूरच राहो, पण एक निरपेक्षता जरी हातीं आली, तरी सायुज्यता पायांशीं येतें व पूर्णब्रह्मस्वरूप ठसतें. ८१ निरपेक्ष माणसाचें मन निश्चल असतें. तो निर्वैर असतो. त्याच्या अंगीं पूर्ण शांति असते. अशा निरपेक्ष भक्ताची मी सेवा करितों. ८२ पर्वताच्या गुहा व कडे यांत न जातां, योगसाधनादि न करितां, हीं पांच लक्षणें हातीं आलीं कीं, तो सगळ्या विश्वाचा सहज उद्धार करूं शकतो. ८३ अशा भक्तांचें दर्शन झालें असतां लोक तरून जातात, यांत आश्चर्य कसलें ! त्यांचें नामस्मरण केलें असतां जड जीवांचाहि उद्धार होतो. ८४ हीं पांच लक्षणें हातीं आलीं असतां माझ्या भक्तांना माझ्याहूनहि अधिक पवित्रता येते. मी त्यांच्या पायांची धूळ मस्तकावर ठेवून वंदन करितों. ८५ समुद्राचें पाणी बाष्परूपानें मेघांत गेलें म्हणजे त्याला गोडी येते, तें पर्ज्यन्यरूपानें सर्व जगाला शांत करितें व दुष्काळाच्या संकटाचें निवारण करितें. ८६ पण तेंच पाणी समुद्रांत असतें तेव्हां जसें कोणाच्याच उपयोगीं पडत नाहीं. त्याप्रमाणें माझ्या भजनाच्या योगानें माझ्या भक्तांना माझ्याहून अधिक पवित्रता येते. ८७ केळ जर खाल्ली तर तिला चव नसते, पण तिचींच केळीं अतिशय गोड असतात. त्याप्रमाणें माझ्याहून माझ्या भक्तांत पवित्रता अतिशय वाढते. ८८ माझ्यामध्यें जो पवित्रपणा आहे तो मला भक्तामुळेंच प्राप्त झाला. म्हणून मी भक्तांच्या पायांच्या धुळीला वंदन करण्यासाठीं त्यांच्या मागें धांवत असतों. ८९ भक्ताची चरणधूळ वंदन केल्यानें मला केवढी पवित्रता आली आहे पहा. माझ्या पायांचें तीर्थ जी भागीरथी तिला

जाण तत्त्वतां सदाशिवू ॥ १९० ॥ एवं माझ्या भक्तांचें जें सुख । सुखपणें अलोलिक । तें सुख नेणती आणिक । तें बोलावया मुख सरेना ॥ ९१ ॥

निष्किञ्चना मय्यनुरक्तचेतसः शांता महान्तोऽखिलजीववत्सलाः ।
कामैरनालब्धधियो जुषन्ति यत्तन्नैरपेक्ष्यं न विदुः सुखं मम ॥ १७ ॥

मीवांचूनि ज्यांचे गांठीं । नाहीं फुटकी कांचवटी । मजवांचूनि सगळे सृष्टीं । आणिकांतें दृष्टीं न देखती ९२ ऐसें करितां माझें भजन । जाति कूळ देहाभिमान । सहजें जाय निरसोन । अकिंचन या नांव ९३ याहीवरी प्रेमयुक्त । माझ्या स्वरूपीं रंगलें चित्त । अतएव निजशांती तेथ । असे नांदत निजरूपें ९४ ऐशिया गा निजशांती । परिपाकातें पावली भक्ती । ते मीवांचूनि सर्वभूतीं । दुजी स्थिती जाणेना ९५ जो जो जीवू जेथें देखे । तो तो मद्रूपें वोळखे । ते वोळखीचेनि हरिखें । प्रीति यथासुखें अनन्य करी ॥ ९६ ॥ ऐशिया मद्रूपस्थिती । जीवमात्रीं अनन्य प्रीती । एवं मद्भावें माझी भक्ती । महंतस्थिती या नांव ॥ ९७ ॥ ऐसा मद्भावनायुक्त । सर्वीं सर्वत्र माझा भक्त । तेथ कामादि दोष समस्त । अस्तमाना जात ते काळीं ॥ ९८ ॥ सविता येतां प्राचीजवळी । मावळे नक्षत्रमंडळी । तेवीं भक्तीच्या प्रबोधकाळीं । झाली होळी कामादिकां ॥ ९९ ॥ झालिया कामाची निवृत्ती । सहजेंचि निर्विषयस्थिती । तेथें माझ्या सुखाची सुखप्राप्ती । सुखें सुख भोगिती सुखरूप ॥ २०० ॥ देशें काळें वेदानुवादा । ज्या सुखाची न करवे मर्यादा । त्या सुखाची सुखसंपदा । मद्भक्त सदा भोगिती ॥ १ ॥ ज्या सुखाचे सुखप्राप्ती ।

शंकर मस्तकावर धारण करितो. १९० अशाप्रकारें माझ्या भक्तांचें सुख मोठें अलौकिक आहे. तें भक्तांवांचून इतर कोणालाच कळत नाहीं. त्याचें वर्णन करण्यास वाणी समर्थ नाहीं. १९१.

—माझ्या भक्तांचें सुख इतकें व अशा प्रकारचें आहे असें सांगण्यास कोण समर्थ आहे ! कारण तें स्वसंवेद्य व निरुपमहि आहे, असें सांगतात—

निष्किंचनाः—ज्यांच्यापाशीं कोणत्याहि प्रकारचा परिग्रह नाहीं; **मयि अनुरक्तचेतसः**—माझ्या ठिकाणीं ज्यांचें चित्त अनुरक्त आहे, **शान्ताः महान्तः**—शांत, निरभिमान, **अखिलजीववत्सलाः**—सर्व जीवांवर प्रेम करणारे, **कामैः अनालब्धधियः**—कामांनीं ज्यांच्या चित्ताला स्पर्शहि केलेला नाहीं, **मम**—अशाप्रकारचे माझे भक्त, **यत् सुखं जुषन्ति तत् ते एव विदुः**—जें सुख अनुभवितात, त्यांनाच त्याचा लाभ होतो. **अन्ये न (विदुः)**—इतरांना त्याचा लाभ होत नाहीं. कारण, **नैरपेक्ष्यं**—ज्यांना दुसऱ्या कशाचीहि अपेक्षा नसते, त्यांनाच तें सुख प्राप्त होतें. मोक्षाची अपेक्षा करणाऱ्याहि इतरांना तें मिळत नाहीं. [किंवा अशाप्रकारचे जे भक्त माझें सेवन करितात, त्यांनाच तें नैरपेक्ष्य सुख प्राप्त होतें, इतरांना होत नाहीं.] १७.

ज्यांच्या पदरीं माझ्यावांचून फुटक्या कांचेचा तुकडाहि नसतो, ते माझ्यावांचून सगळ्या सृष्टींत दुसरें कांहींहि पहात नाहींत. ९२ अशाप्रकारें माझें भजन केलें असतां आपल्या जातीचा, कुळाचा व देहाचा अभिमान सहजच नाहींसा होतो. यालाच अकिंचन असें म्हणतात. ९३ शिवाय चित्त प्रेमयुक्त होऊन माझ्या स्वरूपांत रंगलें म्हणजे शांति तेथें स्वभावतःच नांदूं लागते ९४ अशी शांति प्राप्त झाली म्हणजे भक्ति पूर्णावस्थेस पोंचते व तो सर्व भूतमात्रांत माझ्यावांचून दुसरें कांहीं पहात नाहीं. ९५ तो ज्याला ज्याला पहातो, त्याला मद्रूपानेंच ओळखितो आणि त्याच आनंदभरांत तो त्यावर मोठ्या आवडीनें अनन्य प्रीति करितो. ९६ याप्रमाणें दृष्टि मद्रूप होऊन सर्व प्राणिमात्रांवर मद्भावानें अनन्य प्रेम करून माझी भक्ति करणें यालाच महंतस्थिति असें म्हणतात. ९७ माझा भक्त असा सर्वांवर व सर्व ठिकाणीं मद्भावनेनें युक्त झाला म्हणजे कामादि सगळे दोष तत्काल मावळतात. ९८ सूर्य पूर्वेकडे येतांच सगळें नक्षत्रमंडळ जसें मावळतें, त्याप्रमाणें भक्तीचा उदय होतांच कामादिकांचा नाश होतो. ९९ कामाची निवृत्ति झाली म्हणजे सहजच वृत्ति निर्विषय होतें व माझ्या सुखाची प्राप्ति होऊन भक्त सुखस्वरूपानें सुख भोगितो. २०० श्रुतीला देश व काल यांनीं जें सुख मर्यादित करितां येत नाहीं, ती सुखसंपत्ति माझे भक्त निरंतर भोगितात. १ त्या सुखाच्या प्राप्तीनें

विरोनि जाय चित्तवृत्ती। सुखें सुखरूप सर्वांगें होती। एवढी सुखप्राप्ती मद्भक्तां ॥ २ ॥ इतर मी सांगों कायी। मोक्षसुखाच्याही ठायीं। या सुखाची गोडी नाहीं। धन्य पाहीं हरिभक्ती ॥ ३ ॥ ऐशिया सुखाकारणें। साधक शिणती जीवेंप्राणें। तपादि शरीरशोषणें। व्रत धरणें विषयांचें ॥ ४ ॥ एक करिती योगयाग। एक करिती शास्त्रसंग। एक करिती सर्वस्वत्याग। एकीं सांडिला संग गृहदारा ॥ ५ ॥ एक फळाहारी निराहारी। एक ते नग्न ब्रह्मचारी। एक कडेकपारीं शिखरीं। गिरिकंदरीं रिघाले ॥ ६ ॥ एक ते जटाळ गांठ्याळ। एक नखधारी ढिसाळ। एक महाहटी विशाळ। एक पिसाळ मत्तमुद्रा ॥ ७ ॥ एक तांबडे बोडके। एक ते केवळ सुडके। एक तीर्थाटणें रोडके। एक ते मुके मौननिष्ठ ॥ ८ ॥ एक राख्ये एक शंख्ये। एक ते अत्यंत बोलके। एक पाणीपिशीं झालीं उदकें। कुशमृत्तिके विगुंतलीं ॥ ९ ॥ ऐशा नाना परींच्या व्युत्पत्ती। साधक शिणती नेणों किती। माझ्या भजनसुखाची प्राप्ती। नव्हे निश्चितीं कोणासी ॥ २१० ॥ जें माझ्या भक्तांचें निजसुख। तें कोणासी न पवेचि देख। स्वप्नींही त्या सुखाचें मुख। अनोळख पैं झालें ॥ ११ ॥ चंद्रकिरणींचें अमृत। जेवीं वायसां अप्राप्त। तेवीं माझें निजसुख निश्चित। नव्हेचि प्राप्त अभक्तां ॥ १२ ॥ थानीं लागल्या गोचिडा। अशुद्धचि आवडे मूढा। जवळिल्या क्षीरा वरपडा। नव्हेचि रोकडा अभाग्यें ॥ १३ ॥ तेवीं सांडोनि माझी भक्ती। नाना साधनीं व्यर्थ शिणती। त्यांसी माझ्या निजसुखाची सुखप्राप्ती। नव्हे निश्चितीं उद्धवा ॥ १४ ॥ जिहीं माझ्या भजनपरवडी। केली भक्तीची कुळवाडी। ते माझ्या निजसुखाची गोडी। पावले रोकडी आत्यंतिक ॥ १५ ॥ ज्या निजसुखाच्या ठायीं। शिळेपणाची भाषाचि नाहीं। विटों नेणें कल्पांतींही। इंद्रियांचा कांहीं न पडे पांगू ॥ १६ ॥ जें जें

चित्तवृत्ति जागच्याजागीं विरून जाते व सर्वांग सुखमय होतें, इतकी माझ्या भक्तांना सुखप्राप्ति होते. २ फार काय सांगावें ! पण मोक्षसुखांतहि या सुखासारखी गोडी नाहीं. हरिभक्ति धन्य होय. ३ अशा सुखासाठीं साधक जीवापाड श्रम करून क्लेश सहन करितात. तपादिकांच्या योगें शरीरास क्लेश देऊन विषयांचें नियमन करितात; ४ कोणी योग-याग करितात; कोणी शास्त्राभ्यास करितात; कोणी सर्वसंगपरित्याग करितात; कोणी घर, स्त्री-पुत्र सोडून देतात; ५ कोणी फळाहार करितात; कोणी निराहार करितात; कोणी नग्न ब्रह्मचारी होऊन फिरतात, तर कोणी पर्वतांच्या गुहा, दरी, खोरीं यांत जातात किंवा गिरिशिखरावर जाऊन बसतात; ६ कोणी जटा ठेवितात; कोणी वटाच्या चिकानें केसांच्या गांठीं बांधितात; कोणी लांबलांब नखें वाढवितात; कोणी भयंकर हठयोग करितात; कोणी पिशाचासारखें उन्मत्त मुद्रेनें स्वैर वागतात; ७ कोणी तांबडीं वस्त्रें नेसतात व मुंडन करितात; तर कोणी चिंध्या पांघरतात; कोणी तीर्थयात्रेनें शरीर कृश करीत फिरतात; कोणी मौन धरून बसतात; ८ कोणी अंगाला राख फासतात; तर कोणी शंख वाजवीत हिंडतात; कोणी सारखी बडबड करितात; कोणाला त्रिकाल स्नानाचेंच वेड लागतें; कोणी दर्भ व माती यांतच गुंतलेले असतात. ९ असे अनेक साधक अनेक साधनांनीं आपल्या देहाला किती शिणवीत असतात, त्याची सीमा नाहीं. परंतु माझ्या भजनसुखाची प्राप्ति मात्र या कोणालाहि होत नाहीं. २१० माझ्या भक्तांना मिळणारें आत्मसुख कोणालाच मिळत नाहीं. त्यांना स्वप्नांतहि त्या सुखाचें तोंड दिसत नाहीं. ११ चंद्रकिरणाचें अमृत जसें कावळ्याला मिळत नाहीं, त्याप्रमाणें माझें आत्मसुख अभक्तांना लाभत नाहीं. १२ गायीच्या आचळाला लागलेली गोचिड तिचें रक्त मोठ्या आवडीनें प्राशन करीत असते; पण तो अभागी प्राणी प्रत्यक्ष जवळ असलेल्या दुधाला मुकतो. १३ त्याप्रमाणेंच हे उद्धवा ! माझी भक्ति सोडून जे अनेकप्रकारच्या साधनांचे व्यर्थ कष्ट करितात, त्यांना केव्हांहि आत्मसुख प्राप्त होत नाहीं. १४ ज्यांनीं माझ्या भजनानें भक्तीची लागवड केलेली असते त्यांना माझ्या आत्यंतिक आत्मसुखाची गोडी खात्रीनें मिळते. १५ त्या माझ्या आत्मसुखांत शिळेपणाचें नांवहि नाहीं, कल्पांतींहि त्याचा वीट येत नाहीं, इंद्रियांना संकटहि पडत नाहीं. १६

विषयांचें सुख । तें तें इंद्रियां पांगिस्त देख । अपांगिस्त भक्तिसुख चोख । सभाग्य लोक पावती ॥ १७ ॥ जें सुख भोगितां पाहीं । देही तोचि होय विदेही । तें सुख माझ्या भक्तांच्या ठायीं । प्रकटलें कांहीं लोपेना ॥ १८ ॥ हे उत्तमोत्तम भक्त पाहीं । सुख पावले नवल कायी । परी केवळ जे विषयी । भजनें त्यांही सुखप्राप्ती ॥ १९ ॥ भाग्यवशें सत्संगती । आस्तिक्यभावें अनन्य स्थिती । अल्पही माझी घडल्या भक्ती । विषयनिवृत्ती तेणें होय ॥ २२० ॥

बाध्यमानोऽपि मद्भक्तो विषयैरजितेन्द्रियः । प्रायः प्रगल्भया भक्त्या विषयैर्नाभिभूयते ॥ १८ ॥

माझ्या ठायीं अनन्य प्रीती । प्रेमयुक्त भजनस्थिती । ऐशियां भक्तां विषय बाधिती । हे व्याख्यानस्थिती केवीं घडे ॥ २१ ॥ आवडी करितां माझी भक्ती । विषयवासना जळून जाती । तेथ उपजे विषयासक्ती । हे कोणें युक्ती मानावी ॥ २२ ॥ आरिसा उटितां उजिळे । तेवीं भक्तीनें विषयो क्षाळे । तेथ विषयासक्ती खवळे । हें निरूपण कोंवळें साधारण ॥ २३ ॥ केवळ जो विषयासक्त । संसारी प्रपंचयुक्त । तोही प्रसंगें झालिया भक्त । होय विरक्त तें ऐक ॥ २४ ॥ जीवीं भक्ती लागली गोड । नाहीं मावळली विषयचाड । ऐसें उभय अवघड । अतिसांकड जयासी ॥ २५ ॥ तेणें मुख्यत्वें ध्यावी भक्ती । गौण धरावी विषयासक्ती । तिचीही होय विरक्ती । ऐक ते युक्ती सांगेन ॥ २६ ॥ लवणासी मिळतां जळ । विरवूनि सांडी तत्काळ । तेवीं भक्ती वाढविल्या प्रबळ । विषयमंडळ विभांडी ॥ २७ ॥ यापरी भजनपरिपाटीं । विषयांसी पडे तुटी । निजसुखाची लाभे भेटी । पडे मिठी स्वानंदें ॥ २८ ॥ मज पाहिजे विषयनिवृत्ती । या हेतू केली नाहीं भक्ती । म्हणाल विषयांची विरक्ती । कोणे

कारण जेवढें विषयजन्यसुख तेवढें इंद्रियांच्या स्वाधीन असतें. भक्तिसुख इंद्रियांवर अवलंबून नाहीं. तें भाग्यवान् लोकांनाच लाभतें. १७ ज्या सुखाच्या भोगानें भक्त देहवान असतांच विदेही होतो, तें सुख एकदां माझ्या भक्तामध्यें प्रकट झालें म्हणजे पुनः लोपत नाहीं. १८ माझे जे उत्तम श्रेष्ठ भक्त आहेत, त्यांना हें सुख प्राप्त झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें ! पण जे केवळ विषयासक्त असतात, त्यांनाहि माझ्या भजनानें हें सुख मिळतें. १९ दैवयोगानें सत्संगति लाधली असतां मनांत आस्तिक्यभाव उत्पन्न होतो व त्यायोगें माझी अल्प जरी भक्ति घडली तरी विषयनिवृत्ति होते. २२०.

'उद्धवा ! माझ्या उत्तम भक्ताची गोष्ट तर राहूंच दे. पण माझा प्राकृत भक्तहि कृतार्थ होतो' असें आतां भगवान् पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

अजितेंद्रियः मद्भक्तः विषयैः बाध्यमानः अपि—जितेंद्रिय नसलेला माझा भक्त विषयांकडून आकर्षण केला जात असला तरी, प्रगल्भया भक्त्या प्रायः विषयैः न अभिभूयते—समर्थ भक्तीनें प्रायः विषयांकडून पराभूत होत नाहीं. १८.

माझ्यावर अनन्य प्रीति ठेवून प्रेमळपणें माझें भजन करणाऱ्या माझ्या भक्तांना विषय बाधतील अशी विपरीत गोष्ट घडेल तरी कशी ! आवडीनें माझी भक्ति केली असतां सर्व विषयवासना जळून जातात; तेव्हां विषयासक्ति उत्पन्न होईल ही गोष्ट कोण खरी मानील ! २२ आरसा घांसला असतां जसा स्वच्छ होतो, त्याप्रमाणें भक्तीनें विषय धुवून जातात. तेव्हां विषयासक्ति खवळते हें बोलणें फोल आहे. २३ जो केवळ विषयासक्त, संसारी, प्रपंचांत गढलेला मनुष्य असतो, तोहि प्रसंगानें भक्त झाला असतां त्याला विरक्ति येते. त्याविषयींच सांगतों, तें ऐक. २४ त्याच्या जीवाला भक्तीची गोडी लागते; पण विषयासक्ति मावळलेली नसते, अशा दोन प्रकारच्या पेंचांत सांपडून तो मोठ्या संकटांत पडला, २५ म्हणजे त्यानें भक्ति मुख्य समजावी व विषयासक्ति गौण मानावी. तिचीहि विरक्ति येण्याची युक्ति सांगतों. २६ ती ऐक. मीठ पाण्यांत पडतांच तें तत्काल जसें विरून जातें, त्याप्रमाणें भक्तीचें सामर्थ्य वाढविल्यास तें विषयांचें जाळें तोडितें. २७ याप्रकारें भजनाच्या अभ्यासानें विषयांना तोडून आत्मसुखाचा लाभ होतो व स्वानंदाला मिठी पडते. २८ पण मला विषयनिवृत्ति पाहिजे, म्हणून मीं भक्ति केली नाहीं, तेव्हां विषया

युक्ती घडे त्यां ॥ २९ ॥ येचिविषयीं उत्तर । सांगताहे शार्ङ्गधर । दीपाचा पेटल्या वैश्वानर । तो जाळील घर नगर तैसें हें ॥ २३० ॥

यथाऽग्निः सुसमृद्धार्चिः करोत्येधांसि भस्मसात् । तथा मद्विषया भक्तिरुद्धवैनांसि कृत्स्नशः ॥ १९ ॥

दीप लावावयालागुनी । सोज्वळ केला जो वन्ही । तो अवचटें पडला वनीं । तिडिकी उडोनी तृणांकुरीं ॥ ३१ ॥ तो अनिश्चितूचि एकसरें । कोपटें आणि धवळारें । नगरें पुरें मंदिरें । गिरिकंदरें भस्म करी ॥ ३२ ॥ तैशी अल्पही माझी भक्ती । श्रद्धायुक्त प्रवेशल्या चित्तीं । संचित क्रियमाण पापपंक्ती । होय जाळिती निःशेष ॥ ३३ ॥ पूर्वपापाचे समूळ मळ । चित्तीं जडलें होते प्रबळ । तें चित्त अतिचंचळ । विषयीं व्याकुळ सर्वदा ॥ ३४ ॥ त्यासी माझिया भक्तिलेशें । पूर्वपापांचा समूह नासे । जेवीं कां कर्पूर दीपस्पर्शें । निःशेष नासे तत्काळ ॥ ३५ ॥ ऐसें निर्मळ झालिया चित्त । ब्रह्म प्रकाशे सदोदित । मग तें नव्हे विषयासक्त । होय विरक्त अनिच्छितां ॥ ३६ ॥ भक्तिलेशाची एवढी गरिमा । तो संपूर्ण भक्तीचा महिमा । कोण जाणे भक्तोत्तमा । आगमनिगमां अतर्क्य ॥ ३७ ॥ अलक्ष्य लक्षेना माझी भक्ती । अतर्क्य तर्केना शास्त्रयुक्तीं । अगाध नाकळे निश्चितीं । साधनव्युत्पत्ती शिणतांही ॥ ३८ ॥ पूर्ण माझे भक्तीचा पार । मजही न कळे साचार । यालागीं मी भक्तांचा आज्ञाधार । नुल्लंघीं उत्तर सर्वथा ॥ ३९ ॥ अगाध भक्तांची थोरी । यालागीं मीही सेवा करीं । भक्तपद धरिलें उरीं । वंदी शिरीं अंघ्रिरेणू ॥ २४० ॥ भक्त म्हणवितां वाटे गोड । भजनमुद्रा अतिअवघड । भक्तीचें अंतर अतिगूढ । न

विरक्ति येण्यास कोणती युक्ति योजावी ! २९ म्हणून विचाराल तर याचें उत्तर श्रीकृष्ण सांगत आहे. दिव्यापासून अग्नि भडकला असतां तो जसा घर, शहर इत्यादि सर्व जाळून फस्त करितो, त्याचप्रमाणें ही भक्ति आहे. २३०.

उद्धव–हे उद्धवा ! यथा सुसमृद्धार्चिः अग्निः एधांसि भस्मसात् करोति–ज्याप्रमाणें स्वयंपाकासाठीं पेटविलेला अग्नि काष्ठांचें भस्म करितो, तथा मद्विषया भक्तिः एनांसि कृत्स्नशः दहति–त्याप्रमाणें विषयासक्ति इत्यादि निमित्तानें केलेली भक्तीहि जर माझ्याविषयींच असेल, तर ती सर्व पापांना जाळून भस्म करिते. [भगवानहि आपल्या माहात्म्यानें आश्चर्यचकित होऊन ' अरे उद्धवा ! हा चमत्कार ऐक, ' अशा आशयानें येथें त्याला संबोधित आहेत.] १९.

दिवा लावण्यासाठीं म्हणून जो अग्नि पेटविला, तोच जर अकस्मात् वनांत पडला तर त्याची ठिणगी गवतावर पडून ३१ आग लावण्याची इच्छा नसतांहि झोंपड्या, घरें, शहरें, गांवें, देवळें व पर्वताच्या गुहा या सर्वांना जसा जाळून भस्म करितो, ३२ त्याप्रमाणें माझ्या भक्तिलेशानें जरी श्रद्धेनें चित्तांत प्रवेश केला तरी तो संचितकर्म म्ह० अनंत जन्मींच्या पाप-पुण्याचा संचय व आगामि म्ह० वर्तमान क्षणापासून मरेपर्यंत होणारें कर्म व पातकांच्या राशी, यांना जाळून भस्म करितो. ३३ पूर्वजन्मींच्या पापामुळें चित्तावर जो मळ बसलेला असतो, त्यामुळें चित्त अत्यंत चंचळ व विषयांसाठीं सदा व्याकुळ होतें. ३४ कापूर जसा दिव्याचा स्पर्श होतांच तत्काल नाहींसा होतो तसा माझ्या केवल भक्तिलेशानें पूर्वजन्मींच्या पातकांचा समूल नाश होतो. ३५ अशाप्रकारें चित्त एकदां निर्मळ झालें कीं, त्यांत सदोदित ब्रह्म प्रकाशतें. मग तें विषयासक्त होत नाहीं. निरिच्छेनें विरक्त होतें. ३६ भक्तिलेशाचा जर एवढा मोठा महिमा, तर मग पूर्ण भक्तीचा प्रभाव कोणाला कळणार ! हे भक्तश्रेष्ठा उद्धवा ! तो वेद-शास्त्रांनाहि अतर्क्य आहे ! ३७ माझी भक्ति लक्षित होत नाहीं. माझी भक्ति अतर्क्य असल्यामुळें शास्त्रांनाहि तिचें अनुमान करितां येत नाहीं. साधनाच्या अनुष्ठानानें कितीहि जरी शिणलें, तरी अगाध असलेली भक्ति हातीं लागत नाहीं. ३८ माझ्या पूर्ण भक्तीचा मलाहि थांग लागत नाहीं. म्हणून तर मी माझ्या भक्तांचा आज्ञाधारक होऊन रहातों व त्याच्या शब्दाचें कधीं उल्लंघन करीत नाहीं. ३९ माझ्या भक्तांची थोरवी अशी अगाध आहे, म्हणून मी त्यांची सेवा करितों. मीं भक्तांच्या पायांचें चिन्ह हृदयावर धारण केलें आहे व त्यांच्या पायाच्या धुळीचे कण मस्तकावर ठेवून त्यांस वंदन करीत असतों. २४० भक्त म्हणवून घेणें मोठें गोड वाटतें खरें, पण माझ्या भजनाचें स्वरूप फार कठिण आहे. भक्तीचें रहस्य अत्यंत गूढ आहे. तें श्रुति-स्मृतींनाहि उघड करून सांगतां येत नाहीं.

कळे उघड श्रुतिशास्त्रां ॥ ४१ ॥ ज्ञान सांगतां अतिसुगम । भक्तिरहस्य गुह्य परम । अकृत्रिम उपजे प्रेम । ऐसें हें वर्म लाविल्या न लगे ॥ ४२ ॥ कृपण जरी दूरी जाये । तो घरींचें ठेवणें जीवीं वाहे । तैसें माझें प्रेम पाहे । जो हृदयीं वाहे सर्वदा ॥ ४३ ॥ कां गर्भ संभवल्यापाठीं । उल्हासें वाढवी गोरटी । तैशी माझ्या प्रेमाची पोटीं । आवडी मोटी जैं होय ॥ ४४ ॥ जैसे वंध्या गर्भाचे डोहळे । तैसे माझ्या प्रेमाचे सोहळे । पोटांतलेनि कळवळें । उल्हास बळें चढोवढी ॥ ४५ ॥ सदैव जांवयी आल्या घरा । जेवीं सर्वस्व वेंची सुंदरा । तेवीं माझा कळवळा पुरा । ज्याच्या जिव्हारा वोसंडे ॥ ४६ ॥ बीज अधिकाधिक पेरितां । उल्हास कृषीवळाचे चित्ता । तेवीं सर्वस्व मज अर्पितां । तैशी उल्हासता जैं होये ॥ ४७ ॥ सगुण सुरूप समर्थ भर्ता । निघोन गेलिया तत्त्वतां । त्यालागीं तळमळी जैशी कांता । तैशी कळवळता जैं उठी ॥ ४८ ॥ त्या नांव गा माझी भक्ती । उद्धवा जाण निश्चितीं । जे भक्तीसी मी भुलोनि श्रीपती । भक्तांहातीं आतुडलों ॥ ४९ ॥ चढत्या आवडीं माझी प्रीती । तेचि जाण पां माझी भक्ती । ऐसा भक्तीचा महिमा श्रीपती । स्वयें उद्धवाप्रती सांगत ॥ २५० ॥ आवडी धरोनि पोटेंसी । देवो सांगे उद्धवासी । माझी भक्ती ते जाण ऐशी । अखंड जीपाशीं मी असें ॥ ५१ ॥ संसारतरणोपायीं । हेचि एक मुख्य पाहीं । मोक्ष लागे इच्या पायीं । इतर साधनें कायी बापुडीं ॥ ५२ ॥ मी तंव अजित लोकीं तिहीं । त्या मज भक्तप्रतापें पाहीं । जिंतोनियां ठायींच्याठायीं । भावबळें पाहीं स्ववश केलों ॥ ५३ ॥ यालागीं सर्व विजयांचे माथां । माझी भक्तीची गा सर्वथा । ऐक पां तेही कथा । तुज मी तत्त्वतां सांगेन ॥ ५४ ॥

---

४१ ज्ञान सांगण्यास फार सोपें आहे, पण भक्तीचें रहस्य अति गहन आहे. अकृत्रिम प्रेम उत्पन्न होणें हें भक्तीचें वर्म कांहीं केल्या कळत नाहीं. ४२ कृपण मनुष्य कितीहि दूर देशीं गेला, तरी घरीं ठेवलेल्या द्रव्याकडेच त्याचें मन जसें गुंतलेलें असतें, त्याप्रमाणें जो मजविषयींचें प्रेमच सर्वदा चित्तांत वागवितो; ४३ किंवा गर्भधारणा झाल्यावर स्त्री जशी मोठ्या उल्हासानें त्याला वाढवीत असते, त्याप्रमाणें त्या भक्ताला माझ्या भजनाची फार आवड असते; ४४ वंध्य स्त्रीला प्रथमच डोहाळे लागले म्हणजे ते सोहाळे जसे हौसेनें पुरवितात, तसे माझ्या प्रेमाचे सोहाळे अंतःकरणापासून मोठ्या चढा-ओढीनें व उल्हासानें जो पुरवितो; ४५ किंवा ऐश्वर्यसंपन्न जांवई घरीं आला असतां सासू जशी त्याच्यासाठीं सर्व खर्चीं घालिते, त्याप्रमाणें त्या माझ्या भक्ताचें अंतःकरण माझ्या कळवळ्यानें भरून येतें; ४६ शेतकरी जसे अधिक अधिक बीज पेरीत जातो, तसा त्याचा उल्हास जास्तजास्तच वाढत जातो, त्याप्रमाणें त्या माझ्या भक्ताला मला सर्वस्व अर्पण करण्यांत अधिक उल्हास वाटतो; ४७ गुणवान्, रूपवान् व धनवान् असा पति दूर देशीं गेला असतां त्याच्या विरहानें स्त्री जशी तळमळत असते, त्याप्रमाणें त्या भक्ताचें अंतःकरण माझ्या वियोगानें तळमळत असतें. ४८ हे उद्धवा ! याचेंच नांव खरी भक्ति. मी श्रीपति ज्या भक्तीला भुलून भक्तांच्या हातीं अडकून पडलों, तीच ही भक्ति जाण. ४९ माझ्यावरील प्रेमानें माझी जास्तजास्त आवड उत्पन्न होणें, हीच माझी खरी भक्ति होय. अशाप्रकारें भक्तीचा महिमा श्रीकृष्णानें स्वतः उद्धवाला सांगितला. २५० देवानें उद्धवाला आवडीनें पोटाशीं धरून सांगितलें कीं, जिच्यापाशीं मी अखंड असतों ती माझी भक्ति अशी आहे. ५१ संसारसागरांतून तरून जाण्यास भक्तीच मुख्य उपाय आहे. मोक्षहि जर तिचे पाय धरितो, तर मग बापड्या इतर साधनांची काय कथा ! ५२ मी जो त्रिभुवनालाहि अजिंक्य, त्या मला या भक्तांच्या प्रभावानें जागच्याजागीं जिंकिलें व आपल्या भक्तिबळानें मला वश करून ठेविलें. ५३ यास्तव संसारावर मिळविल्या जाणाऱ्या सर्व जयांमध्यें माझी भक्तीच सर्वांत श्रेष्ठ आहे. तीच कथा तुला आतां तत्त्वतः सांगतों, ती ऐक. २५४.

न साधयति मां योगो न सांख्यं धर्म उद्धव । न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता ॥ २० ॥
भक्त्याऽहमेकया ग्राह्यः श्रद्धयाऽऽत्मा प्रियः सताम् ।
भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वापाकानपि सम्भवात् ॥ २१ ॥

सांख्य जें कां नित्यानित्य । कर्म जें कां नित्यनैमित्य । अष्टांगयोग समस्त । नव्हती समर्थ मत्प्राप्ती ॥ ५५ ॥ स्वाध्याय जें वेदाध्ययन । तप जें वातांबुपर्णाशन । त्याग जो संन्यासग्रहण । माझे भक्तीविण बापुडीं ॥ ५६ ॥ जैशी नाकेंवीण बरव । कां शिरेंवीण अवयव । भर्तारेंवीण अहेव । जाण पां तो सर्व विटंबू ॥ ५७ ॥ तैसें माझे भक्तीविण । सकळ साधनें बापुडीं जाण । मज पावावया समर्थपण । नाहीं आंगवण समस्तां ॥ ५८ ॥ तैशी नव्हे माझी भक्ती । चढती वाढवून माझी प्रीती । तत्काळ करी माझी प्राप्ती । नव्हे पंगिस्ती आणिकाची ॥ ५९ ॥ जेव्हां उपजली माझी भक्ती । तेव्हांच झाली माझी प्राप्ती । हें पुनःपुन्हां उद्धवाप्रती । हरिखें श्रीपती सांगत ॥ २६० ॥ रत्नासवें जैशी दीप्ती । अरुणासवें जेवीं गभस्ती । तेवीं भक्तीपाशीं मी श्रीपती । असें निश्चिती उद्धवा ॥ ६१ ॥ ते भक्ती लागे ज्याच्या चित्तीं । तैं मी सांपडलों त्याच्या हातीं । आणिकां साधनाचे प्राप्ती । विनाभक्ती मी नातुडें ॥ ६२ ॥

इतर साधनें व्युत्पत्ती । दूरी सांडूनि परतीं । श्रद्धायुक्त माझी भक्ती । धरिल्या हातीं मी लाभें ॥ ६३ ॥ निर्विकल्प निःसंदेहो । सर्व भूतीं भगवद्भावो । हा भक्तीचा निजनिर्वाहो । भजनभावो या

—म्हणूनच या भक्तीसारखें दुसरें साधन नाहीं, असें पुढील श्लोकांनीं सांगतात—

यथा–ज्याप्रमाणें, मम उर्जिता भक्तिः–माझी उत्कृष्ट भक्ति माझी प्राप्ति करून देते, तथा–त्याप्रमाणें, उद्धव–हे उद्धवा ! मां योगः न साधयति–योग माझी प्राप्ति करून देत नाहीं. न सांख्यं धर्मः स्वाध्यायः तपः त्यागः न–तत्त्व-विवेक, धर्म, वेदाध्ययन, तप संन्यास यांतीलहि कांहीं माझी प्राप्ति करून देत नाहीं, अहं सतां प्रियः आत्मा श्रद्धया एकया भक्त्या ग्राह्यः–मी साधूंना प्रिय असलेला आत्मा श्रद्धेनें केलेली जी अनन्यभक्ति तिच्यायोगानें प्राप्त होतो. संभवात् श्वपाकान् अपि मन्निष्ठा भक्तिः पुनाति–जन्मदोषामुळें चांडाळ झालेल्यानाहि माझ्या ठिकाणची भक्ति पावन करिते. २०-२१.

सांख्यांचा नित्यानित्यविवेक, मीमांसकांचें नित्य-नैमित्तिक कर्म, योग्यांचा अष्टांग योग हीं सर्व माझी प्राप्ति करून देण्यास समर्थ नाहींत. ५५ स्वाध्याय म्ह० वेदांचें अध्ययन, वायु, जल व वृक्षाचीं पिकलेलीं गळून पडलेलीं पानें यांचें सेवन करणें, हें तप; त्याग म्ह० संन्यासदीक्षा घेणें; हीं सगळीं साधनें माझ्या भक्तीवांचून दीनवाणीं आहेत. ५६ नाकावांचून जसें सौंदर्य, किंवा मस्तकावांचून जसे शरीराचे अवयव, किंवा पतीवांचून एखादीला सवाष्ण म्हणणें, ही तिची केवल विटंबना आहे, ५७ त्याप्रमाणें माझ्या भक्तीवांचून हीं सगळीं साधनें केवळ बापडीं होतात. मला प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य एकाच्याहि अंगीं नाहीं, ५८ पण माझी भक्ति तशी नाहीं. ती मजवरील प्रीति अधिक अधिक वाढवून तत्काल माझी प्राप्ति करून देते. ती दुसऱ्या कोणावरहि अवलंबून नाहीं. ५९ ज्याक्षणीं माझी भक्ति उत्पन्न होते, त्याचक्षणीं माझी प्राप्ति झाली असें समजावें, असें श्रीकृष्णानें उद्धवाला पुनः पुनः आनंदानें सांगितलें. २६० हे उद्धवा ! रत्नाबरोबर जसें त्याचें तेज असतें, अरुणाबरोबर जसा सूर्य असतो, तसा माझ्या भक्तीबरोबर मी श्रीपति असतों. ६१ ही भक्ति ज्याच्या चित्तावर ठसते, त्याच्या हातांत मी सांपडतों, भक्तीवांचून आचरिलेल्या कोणत्याहि साधनानें मी प्राप्त होत नाहीं. २६२.

शास्त्रादि इतर सर्व साधनें दूर टाकून श्रद्धेनें माझी भक्ति केल्यास माझा लाभ होतो. ६३ मनांत कांहीं विकल्प न आणितां व कांहीं संशय न ठेवितां सर्व प्राण्यांत भगवद्भाव पहाणें हेंच माझ्या भक्तीचें खरें स्वरूप

नांव ॥ ६४ ॥ होऊनि सर्वार्थीं उदास । माझ्या भजनाचा उल्हास । न धरी मोक्षाचा अभिलाष । एवढा विश्वास मद्भजनीं ॥ ६५ ॥ तेथें तरें की न तरें । हा विकल्प कोठें उरे । माझेनि भजनें निर्धारें । केले पाठिमोरे विधिवाद ॥ ६६ ॥ एवढा विश्वासी ज्याचा भावो । न धरी भक्तीवेगळा उपावो । आम्हां त्याचेनि जीवें जीवो । तो आत्मा पहा वो पैं माझा ॥ ६७ ॥ जो मी ज्ञानियांचा आत्मा । भक्तांचा प्रिय परमात्मा । शास्त्रीं प्रतिपादिती पुरुषोत्तमा । तो मी साउमा त्या धांवें ॥ ६८ ॥ मज आवडे अनन्य भक्ती । मी त्यांचा अंकित निश्चितीं । त्यांचेनि माझी त्रैलोकीं ख्याती । मज महंती त्यांचेनि ॥ ६९ ॥ त्यांचेनि मज खाणें जेवणें । त्यांचेनि मज लेणें नेसणें । त्यांचेनि जीवेंप्राणें । म्यां वर्तणें सर्वत्र ॥ २७० ॥ माझे गांठी कांहीं नाहीं । भक्तीं सर्वस्वें वेंचूनि पाहीं । नाना उपचारउपायीं । महत्त्व तिहीं मज दिधलें ॥ ७१ ॥ मज अचक्षूसी दिधले डोळे । अश्रोत्रा श्रवण दिधले । मज अमुखा तिहीं मुख केलें । त्यांचेनि बोलें मी बोलका ॥ ७२ ॥ मज त्यांचेनि गमनागमन । त्यांचेनि मज अवयव अळंकरण । त्यांचेनि मज नेमस्त स्थान । मज समर्थपण त्यांचेनि ॥ ७३ ॥ मज नामरूप तिहीं करणें । मज पवित्रता त्यांचेनि गुणें । मज वैकुंठींचें ठाणें । भक्तीं अचळपणें दिधलें ॥ ७४ ॥ येथवरी निजभक्तांसी । मी वश्य झालों भक्तीपाशीं । यालागीं अहर्निशीं । मी भक्तांपाशीं तिष्ठतू ॥ ७५ ॥ मी अजन्मा त्यांचेनि जन्म धरीं । मी अकर्मा त्यांचेनि कर्म करीं । त्यांचेनि बोलें उद्धरीं । नाममात्रें महा पापियां ॥ ७६ ॥ नारदवचनासाठीं । वाल्मीकि परम पापी सृष्टीं । म्यां वंद्य केला वैकुंठीं । नामपरिपाटीं पवित्रत्वें ॥ ७७ ॥ येथवरी भक्तीची सत्ता । मजवरी चाले तत्त्वतां । भक्तीवेगळा सर्वथा । मी न ये हाता कोणाचे ॥ ७८ ॥ भक्तांच्या उपकारतां । मी थोर दाटलों तत्त्वतां । नव्हेचि प्रत्युपकारता । आधीन सर्वथा यालागीं ॥ ७९ ॥ त्यालागीं

आहे. यालाच भजनभाव म्हणतात. ६४ इतर सर्व विषयांविषयीं उदास होऊन, मोक्षाचीहि इच्छा न ठेवितां माझ्या भजनांतच आनंद वाटूं लागतो. इतकी माझ्या भजनावर श्रद्धा बसली कीं, ६५ मग मी तरेन किंवा नाहीं हा विकल्प तरी कोठून रहाणार ! माझ्या निश्चित भजनानें विधि-निषेधशास्त्रालाहि तुच्छ करून टाकिलें. आहे. ६६ इतक्या श्रद्धेनें जो भक्ति करितो, जो भक्तीवांचून दुसरा उपाय जाणत नाहीं, ज्याच्या जीवनानेंच आम्ही जिवंत रहातों, तो माझा आत्माच होय. ६७ मी जो ज्ञानी लोकांचा आत्मा, भक्तांचा प्रिय परमात्मा, शास्त्रानें ज्याचें 'पुरुषोत्तम' असें प्रतिपादन केलें आहे तो मी त्यांस धांवत सामोरा जातों. ६८ मला अनन्य भक्ति आवडते. मी निश्चयानें भक्तांचा दास होतों. त्यांच्यामुळेंच माझी त्रिभुवनांत प्रसिद्धि झाली आहे. त्यांच्यामुळेंच मला महत्त्व प्राप्त झालें. ६९ त्यांच्यामुळेंच मला खाणें, पिणें, जेवणें, नेसणें, पांघरणें मिळतें. त्यांच्या प्राणाच्या बळावर मी सर्व ठिकाणीं स्वतंत्र संचार करितों. २७० माझ्या पदरीं कांहीं नाहीं. माझ्या भक्तांनीं आपलें सर्वस्व खर्च करून, नाना उपचारांच्या उपायांनीं मला महत्त्व दिलें. ७१ मी जो चक्षुरहित त्या मला नेत्र दिले. मी कर्णरहित असतां मला कान दिले. मी मुखरहित असतां त्यांनींच मला मुख दिलें व त्यांच्याच वाणीनें मी बोलणारा झालों. ७२ त्यांच्यामुळेंच मला जाणें, येणें, अवयव, भूषणें प्राप्त झालीं; त्यांच्यायोगेंच मला नियमित स्थान व समर्थपण आलें. ७३ त्यांनींच मला नांव, रूप व पवित्रत्व दिलें. भक्तांनींच मला वैकुंठाचें अढळपद दिलें. ७४ येथपर्यंत मी माझ्या भक्तांच्या अधीन होऊन भक्तीजवळ राहिलों व त्यामुळेंच रात्रंदिवस मी माझ्या भक्तांपाशींच असतों. ७५ मी जन्म रहित असून त्यांच्यामुळें जन्म घेतों; मी कर्मरहित असून त्यांच्यासाठीं कर्म करितों व त्यांच्या शब्दासाठीं केवळ नामस्मरणानें महापातकी जनांचाहि उद्धार करितों. ७६ सगळ्या जगांत महापापी असलेल्या वाल्मीकीला मीं केवळ नारदाच्या शब्दासाठीं नामस्मरणाच्या पवित्रपणानें वंद्य केला. ७७ माझ्यावर भक्तांची अशी सत्ता चालते, भक्तीवांचून मी केव्हांहि कोणाच्या हातीं येत नाहीं, ७८ भक्तांच्या उपकाराखालीं मी इतका वाकून गेलों आहें कीं, मला त्यांच्या उपकाराची फेडच करितां येत नाहीं, म्हणून तर मी त्यांच्या पूर्ण अधीन होऊन

व्हावया उतरायी । माझे गांठीं कांहींच नाहीं । लटकुफटकु दीधलें कांहीं । ते हळूचि पाहीं सांगेन ॥ २८० ॥ भक्त माझेनि सनाथ । माझेनि झाले ते कृतकृत्य । माझेनि आनंदें ते सदा तृप्त । वोसंडत निजबोधें ॥ ८१ ॥ माझेनि बळें जगजेठी । घायेंवीण छेदिती सृष्टी । माझेनि बळें त्यांचे दृष्टी-। संमुख नुठी कळिकाळ ॥ ८२ ॥ माझेनि न माती लोकीं तिहीं । माझेनि ते देहीं विदेही । माझेनि बळें पाहीं । प्रळयकाळ तिहीं प्राशिला ॥ ८३ ॥ माझेनि बळें जाण । विभांडिलें जन्ममरण । माझें करोनियां भजन । ब्रह्म सनातन ते झाले ॥ ८४ ॥ हेंही नाहीं म्यां दीधलें । भजनबळें तिहीं नेलें । त्यांसीं माझें कांहीं न चले । सर्वस्व लुटिलें निजभक्तीं ॥ ८५ ॥ भक्तीं भजनभावबळें । अजिता मातें तिहीं जिंकिलें । जिंकोनि आपण्या वश्य केलें । माझें निजपद नेलें निजभक्तीं ॥ ८६ ॥ एवं माझ्या निजपदाची सत्ता । जरी आली भक्तांच्या हाता । तरी स्वामित्व ठेवूनि माझे माथां । माझे भक्तिपंथा विनटले ॥ ८७ ॥ ते माझे भक्तीची पवित्रता । आश्चर्य वाटेल तुज ऐकतां । संदेहो नाहीं मज सांगतां । ऐक तत्त्वतां तो महिमा ॥ ८८ ॥ सांडोनि दांभिक लौकिक । माझ्या भजनीं भावार्थें चोख । तो ज्ञाती जरी झाला श्वपाक । तरी आवश्यक मज पूज्य ॥ ८९ ॥ केवळ जीं अपवित्रें । रिसें आणि वानरें । म्यां पूजिलीं गौळ्यांचीं पोरें । ताकपिरें रानटें ॥ २९० ॥ जो जातीनें नीचत्वा नेला । परी भक्तिभावें उंचावला । तो मद्रूपता पावला । पूज्य झाला तिहीं लोकीं ॥ ९१ ॥ ‘ विप्राद्द्विषड्गुणयुता ’ ये श्लोकींची हेचि कथा । जळो त्या द्विजाची पवित्रता । जो माझ्या भजनपथा विन्मुख ॥ ९२ ॥ त्याहूनि श्वपच गा वरिष्ठ । जो माझ्या भजनीं भजननिष्ठ । त्यातें वंदिती पुराणश्रेष्ठ । कविवरिष्ठ महाकवी ॥ ९३ ॥

राहिलों आहें. ७९ त्यांचा उतरायी होण्यासाठीं माझ्या गांठीला तर फुटकी कवडीहि नाहीं. तेव्हां मी जें कांहीं लुटपुटूचें त्यांना देतों, तेंहि तुला हळूच सांगतों. २८० भक्त माझ्याचमुळें समर्थ झाले आहेत. माझ्यामुळेंच कृतकृत्य व नित्य आनंदानें तृप्त होऊन ते आत्मज्ञानानें भरून जातात. ८१ माझ्या बळावरच ते जगांत श्रेष्ठ होतात व शस्त्रावांचून प्रपंचाचा छेद करितात. माझ्या बळावरच कळि-काळ त्यांच्या दृष्टीसमोरहि उभा रहात नाहीं. ८२ माझ्या जीवावर ते त्रिभुवनांतहि मावत नाहींत. माझ्यामुळेंच ते देहांत असून विदेही होतात. माझ्याच बळावर ते प्रलयकाळालाहि गिळून टाकितात. ८३ जन्म-मरणाला दूर सारितात. माझें भजन करूनच ते सनातन ब्रह्मपदाला प्राप्त झाले. ८४ पण हें सर्व मीं कांहीं त्यांना दिलें नाहीं, ते भजनाच्या बळावर घेऊन गेले. त्यांच्यापुढें माझें कांहीं चालत नाहीं. आपल्या भक्तीनें त्यांनीं मला सर्वस्वीं लुटून नेलें. ८५ त्रिभुवनांत अजिंक्य असलेला जो मी त्यालाहि भक्तांनीं आपली भक्ति, भजन व भाव यांच्या बळावर जिंकून टाकिलें आहे. मला जिंकून आपल्याला वश करून ठेविलें. माझें आत्मपदहि माझ्या भक्तांनीं हिरावून घेतलें. ८६ अशाप्रकारें माझ्या आत्मपदाची सत्ता जरी माझ्या भक्तांच्या हातांत आली, तरी त्यांनीं माझ्या शिरावर स्वामित्वाचा अधिकार ठेवून माझ्या भक्तिमार्गांत ते रंगून गेले. ८७ त्या माझ्या भक्तीचा पवित्रपणा ऐकलास तर तुला आश्चर्य वाटेल. पण मला कांहीं सांगण्यास संदेह वाटत नाहीं. तो महिमा आतां ऐक. ८८ लौकिकांतील दांभिक प्रतिष्ठा टाकून जो माझ्या भजनांत श्रद्धेनें तत्पर असतो, तो जातीनें चांडाल जरी असला तरी मला अवश्य पूज्य आहे. ८९ जीं केवळ अपवित्र रानटीं अस्वलें, वानरें, ताक पिणारीं गौळ्याचीं पोरें, त्यांची मीं पूजा केली. २९० जातीनें जरी तो हीन असला, तरी माझ्या भक्ति-भावानें श्रेष्ठ होतो व मद्रूप होऊन त्रिभुवनांत पूज्य होतो. ९१ ‘ विप्राद्द्विषड्गुणयुता ’ या श्लोकांत हीच कथा सांगितली आहे. (सातव्या स्कंधाच्या नवव्या अध्यायांत हा श्लोक आहे.) जो माझ्या भजनमार्गापासून विमुख होतो, त्या ब्राह्मणाचें तोंडहि पाहूं नये. ९२ त्याच्याहून माझ्या भजनांत निष्ठा ठेवणारा चांडाळ श्रेष्ठ म्हणावयाचा. त्याला पुराणांतील श्रेष्ठ व वरिष्ठ कवींतील महाकवि वंदन करितात. ९३ वास्तविक पहातां विदुर दासीपुत्र, पण

विदुर दासीपुत्र तत्त्वतां । भावें पढिया भगवंता । भावो प्रमाण परमार्थां । जात्यभिमानता सरेना ॥९४॥ मज पावावया साचोकारें । भावो सरे जाती न सरे । यालागीं अवघ्यांचे धुरे । म्यां वनचरें उद्धरिलीं ॥ ९५ ॥ पक्ष्यांमाजीं केवळ निंद्यू । जटायु उद्धरिला म्यां गीधू । अंत्यज उद्धरिला धर्मव्याधू । भाव शुद्ध मदर्थीं ॥ ९६ ॥ भलता हो भलते जाती । ज्यासी माझी भावार्थें भक्ती । तोचि जाण पां पवित्र मूर्ती । माझी प्राप्ती मद्भजनें ॥ ९७ ॥ सांडोनियां माझी भक्ती । नाना साधनें व्युत्पत्ती । करितां नव्हे माझी प्राप्ती । तेंचि श्रीपती सांगत ॥ ९८ ॥

धर्मः सत्यदयोपेतो विद्या वा तपसान्विता । मद्भक्त्यापेतमात्मानं न सम्यक् प्रपुनाति हि ॥ २२ ॥

माझे भक्तीवीण कर्मधर्म । जाण पां तो केवळ भ्रम । चुकलें मत्प्राप्तीचें वर्म । तो धर्म अधर्म परिणामें ॥ ९९ ॥ माझे भक्तीवीण सत्यवादू । तो जाण पां जैसा गर्भांधू । प्रतिपदीं घडे प्रमादू । अधः-पतनबाधू देखेना ॥ ३०० ॥ भक्तीवीण दयेची थोरी । जेवीं पुरुषेंवीण सुंदरी । ते विधवा सर्व धर्मा-बाहेरी । तैसी परी दयेची ॥ १ ॥ माझे भक्तीवीण जे विद्या । ते केवळ जाण पां अविद्या । जेवीं वायस नेणती चांदा । तेवीं माझ्या निजबोधा नोळखती ॥ २ ॥ चंदनभार वाहे खर । परी तो नेणे सुवासाचें सार । माझेनि भक्तीवीण विद्याशास्त्र । केवळ भारवाहक ॥ ३ ॥ माझे भक्तीवीण जें तप । शरीरशोषणादि अमूप । तें पूर्वादृष्टें भोगी पाप । नव्हे मद्रूप तपःक्रिया ॥ ४ ॥ माझे भक्तीवीण जें साधन । तें कोशकीटाच्या ऐसें जाण । आपण्या आपण बंधन । भक्तिहीन क्रिया ते ॥ ५ ॥ एवं माझे भक्तीवीण । जें केलें तें अप्रमाण । तें भक्तीचें शुद्ध लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६ ॥

भक्तीमुळें भगवंताचा आवडता झाला. परमार्थामध्यें भक्ति प्रमाण आहे. जातीचा अभिमान उपयोगी नाहीं. ९४ माझ्या प्राप्तीसाठीं भक्ति मुख्य आहे, जाति मुख्य नाहीं. म्हणून सर्वांच्या आधीं मीं वनचरांचा उद्धार केला. ९५ पक्ष्यांमध्यें हीन मानलेला जो गृध्र त्या जटायूचा मीं उद्धार केला. अंत्यज असलेल्या धर्मव्याधाचा मजवर शुद्ध भाव पहातांच मीं त्याला उद्धरिलें. ९६ कोणीहि प्राणी कोणत्याहि जातीचा कां असेना, जो भावार्थानें माझी भक्ति करितो, तोच खरा पवित्र समजावा. माझ्या भजनानेंच माझी प्राप्ति होते. ९७ माझी भक्ति सोडून अनेक साधनांचा खटाटोप जरी केला तरी माझी प्राप्ति होत नाहीं, असें श्रीकृष्ण सांगत आहे. २९८.

भक्तीच्या अभावीं इतर सर्व साधनें व्यर्थ आहेत असें पुढील श्लोकांनीं सांगतात—

मद्भक्त्या अपेतं आत्मानं—माझ्या भक्तीनें रहित असलेल्या पुरुषाला, **सत्यदयोपेतः धर्मः**—सत्य व दया यांनीं युक्त असलेला धर्म, **तपसान्विता वा विद्या**—किंवा तपानें युक्त असलेली विद्या, **सम्यक् न प्रपुनाति**—चांगल्याप्रकारें पावन करीत नाहीं, **हि**—हें तूं निश्चयानें जाण. २२.

माझ्या भक्तीवांचून कर्म, धर्म हे सर्व केवळ भ्रम आहेत. माझ्या भक्तीचें वर्म चुकलें कीं तो धर्म परिणामीं अधर्मच ठरतो. ९९ माझ्या भक्तीवांचून सत्य भाषणहि जन्मांधासारखेंच होय. कारण त्यांतहि पावलोपावलीं चुका होतात व आपला अधःपात होत आहे, हें तो पहात नाहीं. ३०० भक्तीवांचून जी दयेची थोरवी ती पतीवांचून असलेल्या सुंदर स्त्रीसारखीच आहे. धार्मिक मंगलकृत्यांत विधवा जशी वर्ज्य असते, तशीच भक्तिरहित दया समजावी. १ माझ्या भक्तीवांचून जी विद्या, ती केवळ अविद्याच समजावी. कावळा जसा चंद्राला जाणत नाहीं, त्याप्रमाणें भक्तीवाचून माझ्या स्वरूपाला अभक्त ओळखीत नाहींत. २ गाढव आपल्या पाठीवर चंदनाचे भारे वहातो; पण त्याला कांहीं त्या सुवासाची जशी कल्पना नसते, त्याप्रमाणें माझ्या भक्तीवांचून सर्व विद्या व शास्त्रें जाणणारे केवल भारवाहक होत. ३ माझ्या भक्तीवांचून शरीराला कष्टवून जे तप करितात, ते खरोखर पूर्वजन्मींचें पापच भोगित असतात, तें मद्रूप तपश्चरण नव्हे. ४ माझ्या भक्तीवांचून जेवढीं साधनें आहेत, तेवढीं सगळीं आपल्याभोंवतीं कोश बांधणाऱ्या कीटासारखींच समजावीं. ती भक्तिहीन क्रिया स्वतःच स्वतःला बंधनांत टाकिते. ५ याप्रकारें माझ्या भक्तीवांचून जें जें करावें, तें तें सर्व अप्रमाण आहे; आतां भक्तीचें शुद्ध स्वरूप श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ३०६.

कथं विना रोमहर्षं द्रवता चेतसा विना । विनाऽऽनन्दाश्रुकलया शुध्येद्भक्त्या विनाऽऽशयः ॥ २३ ॥

आवडीं हरिकथा ऐकतां । नाना चरित्रें श्रवण करितां । माझी आत्मचर्चा हृदयीं धरितां । पालटू चित्ता तेणें होये ॥ ७ ॥ तेणेंचि उपजे माझी भक्ती । माझ्या भजनाच्या अतिप्रीतीं । आवडीं माझीं नामें गाती । रंगीं नाचती सद्भावें ॥ ८ ॥ पोटांतूनियां उल्हासतां । रंगीं गातां पैं नाचतां । अंतरीं द्रवो झाला चित्ता । ते अवस्था बाह्य दिसे ॥ ९ ॥ अंतरीं सुखाची झाली जोडी । बाह्य रोमांची उभिली गुढी । त्या स्वानुभवसुखाची गोडी । नयनीं रोकडी प्रवाहे ॥ ३१० ॥ माझे भक्तीचिया आवडीं । अहं सोहं दोनी कुडीं । तुटली अभिमानाची बेडी । विषयगोडी निमाली ॥ ११ ॥ ते काळींचें हेंचि चिन्ह । पुलकांकित देहो जाण । नयनीं आनंदजीवन । हृदयीं परिपूर्ण स्वानंदू ॥ १२ ॥ पुंजाळले दोनी नयन । सदा सर्वदा सुप्रसन्न । स्फुरेना देहाचें भान । भगवंतीं मन रंगलें ॥ १३ ॥ ऐसी नुपजतां माझी भक्ती । कैंची होय विषयविरक्ती । विरक्तीवीण माझी प्राप्ती । नव्हे निश्चितीं उद्धवा ॥ १४ ॥ माझी शुद्धभक्ती तत्त्वतां । साचार आली जयाचे हाता । ऐक त्याच्या चिन्हांची कथा । आणि पवित्रता तयाची ॥ १५ ॥ माझे भक्तीसी जो लागला । तो तत्काळ पवित्र झाला । त्याणें त्रिलोक पुनीत केला । हें गर्जोनि बोलिला श्रीकृष्णू ॥ १६ ॥

वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च ।
विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥ २४ ॥

रोमहर्षं विना द्रवता चेतसा विना आनंदाश्रुकलया विना भक्तिः कथं गम्यते–अंगावर रोमांच उत्पन्न झाल्यावांचून, चित्त द्रवल्यावांचून, किंवा नेत्रांतून आनंदाश्रु आल्यावांचून भक्ति कशी सिद्ध होणार ! **भक्त्या विना आशयः कथं शुध्येत्**–आणि भक्तिवांचून चित्त कसें शुद्ध होणार ! २३.

मोठ्या आवडीनें हरिकथा ऐकली असतां, माझीं अनेक अवतारचरित्रें श्रवण केलीं असतां, माझ्या आत्मचर्चेचें मनांत चिंतन केलें असतां चित्तशुद्धि होते. ७ त्यामुळें माझी भक्ति उपजते. माझ्या भजनावरील प्रेमामुळें भक्त मोठ्या आवडीनें माझीं नांवें गातात व भजनाच्या रंगांत येऊन भक्तिभावानें नाचतात. ८ अंतःकरणांतून उल्हासाची उकळी फुटल्यामुळें ते गाण्यांत व नाचण्यांत रंगले असतां त्यांचें हृदय प्रेमानें पाझरत असलेलें बाह्य चिन्हांवरून स्पष्ट दिसतें. ९ आत्मसुखानें होणाऱ्या प्रेमाची गोडी अंगावर उभे राहिलेले रोमांच व डोळ्यांतून वाहणारे आनंदाश्रु यांवरून व्यक्त होते. ३१० माझ्या भक्तीच्या आवडीनें अहं व सोहं हे दोन्ही दुवे सुटून अभिमानाची बेडी तुटते व विषयांचीं गोडी लोपून जाते. ११ त्या प्रसंगाचें चिन्ह म्हणजे शरीर रोमांचित होणें, डोळ्यांत आनंदाश्रु येणें, हृदय पूर्ण स्वानंदानें भरून जाणें, १२ दोन्ही डोळे विकास पावणें, मन सुप्रसन्न होणें व देहाचें भान नाहींसें होणें, हें आहे. अशाप्रकारें भगवानामध्यें मन रंगून जातें. १३ अशी माझी भक्ति उपजल्यावांचून विषयांची विरक्ति कशी येणार ! हे उद्धवा ! विरक्तीवांचून माझी प्राप्ति केव्हांहि होणें नाहीं, हें तूं निश्चित समज. १४ आतां माझी शुद्धभक्ति ज्याच्या हातीं आली आहे, त्याची पवित्रता व इतर लक्षणें सांगतों, तीं ऐक. १५ जो माझी भक्ति करूं लागला तो तत्काल पवित्र झालाच म्हणून समजावें. तो त्रिभुवनाला पवित्र करितो, असें श्रीकृष्णानें मोठ्यानें ओरडून सांगितलें. ३१६.

भक्ति आपल्या आश्रयाचें म्ह० चित्ताचें शोधन करिते, हें काय सांगावें ! कारण गद्गदवागादिरूप माझ्या भक्तीनें युक्त असलेला पुरुष सर्व लोकाला पावन करितो, असें भगवान् सांगतात—

यस्य वाक् गद्गदा भवति–ज्याची वाणी सद्गदित होते, **चित्तं द्रवते**–चित्त आर्द्र होतें, **अभीक्ष्णं रुदति**–जो वारंवार रडतो, **क्वचित् च हसति**–आणि एखाद्या वेळीं हंसतो, **विलज्जः उद्गायति नृत्यते च**–लज्जारहित होऊन मोठ्यानें नाचतो व गातो. याप्रमाणें, **मद्भक्तियुक्तः भुवनं पुनाति**–मद्भक्तियुक्त पुरुष सर्व भुवनाला पावन करितो. २४.

**अंगीं रोमांच खरवित । स्वेदबिंदू डळमळित । चित्त चैतन्यें द्रवत । तेणें सद्गदित पैं वाचा ॥ १७ ॥
हर्ष वोसंडतां पोटीं । अर्धोन्मीलित होय दृष्टी । जीवशिवां पडली मिठी । ध्यानत्रिपुटी मावळली ॥ १८ ॥
नयनीं अश्रूंचा पूर लोटी । उभंडू न संटेचि पोटीं । होत जीवभावाची तुटी । पडे सृष्टीं मूर्च्छित ॥ १९ ॥
आक्रंदे थोर आक्रोशें । वारंवार रडता दिसे । रडण्यामाजी गदगदां हांसे । जेवीं लागलें पिसें ब्रह्मग्रहो
॥ ३२० ॥ रडणें हांसणें न सांडी । त्याहीमाजीं नवल आवडी । अर्थावबोधें गाणें मांडी । निजात्म-
गोडीचेनि योगें ॥ २१ ॥ विसरोनि माझें तुझें । सांडोनियां लोकलाजे । हरिखें प्रेमाचेनि भोजें । तेणें
नाचिजे निःशंक ॥ २२ ॥ गाणें नाचणें हांसणें । तो रडे कासयाकारणें । ऐक तींही लक्षणें । तुजकारणें सांगेन
॥ २३ ॥ माउलीवेगळा बाळक पडे । जननी पाहतां कोठें नातुडे । भेटतां ओरडूनि रडे । मिठी पडे
सप्रेम ॥ २४ ॥ जीव परमात्मा दोनी । चुकामुकी झाली भ्रमपट्टनीं । त्यांसी एकाएकीं होतां मिळणी ।
रडे दीर्घस्वरें स्फुंदत ॥ २५ ॥ बहुकाळें झाली भेटी । ऐक्यभावें पडली मिठी । तेणें उभंडू न
संटे पोटीं । रुदन उठी सप्रेम ॥ २६ ॥ देवो लाघवी नानापरी । मायावी नातुडे निर्धारीं ।
तो सांपडला घरींच्या घरीं । तेणें विस्मय करी टवकारें ॥ २७ ॥ देव सदा जवळीच असे ।
त्यालागीं जन कैसे पिसे । पाहों जाती देशोदेशें । तें देखोनि हांसे गदगदां ॥ २८ ॥ देव सर्वांसी
अजितू । तो म्यां जिंकिला भगवंतू । धरोनि राखिला हृदयांतू । यालागीं गातनाचतू उल्हासें ॥ २९ ॥
निवटूनि दुजयांची मातू । अंगें जीतिला भगवंतू । जगीं झाला यशवंतू । यालागीं गातनाचतू उल्हासें
॥ ३३० ॥ पाहतां दुसरें न दिसे मज । यालागीं धरूं विसरला लाज । जगीं झाला तो निर्लज्ज ।
निर्लज्जतेची वोज हे त्याची ॥ ३१ ॥ यापरी भक्तियुक्त । होऊनियां माझे भक्त । निजानंदें गात**

माझ्या अनन्य भक्तांच्या अंगावर रोमांच उभे रहातात, शरीराला घाम सुटतो, चित्त चैतन्यामुळें द्रवतें व कंठ सद्गदित होतो. १७ अंतःकरण आनंदानें भरून गेलें म्हणजे दृष्टि अर्धवट मिटते, जीवा-शिवांची गांठ पडते आणि ध्येय, ध्याता व ध्यान ही त्रिपुटी मावळते. १८ डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागतात, गहींवर पोटांत मावत नाहीं व जीवा-शिवांचा वियोग झाला कीं, तो भूमीवर मूर्च्छित होऊन पडतो. १९ मोठा आक्रोश करून वरचेवर रडतो. रडतां रडतां मधूनच खदखदां हंसतो. ब्रह्मसमंधानें झपाटलेल्या एखाद्या वेड्यासारखा तो वागतो. ३२० रडणें व हंसणें चाललेलेंच असतें. त्यांत आणखी आत्मस्वरूपाच्या गोडीमुळें त्याच अर्थाचीं गाणीं म्हणतो, ३१ हा केवढा चमत्कार ! माझें-तुझें विसरून, लोकलज्जा सोडून तो खुशाल गातो, नाचतो, २२ हंसतो, रडतो. याचें कारण काय ! तेंहि कारण तुझ्यासाठीं सांगतों, ऐक. २३ आईपासून दूर होतांच लहान बालक आपली आई कोठें दिसली नाहीं कीं, तिला शोधीत असतें व ती भेटतांच तिला लाडानें मिठी मारून ओरडून जसें रडूं लागतें, २४ त्याप्रमाणें जीव व शिव यांची भ्रांतिरूप नगरांत चुकामूक झाली होती, ती अकस्मात् पुनः भेट झाली कीं जीव मोठा सूर काढून स्फुंदून-स्फुंदून रडूं लागतो. २५ दीर्घ कालानें भेट झाल्यामुळें ते परस्परांस ऐक्यानें मिठी मारितात. तेव्हां त्यांचा गहिंवर पोटांत मावत नाहीं व प्रेमातिशयानें रडूं कोसळतें. २६ देव नानाप्रकारचा लाघवी आहे, तो मायावी आहे. कांहीं केल्या कोणाच्या हातीं लागत नाहीं; पण मला तो घरबसल्या हृदयांतच सांपडला आहे, असें म्हणून भक्त आश्चर्यचकित होतो. २७ देव सर्वदा जवळच असतो; पण त्याच्या-साठीं लोक कसे वेडे होतात पहा ! ते त्याला शोधावयास देशो-देशीं हिंडत असतात व तें पाहून भक्त खदखदां हंसत असतो. २८ सर्वांना अजिंक्य असलेला जो देव भगवान् त्याला मीं जिंकून हृदयांत बांधून ठेविला आहे, असें समजून माझा भक्त आनंदानें गात व नाचत असतो. २९ द्वैतभाव नाहींसा करून मी स्वतः भगवानाला जिंकून जगांत यशस्वी झालों, असें म्हणून तो प्रेमानें गातो व नाचतो. शोधूं गेल्यासहि मला दुसरें कांहीं दिसत नाहीं. यास्तव तो लाज विसरतो व जगांत निर्लज्ज होऊन रहातो. निर्लज्जता हीच त्याची शुद्धता आहे. ३१ याप्रकारें माझे भक्त भक्तियुक्त

नाचत । तेणें केलें पुनीत लोकत्रय ।। ३२ ।। जयाचे देखतां चरण । जडजीवां उद्धरण । ज्याचे लागतां चरणरेण । पशु पाषाण उद्धरती ।। ३३ ।। कीर्तनाचेनि महाघोकें । नाशिलीं जगाचीं सर्व दुःखें । अवघें विश्वाचि हरिखें । भरिलें महासुखें उचंबळत ।। ३४ ।। दर्शनें स्पर्शनें वचनें । एक तारिलें कीर्तनें । एक तारिलें नामस्मरणें । यापरी जग उद्धरणें उद्धवा ।। ३५ ।। अविद्यायुक्त जीव मलिन । त्यांसी शुद्ध व्हावया जाण । माझी भक्तीचि प्रमाण । हेंचि श्रीकृष्ण स्वयें सांगे ।। ३६ ।।

यथाग्निना हेममलं जहाति ध्मातं पुनः स्वं भजते स्वरूपम् ।
आत्मा च कर्मानुशयं विधूय मद्भक्तियोगेन भजत्यथो माम् ।। २५ ।।

डांकमिळणी सुवर्ण । हीन कसें झालें मलिन । उदकें धुतांही जाण । निर्मळपण न ये त्या ।। ३७ ।। त्याच सुवर्णाचें तगट । अग्निमुखें देतां पुट । मळत्यागें होय चोखट । दिसे प्रकट पूर्वरूपें ।। ३८ ।। तेवीं अविद्याकामकर्मीं मलिन । त्याचे चित्तशुद्धीलागीं जाण । माझी भक्तीचि परम प्रमाण । मळक्षालन जीवाचें ।। ३९ ।। जंव जंव भक्तीचें पूट चढे । तंव तंव अविद्याबंध विघडे । मायेचें मूळचि खुडे । जीवू चढे निजपदा ।। ४० ।। तुटोनियां अविद्याबंधू । चिन्मात्रैक अतिविशुध्दू । जीव पावे अगाध बोधू । परमानन्दू निजबोधें ।। ४१ ।। जीवासी अविद्येची प्राप्ती । ते ज्ञानास्तव होय निवृत्ती । तेथ कां पां लागली भक्ती । ऐशी आशंका चित्तीं जरी धरिसी ।। ४२ ।। तरी माझे भक्तीवीण ज्ञान । सर्वथा नुपजे जाण । तेचि अर्थीचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ।। ४३ ।।

होऊन आत्मानंदानें गात व नाचत त्रिभुवनाला पावन करितात. ३२ त्यांच्या चरणांच्या दर्शनानेंच जडजीवांचा उद्धार होतो व त्यांच्या चरणधुळीनें पशु व पाषाण उद्धरून जातात. ३३ कीर्तनाच्या महा घोषानें जगांतील सर्व दुःखें नाहींशीं होतात, सर्व सृष्टि आनंदानें भरून महासुखानें उचंबळते. ३४ उद्धवा ! याप्रमाणें दर्शनानें, स्पर्श करून, कीर्तन करून व नामस्मरणानें जगाचा उद्धार करावा. ३५ अविद्येनें मलिन झालेल्या जीवाला शुद्ध करावयास माझी भक्तीच काय ती प्रमाण आहे, हेंच आतां श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ३३६.

—शिवाय भक्तीनेंच चित्तशुद्धि होते, दुसऱ्या कोणत्याहि उपायानें होत नाहीं, असें दृष्टान्तपूर्वक सांगतात—

यथा अग्निना ध्मातं हेम मलं जहाति—ज्याप्रमाणें अग्नीनें तापविलेलेंच सोनें आपल्यांतील मलाचा त्याग करितें, (त्याला किती जरी धुतलें किंवा घासलें तरी तें स्वच्छ होत नाहीं), पुनः स्वं स्वरूपं भजते—व तापविल्यानेंच तें आपल्या पूर्वस्वरूपाला प्राप्त होतें. आत्मा च मद्भक्तियोगेन कर्मानुशयं विधूय—तसाच जीव माझ्या भक्तियोगानें कर्मवासनेचा त्याग करून, अथो मां भजति—नंतर मद्रूपाला प्राप्त होतो. २५.

शुद्ध सोन्याला डाग लागला म्हणजे तें हिणकस मलिन होतें, पाण्यानें त्याला कितीहि धुतलें तरी शुद्ध होत नाहीं. ३७ परंतु त्याच सोन्याचा पत्रा अग्नींत टाकून गाळून घेतला म्हणजे त्यांतील हिणकस भाग जाऊन तें शुद्ध होतें व पहिल्यासारखें दिसूं लागतें ३८ त्याप्रमाणें अविद्यारूपी कामकर्मानें मलिन झालेल्या चित्ताची शुद्धि होण्यासाठीं माझी भक्तीच परम प्रमाण आहे. ३९ ती जीवाची मलिनता जाळून टाकिते. जसें जसें भक्तीचें पुट चढतें, तसें तसें अविद्येचें बंधन सुटत जातें. मायेचें मूळच खणून निघतें व जीव आत्मपदाला जाऊन पोंचतो. ३४० जीवाचा अविद्याबंध तुटून त्याला केवल ज्ञानरूप अत्यंत निर्मल बोध प्राप्त होतो. त्या आत्मज्ञानामुळें अंतःकरण परमानंदानें भरून जातें. ४१ जीवाला जर अविद्येची प्राप्ति झालेली असेल तर ज्ञानानें ती नाहींशी होईल. त्यासाठीं भक्तीची काय गरज आहे ! अशी शंका जर तुझ्या मनांत येईल, तर ऐक. ४२ माझ्या भक्तीवांचून ज्ञान केव्हांहि उत्पन्न होत नाहीं. याविषयींचें निरूपण आतां श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ३४३.

यथा यथात्मा परिमृज्यतेऽसौ मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः ।
तथा तथा पश्यति वस्तु सूक्ष्मं चक्षुर्यथैवाञ्जनसंप्रयुक्तम् ॥ २६ ॥

माझी प्रतिपाद्य स्वरूपता । नाना चरित्रें पवित्र कथा । तेथें श्रवणमननें चित्ता । प्रक्षाळितां कीर्तनें ॥ ४४ ॥ जंव जंव करी माझी भक्ती । तंव तंव अविद्यानिवृत्ती । तेणें माझे स्वरूपाची प्राप्ती । जे श्रुतिवेदांतीं अतर्क्य ॥ ४५ ॥ जें कां अतिसूक्ष्म निर्गुण । अलक्ष्य लक्षेना गहन । तेणें स्वरूपें होय संपन्न । जीव समाधान मद्भजनें ॥ ४६ ॥ नयनीं सूदल्या अंजन । देखे पृथ्वीगर्भींचें निधान । तेवीं मद्भजनें लाहोनि ज्ञान । चैतन्यघन जीव होय ॥ ४७ ॥ उद्धवा ऐक पां निश्चितीं । बहुत न लगे व्युत्पत्ती । जैसा भावो ज्याचे चित्तीं । तैशी प्राप्ती तो पावे ॥ ४८ ॥

विषयान्ध्यायतश्चित्तं विषयेषु विषज्जते । मामनुस्मरतश्चित्तं मय्येव प्रविलीयते ॥ २७ ॥

जो करी विषयांचें ध्यान । तो होय विषयीं निमग्न । जो करी सदा माझें चिंतन । तो चैतन्यघन मीचि होय ॥ ४९ ॥ स्त्री गेली असतां माहेरीं । ध्यातांचि प्रकटे जिव्हारीं । हावभावकटाक्षेंवरी । सकाम करी पुरुषातें ॥ ३५० ॥ नसतें स्त्रियेचें ध्यान करितां । प्रकट दिसे यथार्थता । मी स्वतःसिद्ध हृदयीं असतां । सहजें मद्रूपता चिंतितां मज ॥ ५१ ॥ आवडीं माझें जें चिंतन । चित्त चिंता चिंतिते-

---

—" पण, ' ब्रह्मवेत्ता परब्रह्मच होतो ' (तै. भा. २–१ पृ. ६७) त्या ' आत्म्यालाच जाणून पुरुष मृत्यूचें उल्लंघन करितो. ' (श्वे० नारा० छान्दोग्य०) इत्यादि श्रुतींवरून ज्ञानानेंच अविद्या निवृत्त होऊन तुझी प्राप्ति होते, असें अवगत होतें. तेव्हां भक्तियोगानें तुझी प्राप्ति कशी होणार ! " उत्तर—

असौ आत्मा मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः यथा यथा परिमृज्यते—हें चित्त माझ्या पुण्यकथाश्रवणानें व संकीर्तनानें जसें जसें शुद्ध होत जातें, **तथा तथा** – तसें तसें तें चित्त, **अञ्जनसंप्रयुक्तं चक्षुः यथा एव**—अंजन घातलेला नेत्र (गुप्त ठेवा पहातो,) त्याचप्रमाणें, **सूक्ष्मं वस्तु पश्यति**—सूक्ष्म आत्मवस्तु पहातें. [अर्थात् ज्ञान हा जसा भक्तीचाच अवांतर व्यापार आहे. तें भक्तीहून भिन्न नाहीं, असा याचा भावार्थ.] २६.

माझें वर्णन केलेलें स्वरूप, अनेक चरित्रें, पवित्र कथा यांच्या श्रवण-मननानें व कीर्तनानें चित्तशुद्धि होते. ४४ जशी जशी माझी भक्ति करावी तशी तशी अविद्या नाहींशी होते आणि श्रुति व वेद यांनाहि अगम्य असलेल्या माझ्या स्वरूपाची प्राप्ति होते. ४५ जें अतिसूक्ष्म, निर्गुण, अलक्ष्य असल्यामुळें दृष्टीला गोचर न होणारें गहन स्वरूप तें जीवाला प्राप्त होऊन माझ्या भजनानें त्याचें समाधान होतें. ४६ डोळ्यांत अंजन घातलें असतां पृथ्वीच्या पोटांत असलेली ठेव जशी दिसते, तसेंच माझ्या भजनानें ज्ञान मिळवून जीव मद्रूप होतो. ४७ उद्धवा ! हेंहि लक्षांत ठेव कीं, मत्प्राप्तीला साधनांची फारशी गरज नाहीं. ज्याच्या मनांत जसा भाव असतो तशी त्याला प्राप्ति होते. ३४८.

—शिवाय ज्ञान म्हणजे चित्ताचा मद्रूप परिणाम आणि माझें भजन करणाऱ्याच्या ठिकाणीं तो स्वभावतः च होतो. निराळ्या यत्नाची अपेक्षा करीत नाहीं, असें सदृष्टान्त सांगतात—

विषयान् ध्यायतः चित्तं विषयेषु विषज्जते—विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाचें चित्त विषयांमध्यें आसक्त होतें, तसेंच, **मां अनुस्मरतः चित्तं मयि एव प्रविलीयते**—माझेंच चिंतन करणाऱ्या पुरुषाचें चित्त माझ्या ठिकाणींच विलीन होतें. २७.

जो विषयांचें ध्यान करितो, तो विषयांत मग्न होतो व जो सतत माझें चिंतन करितो, तो मज चैतन्यघनालाच येऊन मिळतो. ४९ स्त्री माहेरीं गेलेली असली, तरी तिच्या पतीनें तिचें चिंतन करितांच ती त्याच्या मनांत मूर्तिमंत उभी रहाते व काल्पनिक हावभाव, नेत्रकटाक्ष यांनीं त्याला सकाम करिते. ३५० तेव्हां काल्पनिक स्त्रीचें ध्यान केलें असतां ती जर अंतःकरणांत मूर्तिमंत प्रकट होते, तर हृदयांत साक्षात् स्वयंसिद्ध असलेल्या माझें चिंतन करितांच सहज मद्रूपता प्राप्त झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें ! ५१ आवडीनें माझें चिंतन केलें असतां

पण । विरोनि होय चैतन्यघन । मद्रूपपण या नांव ।। ५२ ।। माझे प्राप्तीलागीं जाण । हेंचि गा मुख्य लक्षण । माझें ध्यान माझें भजन । मद्रूपपण तेणें होय ।। ५३ ।। मजवेगळें जें जें ध्यान । तेंचि जीवासी दृढ बंधन । यालागीं सांडूनि विषयांचें ध्यान । माझें चिंतन करावें ।। ५४ ।।

तस्मादसदभिध्यानं यथा स्वप्नमनोरथम् । हित्वा मयि समाधत्स्व मनो मद्भावभावितम् ।। २८ ।।

साचाच्यापरी दिसत । परिणामीं नाशवंत । त्यासीच बोलिजे असत । जें मिथ्याभूत आभास ।। ५५ ।। तेवीं इहामूत्र कमनीयें । जें अविचारितरमणीयें । त्यालागीं प्राणी पाहे । नाना उपायें शिणताती ।। ५६ ।। कष्टीं सेवूनी साधन । साधिलें स्वर्गभोगस्थान । तेंही नश्वर गा जाण । जेवीं कां स्वप्नमनोरथ ।। ५७ ।। यालागीं विषयांचें ध्यान । सांडूनि करावें माझें भजन । माझिया भावना मन । सावधान राखावें ।। ५८ ।। सावधान करितां भजन । एकाग्र धरितां माझें ध्यान । तेथ अत्यंत जें बाधकपण । तें त्यागलक्षण हरि बोले ।। ५९ ।।

स्त्रीणां स्त्रीसङ्गिनां सङ्गं त्यक्त्वा दूरत आत्मवान् । क्षेमे विविक्त आसीनश्चिन्तयेन्मामतन्द्रितः ।। २९ ।।

जो मजलागीं आर्तभूत । तेणें सांडावी स्त्रीसंगाची मात । मी चिंतावा भगवंत । तेणें एकांत सेवावा ।। ३६० ।। स्त्रियेच्याही परीस खोटी । संगति स्त्रैणांची अतिखोटी । त्यांसी न व्हावी

चित्त, चिंतन करणारा व चिंतनीय वस्तु ही त्रिपुटी नाहींशी होऊन चैतन्यघन होणें यालाच मद्रूपता असें म्हणतात. ५२ माझ्या प्राप्तीचें हेंच मुख्य लक्षण आहे, माझें ध्यान व माझें भजन केल्यानें मद्रूपता येते. ५३ माझ्यावांचून इतर सर्वांचें ध्यान जीवाला दृढबंधन करणारें आहे. यास्तव विषयांचें ध्यान सोडून माझें चिंतन करावें. ३५४.

—'त्याअर्थी भक्तीहून अन्य साधन व त्याचें फल हीं दोन्हीं स्वप्न व मनोरथ यांप्रमाणें मिथ्या संकल्पमात्र आहेत, त्याअर्थी त्या दोहोंचाहि त्याग करून माझ्याच ठिकाणीं तूं आपलें मन स्थिर कर' असें सांगून प्रकरणार्थाचा उपसंहार करितात—

तस्मात् यथा स्वप्नमनोरथं असदभिध्यानं हित्वा—म्हणून स्वप्न व मनोरथ यांप्रमाणें विकल्पमात्र असलेल्या मिथ्या पदार्थांचें चिंतन सोडून, मद्भावभावितं मनः मयि समाधत्स्व—माझ्या भजनानेंच शुद्ध झालेलें आपलें मन माझ्याच स्वरूपांत स्थिर कर. २८.

जें दिसावयास खऱ्यासारखें भासतें, पण शेवटीं नाश पावतें, त्याला असत् असें म्हणतात. तें मिथ्या व भ्रमरूप असतें. ५५ त्याप्रमाणें इहलोकीं व परलोकीं मनाला भुलविणारें, जें आपात रमणीय विषयजात त्यासाठीं हे प्राणी कसे व्यर्थ अनेक उपाय करून कष्ट करितात, पहा ! ५६ बरें इतकें कष्ट सोसून स्वर्गादि भोगस्थान जरी मिळविलें, तरी तेंहि स्वप्नांतील मनोरथासारखेंच नश्वर आहे. ५७ यास्तव विषयांचें ध्यान सोडून माझें भजन करावें व मनांत माझीच भावना ठेवण्याविषयीं सावध रहावें. ५८ सावधान चित्तानें भजन करीत असतां, एकाग्रचित्तानें माझें ध्यान करीत असतां, जें अत्यंत बाधक होतें त्याचें लक्षण श्रीहरि सांगत आहे. ३५९.

—वात्स्यायनादिकांनीं सांगितलेल्या काममार्गाचा सर्वथा त्याग करावा असें सांगतात—

स्त्रीणां स्त्रीसङ्गिनां सङ्गं दूरतः त्यक्त्वा—स्त्रिया व स्त्रियांमध्यें आसक्त असलेले लोक याची संगति सर्वथा सोडून, आत्मवान् क्षेमे विविक्ते आसीनः अतन्द्रितः मां चिंतयेत्—धैर्यवान् होऊन, निर्भय व निर्जन प्रदेशीं बसून व आळस सोडून साधकानें माझेंच चिंतन करावें. २९.

जो माझ्या प्राप्तीसाठीं अधीर झालेला असतो, त्यानें प्रथम स्त्रीसंगाची गोष्टच सोडून दिली पाहिजे. त्यानें एकान्तांत बसून मज भगवानाचें चिंतन करावें. ३६० कामासक्त पुरुषांचा सहवास तर स्त्रियांहूनहि

भेटीगोठी । न पहावा दिठीं दुरोनी ॥ ६१ ॥ साधकें कायावाचाचित्तीं । सांडूनि दोहींची संगती । परतोनि स्फुरेना स्फूर्ती । ऐसी दृढ स्थिती धरावी ॥ ६२ ॥ केवळ एकांत जें विजन । प्रशस्त आणि पवित्र स्थान । तेथें घालोनियां आसन । माझें चिंतन करावें ॥ ६३ ॥ करोनि आळसाची बोळवण । धरूनि निजवृत्ति सावधान । त्यावरी करावें माझें ध्यान । एकाग्र मन राखूनी ॥ ६४ ॥ माझें विध्वंसोनि ध्यान । माझे प्राप्तीआड विघ्न । साधकांसी अतिबंधन । स्त्री आणि स्त्रैणसंगती ॥ ६५ ॥

न तथाऽस्य भवेत्क्लेशो बन्धश्चान्यप्रसङ्गतः । योषित्सङ्गाद्यथा पुंसो यथा तत्सङ्गिसङ्गतः ॥ ३० ॥

अविद्येच्या अनंतकोटी । जाण पां स्त्रीसंगाचे पोटीं । अधर्माचा भडका उठी । योषिता दृष्टीं देखतां ॥ ६६ ॥ जें महामोहाचें मेळवण । जें खवळल्या कामाचें इंधन । जें जीवाचें परम मोहन । अधःपतन ते योषिता ॥ ६७ ॥ जे मदनाचे तिखट बाण । जें मायेचें चक्र जाण । जें अंधतमाचे पूर्ण । भरितें तें जाण योषिता ॥ ६८ ॥ हो कां जीचिये संगतीं । आंधळी होय ज्ञानशक्ती । ज वाढवी नाना आसक्ती । जिचेनि विस्मृति निजस्वार्था ॥ ६९ ॥ जिचेनि संसार बहुवस । जिचेनि असोस गर्भवास । जिचेनि विषयविलास । जे वज्रपाश जीवाचा ॥ ३७० ॥ जे अखंड सोशी दुःखशोक । जे सदा सोशी नरकवोक । ते माता अनाप्त करूनि देख । स्त्री आवश्यक आप्त होय ॥ ७१ ॥ जे मात्रस्नेहातें तोडवी । जे बंधुस्नेहातें विघडवी । जे सदा गोंवी हावभावीं । अधर्मअटवीं जे पाडी ॥ ७२ ॥ जिचे कटाक्ष अतितिख । जिव्हारीं रुतले देख । जे जीवाची व्यामोहक । जिचें चढलें विख उतरेना

वाईट. त्यांची भेट घेऊं नये, त्यांच्याशीं बोलूं नये, फार काय पण त्यांना दुरूनहि दृष्टीनें पाहूं नये. ६१ साधकानें काया-वाचा-मनानें या दोघांची संगति सोडून त्यांच्याकडे पुनः मन जाणार नाहीं, असा दृढ निग्रह करावा. ६२ निर्जन, एकान्त, प्रशस्त व पवित्र जागीं आसन घालून माझें चिंतन करावें. ६३ आळसाला साफ घालवून वृत्ति सावध ठेवावी व एकाग्र मन करून माझें ध्यान करावें. ६४ माझ्या ध्यानांत अडथळा आणणारी व माझ्या प्राप्तीच्या आड येणारी स्त्री व स्त्रैण पुरुष यांची संगति हीं साधकाला मोठीं विघ्नें आहेत. ३६५.

—याचेंच अधिक उपपादन करितात—

अस्य पुंसः यथा योषित्सङ्गात् यथा च तत्सङ्गिसंङ्गतः क्लेशः बन्ध च भवेत्—या पुरुषाला जसा स्त्रीच्या आसक्तीमुळें व जसा स्त्रियांमध्यें आसक्त असलेल्या पुरुषांच्या संगतीमुळें क्लेश व बंध होतो, तथा अन्यप्रसङ्गतः न—तसा इतर कोणत्याहि पदार्थांतील आसक्तीनें होत नाहीं. ३०.

अरे बाबा ! स्त्रीसंगामध्यें अविवेकाच्या अनंत कोटि भरलेल्या आहेत. स्त्री दृष्टीस पडतांच अधर्माचा भडका उठतो. ६६ स्त्री महामोहाचा समूहच, किंवा भडकलेल्या कामाचें सर्पणच आहे. जीवाला अत्यंत मोह पाडणारी व त्याचा अधःपात करणारी जर एखादी वस्तु असेल तर ती स्त्रीच होय. ६७ मदनाचे तीक्ष्ण बाण, मायेचें चक्र, अंधतमनांवाच्या नरकाचें पूर्ण साधन, अशी स्त्रीच एक आहे. ६८ जिच्या संगतीनें ज्ञानशक्ति अंध बनते, जी अनेक प्रकारच्या आसक्ति उत्पन्न करिते, जिच्यामुळें आपल्या खऱ्या स्वार्थाचा विसर पडतो, ६९ जिच्यामुळें संसार अतिशय वाढतो, जिच्यामुळें असह्य गर्भवास सोसावा लागतो, ३७० जिच्यामुळें विषयविलासाची चटक लागते, जी जीवाला तीव्र फांस घालिते, जी निरंतर दुःख, शोक व नरकायातना भोगावयास लाविते, आईला दूर करून आपण निकटची आप्त होते, ७१ मातृप्रेमांत वितुष्ट आणिते, बंधुस्नेहांत बिघाड पाडिते, सर्वदा हावभावांत गुंतविते, अधर्मरूपी अरण्यांत नेऊन सोडिते, ७२ तिचें अति तीव्र नेत्रकटाक्ष एकदां हृदयांत जाऊन रुतले कीं ते जीवाला भुरळ घालितात. जिचें चढलेलें विष उतरत नाहीं, ७३ अशी

॥ ७३ ॥ एवढी बाधा जाण स्त्रीसंगती । जो वांछूं पाहे माझी प्राप्ती । तेणें सांडावी स्त्रियेची आसक्ती हृदयीं प्रीति न राखावी ॥ ७४ ॥ स्त्री आठवतांचि चित्ता । उच्छेदी ज्ञानध्यानअवस्था । एवढी स्त्रीसंगबाधकता । त्याहूनी अधिकता स्त्रैणसंगें ॥ ७५ ॥ स्त्रीसंगाच्या मोहमदा । सुटका आहे यदाकदा । परी स्त्रैणसंगतीची बाधा । ते आपदा अनिवार ॥ ७६ ॥ चूडाला स्त्रियेचे संगतीं । तरला शिखिध्वज भूपती नातरी मदालसेचे संगतीं । तरला नृपती कुवलयाश्व ॥ ७७ ॥ हो कां लीलेनें करोनि भक्ती । प्रसन्न केली सरस्वती । तिया उद्धरिला निजपती । हें बोलिलें ग्रंथीं वसिष्ठें ॥ ७८ ॥ यापरी स्त्रीसंगतीं । उद्धरले ऐकिजेती । परी स्त्रैणाचे संगतीं । उद्धार गती असेना ॥ ७९ ॥ जो कां स्त्रियेचा अंकिला । जो स्त्रियेसी जीवें विकिला । जो स्त्रियेचा पोसणा झाला । तिचे बोलामाजीं वर्ते ॥ ३८० ॥ जैशी कुलदेवता खेचरी । तैसें स्त्रियेसी पूज्य करी । मग तिचेचि सेवेवरी । नाना उपचारीं नाचत ॥ ८१ ॥ पाळिल्या श्वानाचे परिपाटीं । लाविल्या लागे सुहृदापाठीं । त्या हडकिलिया शेवटीं । कामथाळोरां पुसाटी घालूनि पडे ॥ ८२ ॥ घड गोड उत्तम पदार्था । आपण भोगीना सर्वथा । तें देऊन स्त्रियेच्या हाता । आपुली सत्ता निवर्तवी ॥ ८३ ॥ इसी जैं विरुद्ध वाटेल । तैं हें ब्रह्मांड पालथेल । इचा उल्लंघितां बोल । क्षीराब्धि सुकेल सुखाचा ॥ ८४ ॥ नाहीं देवोकुळदेवां पूजणें । मायबापांतें वंचणें । शेखीं गुरूतेंही ठकणें । परी सर्वस्व देणें स्त्रियेसी ॥ ८५ ॥ एवं माकड जैसें गारुड्याचें । तैसा स्त्रियेचेनि छंदें नाचे । ऐशिया स्त्रैणाचे संगतीचें । तेथ सुख कैंचें साधका ॥ ८६ ॥ ज्याच्या ऐकतां स्त्रियेच्या गोठी । सज्ञानासही काम

स्त्रीसंगतीची बाधा आहे. जो माझ्या प्राप्तीची इच्छा करितो, त्यानें स्त्रीवरील आसक्ति टाकून, मनांत तिच्याविषयीं प्रीति ठेवूं नये. ७४ मनांत स्त्रीचें स्मरण होतांच ज्ञान-ध्यानावस्थेचा उच्छेद होतो. स्त्रीसंग इतका बाधक होत असतो. स्त्रैणाची संगति तर त्याहूनहि अधिक बाधते. ७५ स्त्रीसंगाच्या मोहांतून कधीं तरी कदाचित् सुटतां येईल. पण स्त्रैण माणसाची संगति म्हणजे ती अनिवार आपत्तीच समजावी. ७६ चुडालेच्या संगतीनें शिखिध्वज राजा तरून गेला. (चुडालेनें स्वतः ब्रह्मविद्या संपादन करून आपल्या पतीचा उद्धार केला. हें चुडालाख्यान योगवासिष्टांत आहे.) कुवलयाश्व राजाला मदालसेनें तारिलें. (ही कथा मार्कंडेय पुराणांत आहे.) ७७ ब्रह्मदेवानें सहज लीलेनें भक्ति करून सरस्वतीला प्रसन्न करून घेतलें, परंतु तिनें आपल्या पतीचा उद्धार केला, हें स्वतः वसिष्ठानें योगवासिष्ठांत सांगितलें आहे. ७८ याप्रकारें स्त्रीच्या संगतीनेंहि पुरुषांचा उद्धार झाल्याच्या गोष्टी ऐकितों; परंतु स्त्रैणाच्या संगतींत मुळींच तरणोपाय नाहीं. ७९ जो पुरुष बायकोच्या अधीन असतो, आपला जीव तिला विकतो, तिचा गुलाम होतो, तो तिच्या अर्ध्या वचनांत रहातो. ३८० आकाशांत संचार करणारी कुलदेवता जशी पूज्य असते, त्याप्रमाणें स्वस्त्रीला पूज्य मानून तो अनेक उपचारांनीं तिच्या तोंडापुढें नाचत असतो. ८१ पाळीव कुत्र्यासारखा तो तिच्या आज्ञेंत रहातो. तिनें ' छू ' म्हणतांच तो आपल्या निरपेक्ष उपकार करणाऱ्या सुहृदाच्याहि पाठीस लागतो व त्याला हांकून लाविलें तर, कुत्रा जसा मागील पायांत शेपटी घालून जमिनीवर पडतो, तसा तो तिच्या आश्रयाला लाळ घोटीत रहातो. ८२ सुंदर, उत्तम, मधुर असा एखादा पदार्थ हातीं येतांच त्याचा स्वतः उपभोग न घेतां तो अगोदर बायकोच्या स्वाधीन करितो व त्यावरील आपला स्वतःचा ताबा घालवितो. ८३ तिला जी गोष्ट रुचत नाहीं, त्यासाठीं तो ब्रह्मांड पालथें घालितो. तिच्या शब्दाचें उल्लंघन करणें म्हणजे त्याच्या सुखाचा समुद्रच आटून जाईल कीं काय असें त्याला वाटत असतें. ८४ देव-कुलदेवता यांची पूजा झाली नाहीं तरी पत्करिली, आई-बापांची वंचना केली तरी चालेल, शेवटीं गुरूलाहि फसविल्यास हरकत नाहीं, पण सर्वस्वी बायकोला वाहून घेऊन तिचे कोड पुरविण्यांत तो तत्पर असतो. ८५ अशाप्रकारें गारुड्याचें माकड जसें तो नाचवील तसें नाचत असतें, तसा हा स्त्रैणपुरुष बायकोच्या छंदानें ती जशी नाचवील तसा नाचत असतो. अशा स्त्रैणाच्या संगतींत साधकाला सुख कोठचे मिळणार ! ८६ ज्याच्या

उठी । जो लावी योषितापाठीं । उठाउठी सकामत्वें ॥ ८७ ॥ ऐशिया स्त्रैणाचे संगतीं । कैंची साधका सुखप्राप्ती । तो घालील अधोगतीं । अंधतमाप्रती नेईल ॥ ८८ ॥ यालागीं स्त्रैणाची कथा । कानीं नायकावी वार्ता । त्याचा वाराही लागतां । तेथूनि सर्वथा पळावें ॥ ८९ ॥ त्याची न घ्यावी भेटी । त्यासी न करावी गोठी । तो न पहावा दिठीं । न लागावें पाठीं स्त्रैणाचिये ॥ ३९० ॥ स्त्रैण पुढें वाटे जाये । त्याच्या मार्गीं मागू उरला राहे । तेही आपण चुकवावी सोये । येथवरी पाहें त्यागावा ॥ ९१ ॥ स्त्री आणि स्त्रैणाचे संगतीं । जैशी होय दुःखप्राप्ती । तैसें दुःख त्रिजगतीं-। माजीं निश्चितीं असेना ॥ ९२ ॥ अत्यंत स्त्रीकामीं वशता । ती नांव मुख्य स्त्रैणता । केवळ स्त्रियेची अधीनता । तो बाधू परमार्थी अतिनिंद्यत्वें ॥ ९३ ॥ आपुले हृदयींची कामासक्ती । तेचि स्त्रीसंगाची दृढ प्राप्ती । तेथ उपजलिया विरक्ती । मग स्त्रियेची प्राप्ती कोण पुसे ॥ ९४ ॥ ऐसें हृदयींचें कणवें । उद्धवासी सांगीतलें देवें । हें ऐकोनियां उद्धवें । विचारु जीवें आदरिला ॥ ९५ ॥ अनिवार उपजे विरक्ती । जेणें बाधीना विषयासक्ती । ऐशी जे ध्यानस्थिती । तेचि देवाप्रती पुसत ॥ ९६ ॥ जें लागलिया ध्यान । न दिसे स्त्रीपुरुषभान । जीवीं उपजे चित्समाधान । तैसें विधान पुसत ॥ ९७ ॥

उ० उ०–यथा त्वामरविन्दाक्ष यादृशं वा यदात्मकम् । ध्यायेन्मुमुक्षुरेतन्मे ध्यानं मे वक्तुमर्हसि ॥ ३१ ॥

तोंडून स्त्रीचें रसभरित वर्णन ऐकल्यास ज्ञानीहि सकाम होतो व कामासक्तीनें स्त्रीच्या पाठीस लागतो, ८७ अशा स्त्रैणाच्या संगतींत साधकाला सुखप्राप्ति कोठून होणार ! तो त्याला अधोगतीला नेऊन नरकांतच टाकणार ! ८८ यास्तव स्त्रैण माणसाची कथा कानानें ऐकूंहि नये. त्याचा वाराहि लागूं न देतां तेथून पळून जावें. ८९ त्याला भेटूं नये. त्याच्याशीं बोलूं नये. त्याला डोळ्यांनीं पाहूं नये. स्त्रैणाच्या पाठोपाठहि कधीं जाऊं नये. ३९० स्त्रैण ज्या वाटेनें पुढें जात असतो, त्याच्या मागून जाण्यास जरी वाट असली तरी ती चुकवावी. येथपर्यंत त्याचा त्याग करावा. ९१ स्त्री व स्त्रैण यांच्या संगतीनें जसें दुःख होतें, तसें दुःख सगळ्या त्रिभुवनांत सांपडत नाहीं. ९२ स्त्रीच्या इच्छा पुरविण्यांत अत्यंत दक्ष राहून तिला वश होणें, यालाच स्त्रैणपणा म्हणतात. केवल स्त्रीच्या अधीन होणें हाच परमार्थाचा अति निंद्य बाध आहे. ९३ आपल्या हृदयांतील कामासक्ति हीच स्त्रीसंगाची दृढ प्राप्ति करून देणारी आहे. पण मनांत एकदा विरक्ति उपजली कीं, मग स्त्रीप्राप्तीला कोण विचारितो ! ९४ असें अंतःकरणांतील कळवळ्यानें श्रीकृष्णानें उद्धवाला सांगितलें. तें ऐकून उद्धवानें मनांत मोठ्या आदरानें विचार केला ९५ व श्रीकृष्णाला विचारलें कीं, ज्या स्थितींत विषयासक्तिहि बाधत नाहीं अशी तीव्र विरक्ति उत्पन्न होते ती ध्यानावस्था कोठली ! ९६ या वचनानें जें ध्यान लागलें असतां स्त्री-पुरुष हें भान रहात नाहीं, ज्ञानयुक्त समाधान मनांत उपजते, त्या ध्यानाचा प्रकार उद्धव विचारीत आहे. ३९७.

—एकोणतिसाव्या श्लोकांत ‘ माझें चिंतन करावें ’ असें भगवानांनीं सांगितलें आहे. तें ऐकून उद्धव त्या चिंतनाचाच प्रकार विचारितो—

उद्धव उवाच–उद्धव म्हणाला, अरविन्दाक्ष–हे कमलनयना ! मुमुक्षुः त्वां यादृशं यदात्मकं यथा वा ध्यायेत्–मुमुक्षूनें जशाप्रकारच्या, ज्या स्वरूपाच्या व जशा प्रकारें तुझें ध्यान करावें, एतत् मे ध्यानं मे वक्तुं अर्हसि–तें माझें ध्यान मज जिज्ञासूला सांगण्यास तूंच योग्य आहेस. [श्लोकांतील ‘ यथा ’ पदानें ध्यानाच्या अंगाविषयीं प्रश्न आहे, ‘ यादृशं ’ या पदानें ध्यान करण्यास योग्य असलेल्या भगवानाच्या विशेषणाविषयीं प्रश्न आहे व ‘ यदात्मकं ’ या पदानें ज्याचीं तीं विशेषणें आहेत त्याच्या स्वरूपाविषयीं प्रश्न आहे. ‘ एतन्मे ध्यानं मे वक्तुमर्हसि ’ हा पाठ घेतल्यास त्याचा अर्थ असा–‘ मुमुक्षूनें तुझें कसें ध्यान करावें तें मला सांगण्यास तूंच योग्य आहेस ’ हा जिज्ञासूसाठीं प्रश्न आहे; पण दास्य हाच माझा पुरुषार्थ आहे. मला ध्यानानें कोणताच पुरुषार्थ मिळावावयाचा नाहीं, हें सुचविण्यासाठीं पुनः ‘ मे ’ असें म्हटलें आहे. पण याहिपेक्षां ‘ त्वयोपभुक्तस्रग्गंधेत्यादि त्वं व‘ क्क्तुमर्हसि ’ हा पाठ सुगम आहे. तूं ज्याचा उपभोग घेतला आहेस अशी पुष्पमाला, गंध इत्यादि सर्व तूं सांगण्यास योग्य आहेस, असा याचा अर्थ आहे.] ‘३१.

उद्धव म्हणे कमळनयना । मुमुक्षु करिती तुझिया ध्याना । त्या ध्यानाची ध्यानलक्षणा । जगज्जीवना मज सांगें ॥ ९८ ॥ तें सगुण की निर्गुण । कोण रूप कैसा वर्ण । तें अवघेंही संपूर्ण । कृपा करून मज सांगा ॥ ९९ ॥ जेथ रिघतां नुबगे मन । ज्याचें अत्यंत गोडपण । जें तुजही आवडतें जाण । तें मज ध्यान सांगावें ॥ ४०० ॥ ऐकोनि उद्धवाचा प्रश्न । सांगावया उत्तम ध्यान । पूर्वपीठिका आसन । प्राणायामलक्षण सांगतो ॥ १ ॥

श्रीभ०—सम आसन आसीनः समकायो यथासुखम् । हस्तावुत्सङ्ग आधाय स्वनासाग्रकृतेक्षणः ॥ ३२ ॥

ऐक आसनाचें लक्षण । पाषाणीं व्याधि संभवे जाण । केवळ धरणीचें आसन । तें अतिकठिण दुःखरूप ॥ २ ॥ दारुकासनें निर्दय मन । कोरड्या काष्ठाऐसें होय जाण । तृणासनीं विकल्प गहन । जैसें कां तृण विचित्रांकुरें ॥ ३ ॥ वृक्ष पल्लवांवरी आसन । तेणें चित्त सदा दोलायमान । जारण मारण स्तंभन । तेथ काळें आसन साधकां ॥ ४ ॥ ज्ञानोपलब्धि मृगाजिनीं । मोक्षसिद्धी व्याघ्राजिनीं । मोक्षादि सर्व सिद्धींची श्रेणी । श्वेतकंबलासनीं साधकां ॥ ५ ॥ भूमिका शुद्ध आणि समान । पाहोनि निरुपद्रव स्थान । तेथ रचावें आसन । सुलक्षण अनुक्रमें ॥ ६ ॥ कुश वस्त्र कंबलाजिन । इहीं युक्त/

उद्धव म्हणाला कीं, हे कमलनयना, जगज्जीवना, श्रीकृष्णा ! मुमुक्षु तुझें जें ध्यान करितात, त्या ध्यानाचें लक्षण मला सांग. ९८ तें ध्यान सगुण असतें कीं निर्गुण, त्याचें स्वरूप कसें असतें, त्याचा वर्ण कसा असतो, तें सर्व सविस्तर कृपा करून मला सांग. ९९ ज्या ध्यानाला मन कंटाळत नाहीं, ज्याची गोडी तुलाहि अतिशय आवडते, तें ध्यान मला सांग. ४०० हा उद्धवाचा प्रश्न ऐकून उत्तम ध्यानाचा प्रकार सांगण्यासाठीं श्रीकृष्ण त्याची पूर्वपीठिका, आसन व प्राणायामादिलक्षणें सांगत आहे. ४०१.

—उद्धवानें असा प्रश्न केला असतां भगवान् ध्यानाच्या अंगत्वानें आसन व प्राणायाम यांचा प्रकार चार श्लोकांनीं सांगतात—

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाले, समे आसने—फार उंच नाहीं व फार सखलहि नाहीं, अशा कंबलादि आसनावर, समकायः सन्—पाठीचा कणा, मान, व मस्तक यांना सम धारण करून, यथासुखं आसीनः—ज्याप्रकारें सुख होईल त्याप्रकारें बसून (यावरून ‘ स्वस्तिकादि आसन ध्यानाला अत्यंत अवश्यच आहे असें नाहीं ’ हें ठरतें) हस्तौ उत्सङ्गे आधाय—दोन्ही हात मांड्यांवर ठेवून, स्वनासाग्रकृतेक्षणः—चित्ताच्या स्थैर्यासाठीं आपल्या नासाग्राच्या ठिकाणीं दृष्टि लावून [योगशास्त्रांत ‘ ज्याची दृष्टि बाहेर आहे पण लक्ष्य आंत आहे असा स्थिरचित्त व चांगल्याप्रकारें नियत होऊन ’ असें म्हटलें आहे, त्यामुळें चित्त स्थिर होण्यासाठीं जणूंकाय नासाग्र पहात असल्याप्रमाणें दृष्टीचा संकोच करून चित्तवृत्ति आंत ठेवावी, असें ठरतें.] ३२.

आतां आसनाचें लक्षण ऐक. दगडावर बसलें असतां गारठा बाधून दुखणें येण्याचा संभव असतो. नुसत्या भूमीवर बसावें, तर ती अतिशय कठिण असल्यामुळें क्लेशकारक होते. २ लाकडाचें आसन केलें असतां मन वाळलेल्या काष्ठासारखें निष्ठुर होतें. तृणासनावर बसलें असतां तृणाला जसे विचित्र अंकुर फुटतात, तसे मनांत नानाप्रकारचे विकल्प उद्भवतात. ३ वृक्षाच्या पानांचें आसन केलें असतां त्यायोगें मन सर्वदा चंचल होतें. जारण, मारण स्तंभन यासाठीं साधकानें काळ्या रंगाचें आसन घालावें. ४ कृष्णाजिनावर म्ह० काळविटाच्या कातड्यावर बसल्यानें ज्ञानप्राप्ति होते. व्याघ्रचर्माच्या आसनानें मोक्षसिद्धि होते पांढऱ्या शुभ्र घाबळीचें आसन केल्यास साधकाला मोक्षादि सर्व सिद्धींचा समुदाय प्राप्त होतो. ५ पवित्र, सपाट व जेथें कोणाचा उपसर्ग होणार नाहीं, अशा जागेवर पुढील क्रमानें उत्तम लक्षणानें युक्त असें आसन रचावें. ६ खालीं दर्भ, मध्यें वस्त्र, वर घाबळी व त्यांवर अजिन असें आसन मांडावें. तें उंच किंवा नीच होऊं देऊं नये. सर्व बाजूंनीं सारखें असावें. ६ कारण उंच झाल्यास आसन हालूं लागतें व नीच झाल्यास भूमीचे दोष

वें आसन । उंच नीच न व्हावें जाण । समसमान समभागें ॥ ७ ॥ उंच झालिया आसन डोले । नीचीं भूमिदोष आदळे । यालागीं समत्वें प्रांजळें । रचावें कोवळें मृदु आसन ॥ ८ ॥ तेथ शुद्ध मुद्रा वज्रासन । कां अंबुजासनही जाण । अथवा घालावें सहजासन । जे आसनीं मन सुखावें ॥ ९ ॥ तेथें मेरुदंड अवक्र शुद्ध । समकाया राखोनि प्रसिद्ध । मूळाधारादि तीनी बंध । अतिसुबद्ध पैं द्यावे ॥ ४१० ॥ ऐसें आसन लागतां । आसनावरी स्वभावतां । करांबुजाची विकसता । उत्संगता शोभती ॥ ११ ॥ नाकाचें अग्र (न) सांडूनि दूरी । दृष्टि ठेवावी नासिकाग्रीं । ते ठायीं बैसे अग्निचक्रीं । योगगंभीरीं योग्यता ॥ १२ ॥ ते अभ्यासी निजनिश्चळें । योगाभ्यासें योगबळें । अर्धोन्मीलित होती डोळे । धारणामेळें ते काळीं ॥ १३ ॥ भेदापासाव उठाउठी । उपरमतां अभेदीं दृष्टीं । तिची नासाग्रीं दिसे मिठी । इतर दृष्टी लक्षितां ॥ १४ ॥ आसनजयो त्रिबंधप्राप्ती । दृष्टीची उपरमस्थिती । हे अकस्मात् कोणे रीतीं । साधकाहातीं आतुडेल ॥ १५ ॥ ऐसी आशंका धरिसी चित्तीं । त्याही अभ्यासाची स्थिती । उद्धवा मी तुजप्रती । यथानिगुतीं सांगेन ॥ १६ ॥

प्राणस्य शोधयेन्मार्गं पूरकुम्भकरेचकैः । विपर्ययेणापि शनैरभ्यसेन्निर्जितेन्द्रियः ॥ ३३ ॥

अभ्यासाचें लक्षण । प्रथम प्राणमार्गशोधन । पुरक कुंभक रेचक जाण । प्राणापानशोधक ॥ १७ ॥ जिव्हा उपस्थ उपमर्दवे । ऐसा इंद्रियनेम जैं संभवे । त्यासीच हा प्राणजयो फावे । येरां नव्हे श्रमतांही ॥ १८ ॥ प्राणशोधन तें तूं ऐक । पूरक कुंभक रेचक । सवेंचि रेचक पूरक कुंभक । हा उभय देख

बाधतात. म्हणून तें सरळ, सारखें, नाजुक व मऊ असावें. (भगवद्गीतेंत खालीं दर्भ, त्यावर कृष्णाजिन व त्यावर मऊ वस्त्र, असा आसनाचा क्रम सांगितलेला आहे. सु. गी. ६-११ पृ. १२७) ८ अशा आसनावर बसून शुद्ध मुद्रा लावून वज्रासन किंवा कमळासन घालून बसावें. किंवा ज्यायोगें मन प्रसन्न राहील असें सहजासन घालावें. ९ मग पाठीचा कणा ताठ सरळ ठेवून, शरीर मान व मस्तक हीं एका रेषेंत येतील अशीं सारखीं ठेवावीं, मूलाधारादि तीन बंध अचल ठेवावे. ४१० असें आसन घातलें कीं, मांडीवर सहज रीतीनें हात उताणे ठेवावे. ११ नंतर नाकाच्या अग्राला न सोडितां त्यावर दृष्टि लावावी. तेथेंच अग्निचक्र असून तें योगाचें श्रेष्ठ साधन आहे. असा अभ्यास करूं लागलें असतां निश्चल योगाभ्यासानें योगबल प्राप्त होतें. १२ त्यामुळें धारणावशांत नेत्र आपोआपच अर्धोन्मीलित होतात. १३ भेदामध्यें असलेली दृष्टि अभेदांत मिळून स्थिर होते. इतर पदार्थ पहातां पहातां ती नासाग्रीं जाऊन एकरूप होऊन रहाते. १४ परंतु आसनजय, तिन्ही बंधांचीं प्राप्ति व दृष्टिस्थैर्य हीं साधकाला एकदम कशीं प्राप्त होतील, १५ अशी जर तुझ्या मनांत शंका येईल तर हे उद्धवा ! त्याहि अभ्यासाचा प्रकार मी तुला यथार्थ प्रकारें सांगतों. ४१६.

पूरकुम्भकरेचकैः प्राणस्य मार्गं शोधयेत्—पूरक, कुंभक व रेचक या क्रमानें प्राणाच्या मार्गाचें शोधन करावें. निर्जितेन्द्रियः विपर्ययेण अपि शनैः अभ्यसेत्—ज्यानें आपल्या इंद्रियांना जिंकलें आहे, अशा साधनानें पूर्वोक्त क्रमाच्या उलट म्हणजे रेचक, पूरक व कुंभक या क्रमानेंहि हळूहळू अभ्यास करावा. [किंवा इडेनें वायु आंत ओढून घ्यावा व पिंगलेनें तो सोडावा असें योगशास्त्रांत सांगितलें असल्यामुळें डाव्या नाकपुडीनें बाहेरचा वायु आंत ओढून घेऊन उजव्या नाकपुडीनें तो बाहेर सोडावा. किंवा उजव्या नाकपुडीनें तो आंत ओढून घेऊन डाव्या नाकपुडीनें बाहेर सोडावा. अशा विपर्ययानें प्राण मार्गाचें शोधन करावें. ‘ निर्जितेन्द्रियः ’ या पदानें योगाच्या अष्टांगांतील ‘ प्रत्याहार ’ हें पांचवें अंग सांगितलें आहे.] ३३.

प्राणाचा मार्ग शुद्ध करणें हें अभ्यासाचें पहिलें लक्षण आहे. पूरक म्ह० नाकानें वायु आंत ओढून घेणें. कुंभक म्ह० श्वास ठराविक कालपर्यंत आंत दाबून ठेवणें. रेचक म्ह० श्वास नाकानें बाहेर सोडणें. हा त्रिविध प्राणायाम प्राणापानांचा मार्ग शुद्ध करणारा आहे. १७ जीभ व गुह्येंद्रियें ताब्यांत ठेवून जो इंद्रियनिग्रह करूं शकेल, त्यासच प्राणापान साधेल. इतरांनीं कितीहि श्रम केले तरी ते व्यर्थ आहेत. १८ आतां प्राणायाम कसा

अभ्यासू ॥ १९ ॥ इडेनें करावा प्राण पूर्ण । तो कुंभिनीनें राखावा जाण । मग तिनेंचि करावा रेचक । हें एक लक्षण अभ्यासीं ॥ ४२० ॥ कां पिंगलेनें करावा पूर्ण । तो तिनेंचि करावा रेचन । हेंही अपर लक्षण । विचक्षण बोलती ॥ २१ ॥ सर्वसंमत योगलक्षण । इडेनें प्राण करावा पूर्ण । तो कुंभकें राखावा स्तंभून । करावें रेचन पिंगलया ॥ २२ ॥ हो कां पिंगलेनें पुरावा प्राण । तोही कुंभकें राखावा कुंभून । मग इडेनें सांडावा रेचून । हें विपरीत लक्षण अभ्यासीं ॥ २३ ॥ तेथ न करावी फाडाफोडी । न मांडावी ताडातोडी । सांडोनियां लवडसवडी । अभ्यासपरवडी शनैःशनैः ॥ २४ ॥ येथ मांडलिया तांतडी । तैं प्राण पडेल अनाडीं । मग हे थडी ना ते थडी । ऐशी परवडी साधकां ॥ २५ ॥ जेवीं मुंगी वळंघे पर्वता । ते चढे परी पडेना सर्वथा । तेथ जात्यश्व चालों जातां । न चढे तत्त्वतां अतिकष्टी ॥ २६ ॥ तैसें ये योगाभ्यासीं जाण । न चले जाणीव शहाणपण । जाणिवा येथ होय पतन । सर्वथा गमन घडेना ॥ २७ ॥ ते मुंगीच्या परी योगपंथा । जो शनैःशनैः अभ्यासतां । प्रणवाच्या चढे माथां । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ २८ ॥ दृढ अभ्यास आल्या हाता । जैशी साधकाची मनोगतता । तैसा पवन चाले तत्त्वतां । जेवीं रणाआंतौता महाशूर ॥ २९ ॥ अभ्यासाच्या गडाडीं । प्राण खवळल्या कडाडी । तो प्राणापानांचे भेद मोडी । पदर फोडी चक्राचे ॥ ४३० ॥ येथ द्विविध माझें भजन । एक तें योगयुक्त निर्गुण । एक तें प्रणवाभ्यासें भक्त सगुण । तेंही लक्षण अवधारीं ॥ ३१ ॥ ऐक प्राणायामाचे भेद । सगर्भ अगर्भ द्विविध । सगर्भ आगमोक्तें शुद्ध । सगुण संबंध ध्यानादि ॥ ३२ ॥

करावा तें सांगतों, ऐक. अगोदर क्रमानें पूरक, कुंभक व रेचक करावे. पुनः लागलेच रेचक, कुंभक, पूरक करावे. असा दोन प्रकारचा अभ्यास आहे. १९ (इडा म्ह० चंद्र नांवाची डावी नाकपुडी व पिंगला म्ह० सूर्य नांवाची उजवी नाकपुडी.) इडेनें पहिल्यानें वायु आंत ओढून घ्यावा व तसाच धरून ठेवून मग तेथून सोडून द्यावा. हा एक अभ्यासाचा प्रकार झाला. ४२० किंवा पिंगलेनें वायु ओढून घ्यावा व त्याच बाजूनें बाहेर सोडावा. हा दुसरा प्रकार आहे, असें ज्ञाते सांगतात. २१ परंतु सर्वसंमत योगलक्षण असें आहे कीं, डाव्या बाजूनें श्वास घ्यावा, तो कुंभकानें दाबून धरावा व मग उजव्या बाजूनें सोडून द्यावा. २२ किंवा उजव्या बाजूनें घ्यावा, दाबून ठेवावा व डाव्या बाजूनें सोडावा. हा अभ्यासाचा पहिल्याहून उलट प्रकार आहे. २३ हा अभ्यास करितांना उगाच गडबड करूं नये. श्वासावर शक्तिबाहेर ताबा चालवूं नये व त्याला क्लेश होतील असें वागूं नये. हळूहळू सावकाश अभ्यास करावा. २४ त्यांत गडबड केल्यास प्राण अडचणींत सांपडेल व मग हाहि मार्ग नाहीं व तोहि मार्ग नाहीं अशी साधकाची स्थिति होईल. २५ मुंगी पर्वतावर हळूहळू चढत असूनहि ती अनायासानें त्याच्या शिखरावर जाऊन पोंचते. ती खालीं पडत नाहीं; पण जातीवंत घोडा पर्वतावर चढूं लागल्यास त्याला चढतां तर येत नाहीं, पण व्यर्थ अतिशय कष्ट मात्र होतात. २६ त्याचप्रमाणें योगाभ्यासांत ज्ञान व शहाणपणा चालत नाहीं. तेथें आपल्या ज्ञानाची हुषारी दाखवावयास गेलें कीं, सर्वथा पतन होतें व पुढें गति चालत नाहीं. २९ हे उद्धवा ! जे मुंगीसारखें हळूहळू योगमार्गाचा अभ्यास करितात ते प्रणवाच्याहि शिखरावर पोंचतात, हें अगदीं खरें समज. २८ एकदां प्राणायामाचा अभ्यास दृढ झाला कीं, मग वीर रणांगणांत सैन्याला जसा आज्ञेंत ठेवितो, तसा साधकाच्या इच्छेप्रमाणें वायु चालत असतो. २९ अभ्यास त्वरेनें चालविल्यास प्राण अतिशय क्षुब्ध होतो, तो प्राणापानाचा भेद मोडून चक्राचें पदर दूर सारितो. ४३० माझें भजन दोन प्रकारचें आहे. एक योगयुक्त मनानें निर्गुण भजन आणि दुसरें प्रणवाच्या अभ्यासानें सगुण मूर्तीचें भजन. ३१ त्याचें लक्षण व प्राणायामाचे प्रकारहि ऐक. सगर्भ व अगर्भ असे प्राणायामाचे दोन प्रकार आहेत. सगर्भ शास्त्रोक्त व शुद्ध आहे आणि अगर्भ प्राणायाम, सगुण मूर्तीची उपासना व ध्यानादिक यांनीं युक्त आहे. ४३२.

हृद्यविच्छिन्नमोंकारं घण्टानादं बिसोर्णवत् । प्राणेनोदीर्य तत्राथ पुनः संवेशयेत्स्वरम् ।। ३४ ।।

वाचेसी नव्हतां गोचरू । दीर्घ प्रणवाचा उच्चारू । हृदयीं अनवच्छिन्न ओंकारू । अखंडाकारू उल्हासे ।। ३३ ।। घंटानादसदृश स्थितू । जैसा कमळमृणालसूक्ष्मतंतू । तैसा मूळादारभ्य ब्रह्मरंध्रांतू । प्राणायामयुक्तु प्रणवू भासे ।। ३४ ।। तेथ दीर्घ स्वरें उच्चारू । तेणें प्रणवू भासे अतिसपुरू । तो प्राणायामें करावा स्थिरू । अखंडाकारू स्वरयुक्त ।। ३५ ।।

एवं प्रणवसंयुक्तं प्राणमेव समभ्यसेत् । दशकृत्वस्त्रिषवणं मासादर्वाग् जितानिलः ।। ३५ ।।

स्वरवर्णमात्रातीत पर । प्रणव जो कां अगोचर । तो अभ्यासबळें नर । वृत्तिगोचर स्वयें करिती ।। ३६ ।। नवल उच्चाराचा चमत्कार । ऊर्ध्वमुख अखंडाकार । अभ्यासें प्रणवू करिती स्थिर । झणत्कार स्वरयुक्त ।। ८७ ।। ऐसा प्राणायामयुक्त प्रणवाभ्यास । त्रिकाळ करितां सांडूनि आळस । काळीं आवर्तन दशदश । सावकाश करितां पैं ।। ३८ ।। तरी एक मास न लागतां । हा प्राणजयो आतुडे हाता । जेवीं कां सती पतीव्रता । नुल्लंघी सर्वथा पतिवचन ।। ३९ ।। ये अभ्यासीं अतितत्पर । झालिया गा निरंतर । योगाभ्यासाचें सार । सहजेंचि नर पावती ।। ४४० ।। ऐसा प्राणजयो आलिया हाता । दों प्रकारीं भजनावस्था । एकी सगुण आगमोक्ता । दुजी योगाभ्यासता । निर्गुणत्वें ।। ४१ ।। परी दोहींचें समाधान । निर्गुणींच पावे जाण । त्या दोहींचें उपलक्षण । संक्षेपें श्रीकृष्ण सांगत

—प्राणायाम दोन प्रकारचा आहे. एक सगर्भ व दुसरा अगर्भ. त्यांतील प्रणवगर्भ प्राणायाम श्रेष्ठ असल्यामुळें भगवान् पुढील दोन श्लोकांनीं तोच सांगतात—

बिसोर्णवत् अविच्छिन्नं ओंकारं हृदि प्राणेन उदीर्य—मूलधारापासून आरंभ करून मूर्धेच्या अंतापर्यंत कमलनालांतील तंतूप्रमाणें अविच्छिन्न असलेल्या ओंकाराला मनांत प्राणाच्या योगानें व्यक्त करून, **अथ पुनः तत्र घंटानादं स्वरं संवेशयेत्**—त्यानंतर पुनः त्या ओंकारामध्यें घंटानादासारखा उदात्त स्वर स्थिर करावा. ३४.

प्रणवाचा दीर्घ उच्चार वाणीचा विषय होत नाहीं, तोच ओंकारोच्चार हृदयामध्यें सतत उल्हासानें चालत असतो. ३३ तो घंटानादासारखा स्थिर असतो, कमळाच्या देंठांतील सूक्ष्म तंतूप्रमाणें तो प्रणव मूलाधारापासून ब्रह्मरंध्रापर्यंत प्राणायामानें युक्त असतो. ३४ तेथें दीर्घ स्वरानें त्याचा उच्चार होतो. त्यामुळें प्रणवाचा अत्यंत सूक्ष्म भास होतो. त्यालाच प्राणायामाच्या योगानें स्थिर, सतत चालणारा व नादयुक्त करावें. ४३५.

एवं त्रिषवण दशकृत्वः प्रणवसयुक्त प्राणं एव समभ्यसेत्—याप्रमाणें प्रत्येक दिवशीं त्रिकाल दहा दहा वेळ प्रणवयुक्त प्राणायामाचाच अभ्यास करावा. **मासात् अर्वाक् जितानिलः भवति**—असें केल्यानें एका महिन्याचे आंत साधक ज्यानें आपला प्राण जिंकला आहे असा होतो. ३५.

कांहीं माणसें अशाप्रकारें स्वर-वर्ण-मात्रा यांच्याहून भिन्न, अदृश्य व श्रेष्ठ अशा प्रणवाला अभ्यासाच्या सामर्थ्यानें वृत्तिगोचर करितात. ३६ त्याच्या उच्चाराचा चमत्कार मोठा आश्चर्यकारक आहे. अभ्यासानें स्थिर केलेल्या ऊर्ध्वमुख व अखंडाकार प्रणवाचा स्वरयुक्त झणत्कार होतो. ३७ याप्रमाणें प्राणायामानें युक्त होऊन व आळस सोडून प्रणवाचा अभ्यास त्रिकाल, प्रत्येक वेळीं त्याच्या सावकाश दहा दहा आवृत्त्या केल्या असतां ३८ एक महिन्याच्या आंतच जशी पतिव्रता आपल्या पतीच्या आज्ञेचें उल्लंघन करीत नाहीं, सर्वथा त्याच्या अधीन असते, ३९ तसा हा प्राणजय साधकाच्या मुठींत येतो. या अभ्यासांत जे पुरुष सतत अत्यंत तत्पर रहातात, त्यांना योगाभ्यासाचें सार सहज प्राप्त होतें. ४४० असा प्राणजय हातीं आला कीं, भजनाचेहि दोन प्रकार होतात. एक शास्त्रानें सांगितलेली सगुण उपासना व दुसरी योगाभ्यासयुक्त निर्गुण उपासना. ४१ पण त्या दोहोंतील समाधान निर्गुण उपासनेंतच आहे. त्या दोहोंचें उपलक्षण श्रीकृष्ण थोडक्यांत सांगत आहे. ४२ अरे बाबा

॥ ४२ ॥ अगा ओं हें स्मरों सरे । स्मरतां स्वरेंसीं प्राणू प्रणवीं भरे । मग प्रणवूचि तेव्हां स्फुरे । अखंडाकारें उल्हासतू ॥ ४३ ॥ जेथूनि अक्षरें उपजती । शब्द वदोनि जेथ सामावती । मग जे उरे जाण ती स्फूर्ती । प्रणवू निश्चितीं त्या नांव ॥ ४४ ॥ त्या प्रणवाचेनि आधारें । जिणोनियां साही चक्रें । तो प्रणवू सूनि धुरे । निजनिर्धारें चालिजे ॥ ४५ ॥ तेथ उल्हाट शक्तीचा लोट । वैराग्याचा नेटपाट । जिणोनि काकीमुखाची वाट । सवेगें त्रिकूट घेतलें ॥ ४६ ॥ तेव्हां अनुहताच्या घायीं । निशाण लागलें पाहीं । तंव पुढील जे योगभूयी । ते आपैती पाहीं हों सरली ॥ ४७ ॥ तेथें हरिखें अतिउद्भट । औटपीठ आणि गोल्हाट । तेही जिणोनियां वाट । घडघडाट चालिला ॥ ४८ ॥ मागील ठेली आठवण । झाली विकल्पाची बोळवण । सत्रावी वोळली जाण । स्वानंदजीवन जीवाचें॥ ४९ ॥ ते सहस्रदळाचे पाट । वरूनि उतरले घडघडाट । स्वानंदजीवनानिकट । नीट वाटपैं आले ॥ ४५० ॥ तें सेवितां संतोषें पाणी । निवली संतप्त अवनी । इंद्रियांची पुरली धणी । गुणांची त्रिवेणी बुडाली ॥ ५१ ॥ तंव भ्रमरगुंफेआंत । जीवाशिवांचा एकांत । तेणें जीवपणाचा प्रांत । वृत्तीसी घात हों सरला ॥ ५२ ॥ तेथ शिवशक्तिसंयोग । निजऐक्यें झाला चांग । परमानंदें कोंदलें अंग । सुखाचा सुखभोग सुखरूप झाला ॥ ५३ ॥ तेव्हां हेतु मातु दृष्टांतू । खुंटली वेदवादाची मातू । झाला मीतूंपणाचा प्रांतू । एकला एकांतू एकपणें ॥ ५४ ॥ तें एकलेपणाचें एक । म्हणावया म्हणतें नाहीं देख । ऐसे योगबळें जे नेटक । माझें निजसुख पावले ॥ ५५ ॥ हे योगमार्गींची वाट । अतिअवघड परम कष्ट । थोर विघ्नांचा कडकडाट । प्राप्ति अवचट एखाद्या ॥ ५६ ॥ तैसा नव्हे माझा भक्तिपंथू । तेथ नाहीं विघ्नाची मातू । भक्तांसीही हाचि ठावो प्राप्तू । ऐक तेही मातू मी सांगेन ॥ ५७ ॥ मुळीं योग हा नाहीं स्पष्ट । म्हणाल कैंचे काढिलें कचाट । पदबंधाची चुकली

उद्धवा ! साधक जेव्हां 'ओं' या प्रणवाचें स्मरण करावयास आरंभितो, तेव्हां त्या स्वराबरोबर प्राणच प्रणवांत प्रवेश करितो व एका प्रणवाचेंच तेवढें स्फुरण होऊन तें अखंड विकास पावतें. ४३ जेथून अक्षरें उपजतात व शब्द उच्चारल्यानंतर त्यांतच तीं लीन होतात आणि मग जी स्फूर्ति रहाते तिलाच प्रणव असें म्हणतात. ४४ त्या प्रणवाच्या आधारानें सहाहि चक्रें जिंकून व त्यालाच पुढें करून साधक पुढें चाल करितो. ४५ नंतर कुंडलिनीचा लोट व वैराग्याचें बल यांच्या योगानें सुषुम्ना नाडीची वाट जिंकून भक्त मोठ्या वेगानें त्रिकूटस्थानालाहि जिंकितो. ४६ त्यावेळीं अनुहताच्या गजरांत भक्तानें पताका रोविली असतां पुढील योगभूमि आपोआप हातीं येते. ४७ त्यानंतर आनंदानें परिपूर्ण झालेला भक्त औटपीठ व गोल्हाट याहि स्थानांनीं वाट जिंकून धडाडीनें पुढे जातो. ४८ त्या वेळीं त्याला मागची आठवण रहात नाहीं. विकल्पाची बोळवण होते व जीवाची स्वानंदजीवन-सत्राची कला सिद्ध होते. ४९ तेथें ब्रह्मरंध्रांतून सहस्रदल कमलाला सुटलेले पाझर खळ-खळां वाहत असतात व ते सरळ स्वानंदजीवनाला येऊन मिळतात. ४५० तें पाणी आनंदानें पिऊन संतृप्त झालेली पृथ्वी म्ह० भूतत्त्व तृप्त होतें. इंद्रियांची तृष्णा पुरी होते, गुणांची त्रिवेणी साफ सुटते. ५१ व भ्रमरगुंफेमध्यें जीवा-शिवांची एकान्तांत गांठ पडते. तेव्हां जीवाचा प्रदेश व वृत्ति दोन्ही पार बुडून जातात. ५२ तेथें आत्मस्वरूपांत शिव-शक्तींचें ऐक्य होऊन भक्तांचें अंग परम आनंदानें भरून जातें. सुखाचा सुखभोग सुखानेंच सुखरूप होतो. ५३ त्यावेळीं हेतु, गोष्टी, वेद-वाद हीं सर्व नाहींशीं होऊन मी-तूंपणाचा प्रदेश काबीज करून साधक एकटाच एकान्तांत एकत्वानें रहातो. ५४ 'तो एकटाच आहे' असें म्हणणारेंहि तेथें दुसरें कोणी नसतें. अशाप्रकारचें माझें आत्मसुख योगबळानें प्राप्त होतें. ५५ ही योगमार्गाची वाट अतिशय अवघड व अति कष्टकारक असून त्यांत विघ्नाचा मोठा वर्षाव होत असतो. एखाद्यालाच त्याची अकस्मात् प्राप्ति होते. ५६ माझा भक्तीमार्ग तसा नाहीं. त्यांत विघ्नांचें नांवहि नाहीं भक्तांनाहि (या मार्गानें) तेंच स्थान प्राप्त होतें. त्याविषयींहि सांगतों, ऐक. ५७ (तूं कदाचित् म्हणशील कीं) मुळांत तर हा योग सांगितलेला नाहीं, मग तुम्हीं मूळ पदाचा अर्थ सोडून ही मध्येंच व्यर्थ भलतीच कटकट कोठून आणिलीत !

वाट । वृथा वटवट न म्हणावी ॥ ५८ ॥ येच श्लोकीं देवो बोलिला । मासादर्वाक् प्राणजयो जाहला । यांतू ध्वनितें योग बोलिला । तो म्यां केला प्रकटार्थ ॥ ५९ ॥ जेथ प्राणापानजयो झाला । तेथ महायोगू हा भागा आला । हा योगू शास्त्रार्थ बोलिला । विशद केला आकुलागमीं ॥ ४६० ॥ प्राणापानजयो झाला पहा वो । जैसा साधकाचा भावो । सगुणनिर्गुण उपावो । प्राप्ती ठावो सहजेंचि ॥ ६१ ॥ प्राणापानजयप्राप्ती । सगुण उपासनास्थिती । तद्द्वारा निर्गुणप्राप्ती । उद्धवाप्रती हरि बोले ॥ ६२ ॥ कशासारिखें तुझें ध्यान । ऐसा उद्धवें केला प्रश्न । यालागीं सांगोनियां सगुण । सर्वेचि निर्गुण संस्थापी ॥ ६३ ॥ मत्स्य साधावया बडिश जाण । चित्त साधावया मूर्ति सगुण । तेचि मूर्तीचें सगुण ध्यान । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६४ ॥

हृत्पुण्डरीकमन्तस्थमूर्ध्वनालमधोमुखम् । ध्यात्वोर्ध्वमुखमुन्निद्रमष्टपत्रं सकर्णिकम् ॥ ३६ ॥
कर्णिकायां न्यसेत्सूर्यसोमाग्नीनुत्तरोत्तरम् । वह्निमध्ये स्मरेद्रूपं ममैतद्ध्यानमङ्गलम् ॥ ३७ ॥

जैसें केळीचें कमळ । तैसें हृदयीं अष्टदळ । अधोमुख ऊर्ध्वनाळ । अतिकोमळ लसलसित ॥ ६५ ॥ धरोनि प्राणायामाचें बळ । ऊर्ध्वमुख हृदयकमळ । विकसित करावें अष्टदळ । ध्यानें प्रबळ

(असें जर म्हणशील, तर ऐक.) याला व्यर्थ वटवट समजूं नको. ५८ कारण याच श्लोकांतील 'मासादर्वाग्' या पदानें देवानेंच 'महिन्याच्या आंत प्राणजय होतो' असें सांगितलें आहे. यांत त्यानें जो योगाभ्यास ध्वनित केला आहे, तोच मीं स्पष्ट करून सांगितला. ५९ जेथें प्राणापानावर जय मिळाला तेथें महायोग साध्य झालाच म्हणून समजावें. हा योग शास्त्रांतच सांगितला आहे, व 'आकुलागम' या नांवाच्या तांत्रिक ग्रंथांत त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. ४६० प्राणापानावर जय मिळतांच साधकाचा जसा भाव असेल त्याप्रमाणें सगुण किंवा निर्गुण उपासनेनें तो त्या पदाला सहज प्राप्त होतो. ६१ प्राणापानजय मिळविणें, सगुण उपासना व त्यायोगें निर्गुण उपासनेची प्राप्ति इतकें हरीनें उद्धवाला सांगितलें. ६२ तेव्हां उद्धवानें प्रश्न केला कीं, तुझें ध्यान कशाप्रकारचें करावें ! म्हणून त्याला सगुण ध्यानाचा प्रकार सांगून, त्याच्याच बरोबर निर्गुणस्वरूपहि सिद्ध केलें. ६३ मासा पकडण्यासाठीं जसें गळाला आमिष लावावें लागतें, तसें चित्त स्थिर करण्यासाठीं सगुणमूर्तीचें ध्यान अवश्य आहे. त्याच सगुण मूर्तीच्या ध्यानाचा प्रकार श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ४६४.

—याप्रमाणें आसन व प्राणायाम हीं ध्यानाचीं अंगें सांगून उद्धवाच्या 'यादृशं०' या प्रश्नाचें उत्तर सांगण्यासाठीं पुढील दीड श्लोकांनीं भगवन्मूर्तीचें पीठ सांगतात—

ऊर्ध्वनालं अधोमुखं अन्तस्थं हृत्पुण्डरीकं—ज्याचें नाल वर आहे व मुख खालीं आहे, अशा शरीरांतील हृदयकमलाचें, **ऊर्ध्वमुखं उन्निद्रं सकर्णिकं अष्टपत्रं ध्यात्वा**—ज्याचें मुख वर आहे, जें फुललेलें आहे ज्याच्यामध्यें कर्णिका आहे व ज्याला आठ दलें आहेत असें ध्यान करून, **कर्णिकायां सूर्य सोमाग्नीन् उत्तरोत्तरं न्यसेत्**—त्याच्या कर्णिकेमध्यें सूर्य, चंद्र व अग्नि यांची एकावर एक स्थापना करावी. [शरीरांत मिटलेल्या कदलिपुष्पासारखें जें हृदयकमल आहे तेंच ऊर्ध्वमुख फुललेलें वगैरे आहे, असें चिंतन करून त्याच्या मध्यभागीं सूर्यादिकांचें चिंतन करावें, असा याचा भावार्थ. आतां या पुढील सहा श्लोकांनीं म्ह० या ३७ व्या श्लोकाच्या उत्तरार्धापासून ४२ व्या श्लोकाच्या अंतापर्यंत विशेषणांसह ध्यान सांगतात—] **वह्निमध्ये ध्यानमङ्गलं मम एतत् रूपं स्मरेत्**—त्यांतील अग्नीमध्यें ध्यानाचा शुभ विषय अशा या माझ्या स्वरूपाचें चिंतन करावें. ३६-३७.

केळफुल जसें वर देंठ व खालीं वाकलेलें असतें, तसें हृदयांत आठ पाकळ्यांचें अति कोंवळें व विकसित झालेलें कमल आहे. ६५ त्याचें मुख खालीं व देंठ वर असतो. प्राणायामाच्या सामर्थ्यानें दृढ ध्यान धरून हें हृदयांतील आठ पाकळ्यांचें प्रफुल्लित कमल ऊर्ध्वमुख करावें. ६६ अशाप्रकारें देंठ खालीं व मुख वर असलेल्या

ध्यातां पैं ॥ ६६ ॥ तेथ ऊर्ध्वमुख अधोनाळ । ध्याना आलिया हृदयकमळ । अतिउन्निद्र अष्टदळ । ध्यानीं अचंचळ स्थिरावल्या ॥ ६७ ॥

कर्णिकेमाजीं चंद्रमंडळ । ध्यावें सोळा कळीं अविकळ । त्याहीमाजीं सूर्यमंडळ । अतिसोज्ज्वळ बारा कळीं ॥ ६८ ॥ त्याहीमाजीं वन्हिमंडळ । दाही कळीं अतिजाज्वल्य । ते अग्निमंडळीं सुमंगल । ध्यावी सोज्ज्वळ मूर्ति माझी ॥ ६९ ॥

समं प्रशान्तं सुमुखं दीर्घचारुचतुर्भुजम् । सुचारु सुन्दरग्रीवं सुकपोलं शुचिस्मितम् ॥ ३८ ॥
समानकर्णविन्यस्तस्फुरन्मकरकुण्डलम् । हेमाम्बरं घनश्यामं श्रीवत्स श्रीनिकेतनम् ॥ ३९ ॥

तेंचि माझे मूर्तीचें ध्यान । उद्धवा ऐक सावधान । आपुले मूर्तीचें आपण । ध्यान श्रीकृष्ण सांगत ॥ ४७० ॥ अतिदीर्घ ना ठेंगणेपण । सम अवयव समान ठाण । सम सपोष अतिसंपूर्ण । मूर्ती सुलक्षण चिंतावी ॥ ७१ ॥ मूर्ति चिंतावी संमुख । प्रसन्नवदन अतिसुरेख । जिचें देखतांचि मुख । हृदयीं हरिख कोंदाटे ॥ ७२ ॥ जैशीं विशाळ कमळदळें । तैसे आकर्णांत दोनी डोळे । भंवया रेखिल्या काजळें । तैशी रेखा उजळे धनुष्याकृती ॥ ७३ ॥ कपाळ मिरवत सांवळें । त्याहीवरी चंदन पिंवळें । माजीं कस्तूरीचीं दोनी अंगुळें । कुंकुममेळें अक्षता ॥ ७४ ॥ दीर्घ नासिक आणि कपाळें । लखलखित गंडस्थळें । मुख सुकुमार कोवळें । अधरप्रवाळें आरक्त ॥ ७५ ॥ श्यामचंद्राची सपोष कोर । तैशी चुबुका अतिसुंदर । मुख निमासुरें मनोहर । भक्तचकोरचंद्रमा ॥ ७६ ॥ जैशा हिरियाच्या

(सरोवरांतील कमलाप्रमाणें) पूर्ण विकास पावलेल्या आठ पाकळ्या असलेल्या कमलाचें ध्यान करून तें ढळणार नाहीं असें स्थिर करावें. ४६७.

त्या कमलाच्या गाभ्यांत सोळा कलांनीं युक्त अशा निर्मल चंद्रमंडळाची कल्पना करावी. त्यांत बारा कलांनीं युक्त असें अति तेजस्वी सूर्यमंडळ कल्पावें. ६८ त्याच्या आंत दहा कलांनीं युक्त अशा जळजळीत अग्निमंडलाची कल्पना करावी व त्या मंगल अग्निमंडलांत माझ्या देदीप्यमान मूर्तीचें ध्यान करावें. ४६९.

समं—ज्याचें अवयव अनुरूप आहेत, **प्रशान्तं**—जें अत्यंत शान्त आहे, **सुमुखं**—ज्याचें मुख फारच सुंदर आहे, **दीर्घचारु चतुर्भुजं**—ज्यांच्या दीर्घ सुंदर चार भुजा आहेत, **सुचारु सुंदरग्रीवं**—ज्याची मान अति रम्य व सुंदर आहे, **सुकपोलं**—ज्याचें गाल कोमल आहेत, **शुचिस्मितम्**—ज्याचें हास्य मनोहर आहे, **समानकर्ण०**—ज्याच्या एकसारख्याच असलेल्या दोन्ही कानांमध्यें चमकणारीं मकराकार कुंडलें आहेत, **हेमांबरं**—ज्याचें वस्त्र सोन्यासारखें पिवळें आहे, **घनश्यामं**—ज्याची अंगकांति सजल मेघासारखी नीलवर्ण आहे, **श्रीवत्सश्रीनिकेतनं**—ज्याच्या वक्षःस्थलावर उजवीकडे श्रीवत्साचें व डावीकडे श्रीचें स्थान आहे. ३८-३९.

हे उद्धवा ! तेंच माझ्या मूर्तीचें ध्यान सावधान चित्तानें ऐक, असें म्हणून श्रीकृष्ण आपल्या मूर्तीचें ध्यान सांगत आहे. ४७० फार उंच नाहीं, अगदीं ठेंगू नाहीं, प्रमाणशीर, रेखीव अवयवांनीं युक्त अशा गोंडस सुलक्षण मूर्तीचें चिंतन करावें. ७१ प्रसन्नवदन, देखणी, जिचें मुख पाहिलें असतां अंतःकरण आनंदानें भरून येतें, ७२ अशी मूर्ति समोर ठेवून तिचें चिंतन करावें. फुललेल्या कमळाच्या पाकळीसारखे विशाल व आकर्ण नेत्र काजळासारख्या काळ्याभोर आणि धनुष्यासारख्या कमानदार, रेखीव भुंवया; ७३ सांवळ्या कपाळावर केशरी गंध; त्यांत कस्तुरीचीं दोन बोटें व कुंकुमयुक्त अक्षता; ७४ लांब, सरळ नाक व रुंद कपाळ; तेजस्वी गाल; सुकुमार, नाजुक मुख; पोंवळ्यासारखे आरक्त ओंठ; ७५ शुक्लपक्षांतील बीजेच्या चंद्रकोरीप्रमाणें निमुळती सुंदर हनुवटी; भक्तरूपी चकोरास प्रतिचंद्रच भासणारें सकुमार व मनोहर मुख; ७६ जणुंकाय हिऱ्याची प्रभा

ज्योती । कीं दाळिंबबीजांची दीप्ती । तैशी मुखामाजीं दंतपक्ती । दशन झळकती बोलतां ॥ ७७ ॥ समानकर्ण दोनी सधर । स्फुरत कुंडलें मकराकार । ईषत् हास्य मनोहर । ग्रीवा सुंदर कंबु जैशी ॥ ७८ ॥ कंठींची त्रिवळी उभवणी । माजीं मिरवे कौस्तुभमणी । ते प्रकाशली दीप्ती कवण गुणीं । तेजें दिनमणी लोपला ॥ ७९ ॥ भुजंगाकार स्वभावो । चतुर्भुज आजानुबाहो । विशाळ वक्षःस्थळनिर्वाहो । श्रीवत्स पदा हो चिन्हित ॥ ४८० ॥ श्रीवत्स श्रीनिकेतन । हृदयीं दोहीं भागीं जाण । त्रिवळीयुक्त उदर गहन । दामोदरचिह्न त्या आलें ॥ ८१ ॥ विजू तळपे तैसा पिंवळा । लखलखित दिसे डोळां । तेवीं कसिला सोनसळा । तेणें घनसांवळा शोभत ॥ ८२ ॥ जैसें चांदिणें गगनामाझारीं । शुभ्रता बैसे श्यामतेवरी । तेवीं श्यामांगीं चंदनाची भुरी । तेणें श्रीहरी शोभत ॥ ८३ ॥

शङ्खचक्रगदापद्मवनमालाविभूषितम् । नूपुरैर्विलसत्पादं कौस्तुभप्रभया युतम् ॥ ४० ॥
द्युमत्किरीटकटककटिसूत्राङ्गदायुतम् सर्वांगसुन्दरं हृद्यं प्रसादसुमुखेक्षणम् ॥ ४१ ॥

कौस्तुभासीं संलग्न गळा । आपाद् रुळे वनमाळा । कटीं बाणली रत्नमेखळा । किंकिणीजाळमाळासंयुक्त ॥ ८४ ॥ करकंकणें बाहुअंगदें । शंखचक्रपद्मगदादि आयुधें । जडित मुद्रिका नाना छंदें । कराग्रीं विनोदें बाणल्या ॥ ८५ ॥ नाभी सखोल निर्मळ । जेथ ब्रह्मा झाला पोटींचें बाळ । जें लोकपद्माचें समूळ मूळ । तें नाभिकमळ हरीचें ॥ ८६ ॥ जैसे सचेतन मर्गजस्तंभ । तैसें घोंटींव साजिरे स्वयंभ । उभय चरणाची अभिनवशोभ । हरीअंगीं स्वयंभ शोभती ॥ ८७ ॥ ध्वज वज्र अंकुश देखा । यवांकित उर्ध्वरेखा । पद्मचक्रादि सामुद्रिका । चरण नेटका हरीचा ॥ ८८ ॥ त्रिकोण कांतीव इंद्रनीळीं । तैशीं साजिरीं घोंटीव सांवळीं । पाउलें सुकुमारें कोंवळीं । आरक्त तळीं पद्मप्रभा ॥ ८९ ॥

किंवा डाळिंबाच्या दाण्याची तेजस्विताच असे बोलतेवेळीं झळकणारे दांत; ७७ मकराकार कुंडलांनीं शोभणारे दोन बाजूला सारखे कान; किंचित् हंसतमुख; शंखासारखी सुंदर मान; ७८ गळ्याला तीन वळ्या व त्यांत शोभणारा कौस्तुभमणि; त्या मण्याच्या तेजाचें वर्णन कोणीं करावें ! त्याच्या तेजापुढें सूर्याची प्रभाहि फिक्की पडते. ७९ सर्पासारखे लांब गुडघ्यापर्यंत लोंबणारे चार हात; श्रीवत्सानें चिन्हित असलेलें भव्य वक्षःस्थल; ४८० दोन बाजूला श्रीवत्स व श्रीनिकेतन; विशाल पोट व त्यावर तीन वळ्या; यशोदेनें दाव्यानें बांधल्याची खूण त्यांवर उमटल्यामुळें ज्याला दामोदर हें नांव प्राप्त झालें आहे; ८१ आकाशांत वीज जशी चमकावी तसा डोळ्यांपुढें झळकणारा पिवळा पीतांबर; त्यायोगें शोभणारी सांवळी मूर्ति; ८२ आकाशांत जसें चांदणें आपल्या शुभ्रपणानें नीलवर्णावर शोभतें, तशी श्रीहरीच्या सांवळ्या देहकांतीवर शोभणारी चंदनाची उटी. ४८३.

शङ्खचक्र०—जें भगवानाचें ध्येयरूप शंख-चक्र-गदा-पद्म व वनमाला यांनीं अत्यंत भूषित झालेलें, **नूपुरैः विलसत्पादं**—ज्याचे पाय नूपुरांनीं अतिशय शोभत आहेत, **कौस्तुभप्रभया युतं**—कौस्तुभाच्या प्रभेनें युक्त असलेलें, **द्युमत्किरीट०**—अतिशय तेजस्वी, किरीट, कडीं, कटिसूत्र व बाहुभूषणें यांनीं युक्त (या सर्वांनीं अलंकृत झालेलें), **सर्वांगसुन्दरं**—सर्वांगानें सुंदर, **हृद्यं**—अति हृदयंगम, **प्रसादसुमुखेक्षणं**—ज्याचें मुख व नेत्र हीं दोन्हीं प्रसादानें अतिशय रमणीय आहेत, ४०–४१.

गळ्यांत घातलेला कौस्तुभमणि; पायापर्यंत रुळणारी वनमाला; कमरेंत रुण-झुण नाद करणाऱ्या घागऱ्यांच्या घोसानें युक्त अशी रत्नजडित मेखला; ८४ हातांत सलकडीं; दंडाला बाजुबंद; हातांत शंख-चक्र-गदा-पद्म हीं आयुधें; बोटांत नानाप्रकारच्या रत्नभूषित अंगठ्या; ८५ खोल, निर्मल आणि ज्यांतून ब्रह्मदेव उपजला व हरीचें पोटचें मूल झाला, जें त्रिभुवनरूपी कमळाचें मूळच असें तें हरीचें नाभिकमल; ८६ तेजस्वी मरकत मण्याचे घोंटिव, सुंदर स्वयंभु खांबच अशीं ज्याची अप्रतिम शोभा आहे, असे हरीचे दोन चरण; ८७ त्या चरणांवर ध्वज, वज्र, अंकुश, यवांकित असलेल्या ऊर्ध्व रेषा, चक्र, पद्म इत्यादि सामुद्रिक चिन्हें; ८८ इंद्रनीलमणि कांतून त्याचा जसा त्रिकोण करावा त्याप्रमाणें रेखीव, सांवळीं, सुकुमार, नाजुक पावलें व त्या पावलांच्या तळांची आरक्त शोभा; ८९ पावलांवर सांवळी कांति व तळव्याची आरक्त कांति; आकाशांत जशी

पाउलावरी सांवळी प्रभा । तळवातळीं आरक्त शोभा । जेवीं संध्याराग मीनला नभा । तैशी शोभा हरिचरणीं ॥ ४९० ॥ नभमंडळीं चंद्ररेखा । तैशी प्रपदाग्रीं मांडणी नखा । पोटऱ्या सुकुमार नेटका । जंघा सुरेखा जानुद्वय ॥ ९१ ॥ अतिशयें माजु साना । होता अभिमान पंचानना । मध्य देखोनि जगज्जीवना । लाजोनि राना ते गेले ॥ ९२ ॥ अद्यापि ते झाले अरण्यवासी । लाजा मुख न दाविती कोणासी । पहावया हरिमध्यासी । लेप मेखलेसी ते झाले ॥ ९३ ॥ चरणीं नूपुरांचा गजर । वांकी-अंदुवांचा झणत्कार । मस्तकीं कुटिलालकभार । सुमनीं कबर शोभती ॥ ९४ ॥ नानारत्नीं अतिगहन । मस्तकीं मुकुट देदीप्यमान । सर्वांगीं सुलक्षण । मूर्ति संपूर्ण हरीची ॥ ९५ ॥ जे मूर्तीची धरिल्या साये । तहान भूक विसरोनि जाये । जें ध्यानीं आतुडल्या पाहें । सुखाचा होये सुदिन ॥ ९६ ॥ सर्वांग सुंदर श्यामवर्ण । ज्येष्ठ वरिष्ठ गंभीर गहन । सुमुख आणि सुप्रसन्न । मूर्तीचें ध्यान करावें ॥ ९७ ॥

सुकुमारमभिध्यायेत्सर्वाङ्गेषु मनो दधत् । इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यो मनसाऽऽकृष्य तन्मनः ।
बुद्ध्या सारथिना धीरः प्रणयेन्मयि सर्वतः ॥ ४२ ॥
तत्सर्वव्यापकं चित्तमाकृष्यैकत्र धारयेत् । नान्यानि चिन्तयेद्भूयः सुस्मितं भावयेन्मुखम् ॥ ४३ ॥

झणीं दृष्टीचा रुपेल न्याहारू । लागतां खुपेल चंद्रकरू । तैशी मूर्ति ध्यावी सुकुमारू । अतिअरुवारू । ध्याननिष्ठा ॥ ९८ ॥ इंद्रियार्थीं अतिलोलुप्त । तें वैराग्यें आवरोनि चित्त । माझे ध्यानीं

संध्याकाळीं रक्तिमा येतो तशी हरीच्या चरणांची आरक्त शोभा; ४९० आकाशांत ढगांच्या समूहांत जशी चंद्रकोर असावी, तशी पावलांच्या अग्रभागीं नखांची मांडणी; सुकुमार पोटऱ्या; दोन्ही सुंदर मांड्या व रमणीय गुडघे; ९१ सिंहांना आपल्या नाजुक कंबरेचा अतिशय अभिमान झाला होता, पण श्रीहरीची कंबर पहातांच ते जे एकदां लज्जेनें रानांत पळून गेले ९२ ते अद्यापि अरण्यांतच राहिले आहेत, लाजेनें कोणाला तोंडहि दाखवीत नाहींत; तरीहि हरीची कंबर पहाण्यास मिळावी म्हणून त्याच्या मेखलेवर ते सिंह चित्र होऊन राहिले. ९३ पायांतील नुपूर, तोरड्या, पैंजण यांचा झणत्कार; मस्तकावर पुष्पांनीं शोभणाऱ्या कुरळ्या केसांचा भार; ९४ त्यांवर अनेकरत्नजडित तेजस्वी मुकुट; अशी सर्व अंगानें पूर्ण असलेली, उत्तम लक्षणांनीं युक्त हरीची मूर्ति असावी. ९५ ज्या मूर्तीचा आश्रय केला असतां तहानभूक नाहींशी होते, ज्याचें ध्यान साध्य झाल्यास सुखाचा सुदिनच उगवतो, ९६ अशा त्या सर्वांगसुंदर, श्यामवर्ण, अत्यंत गंभीर, श्रेष्ठ, उदार व सुप्रसन्न मुख अशा मूर्तीचें ध्यान करावें. ४९७.

सुकुमारं–अतिशय सुकुमार, सर्वांगेषु मनः दधत् अभिध्यायेत्–अशा ध्येयस्वरूपाच्या सर्वांगामध्यें मनाचें स्थैर्य करणाऱ्या साधकानें त्याचें ध्यान करावें, [याप्रमाणें विशेषणासह सांगितलेल्या ध्यानाचा उपसंहार करितात–] मनसा इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्यः आकृष्य–मनानें इंद्रियांचें विषयांपासून आकर्षण करून, तन्मनः धीरः बुद्ध्या सारथिना मयि सर्वतः प्रणयेत्–तें मन धीर भक्तानें बुद्धि या सारथ्यानें सर्वांगानें युक्त अशा माझ्या ठिकाणीं पूर्णपणें स्थिर करावें. ४२.

—'यादृशं' या प्रश्नाच्या उत्तरत्वानें विशेषणासह ध्येयरूप सांगून 'यदात्मकं' या प्रश्नाच्या उत्तरत्वानें हळूहळू विशेषणांच्या त्यागानें समाधीपर्यंतचें ध्यान तीन श्लोकांनीं सांगतात—

तत् सर्वव्यापकं चित्तं–तें सर्व व्यापक चित्त, एकत्र आकृष्य धारयेत्–एकाच अंगामध्यें आकर्षण करून घेऊन त्यांतच स्थिर करावें. भूयः अन्यानि न चिन्तयेत्–आणि मग इतर अंगांचें ध्यान करूं नये. [एकत्र असें जें वर म्हटलें आहे तेंच एक अंग दाखवितात–] सुस्मितं मुखं भावयेत्– सुंदर किंवा रमणीय हास्यानें युक्त असलेल्या मुखाचें चिंतन करावें. ४३.

ज्या कोमल मूर्तीला नेत्रकटाक्षहि रुपतील, चंद्रकिरणहि खुपतील इतकी ती ध्याननिष्ठेसाठीं केलेली मूर्ति सुकुमार असावी. ९८ बुद्धिमान् लोक इंद्रियजन्य विषयांत लोलुप होणाऱ्या चित्ताला वैराग्यानें आंवरून माझ्या

सुनिश्चित । बुद्धिमंत लाविती ॥ ९९ ॥ विषयीं आवरोनि मन । अखंड करितां माझें ध्यान । मद्रूपचि होय जाण । ऐसें चिंतन करावें ॥ ५०० ॥ चिंतनीं बिचकतां मन । सविवेक बुद्धिबळें जाण । निःशंक करितां माझें स्मरण । धारणेवीण ध्यान ठसावे ॥ १ ॥ धारणा जरी तुटोनि जाये । ध्यानठसा न तुटत राहे । मन मूर्तीच्या ठायीं पाहें । जडले ठाये सर्वांगीं ॥ २ ॥ अंगप्रत्यंगीं ध्यानयुक्त । जडोनि ठेलें जें चित्त । तें आवरूनि समस्त । चिंतावें निश्चित हास्यवदन ॥ ३ ॥ सर्वही सांडोनियां जाण । सांगोपांग मूर्तिध्यान । चिंतावें गा हास्यवदन । स्वानंदघन हरीचें ॥ ४ ॥ अंगप्रत्यंग मूर्तिध्यान । पुढतीं न करावेंचि गा जाण । ध्यातां माझें हास्यवदन । तल्लीन मन करावें ॥ ५ ॥ उद्धवें केला होता प्रश्न । कशासारिखें तुझें ध्यान । तें सांगोनियां जाण । यदात्मलक्षण हरि बोले ॥ ६ ॥ ध्याना आलें जें हास्यवदन । त्यांतूनही सांडोनि वदन । केवळ हास्याचें करावें ध्यान । हास्यामाजीं मन घालूनी ॥ ७ ॥ त्याही हास्याचें सांडूनि ध्यान । हास्यामाजीं जो आनंदघन । तेथ प्रवेशवावें मन । अतिसावधान निजनिष्ठा ॥ ८ ॥ ते आनंदीं आनंदयुक्त । जाहलिया आपुलें चित्त । आनंदाची उपलब्धि तेथ । होय सुनिश्चित साधकां ॥ ९ ॥

तत्र लब्धपदं चित्तमाकृष्य व्योम्नि धारयेत् । तच्च त्यक्त्वा मदारोहो न किंचिदपि चिन्तयेत् ॥ ४४ ॥

जाहलिया आनंदपद प्राप्त । चिदाकाशचि दिसे समस्त । ते चिदाकाशीं चित्त । अतिसावचित्त ठेवावें ॥ ५१० ॥ तेव्हां चिदाकाश चित्त चिंतन । हेंही सांडूनि त्रिविध भेदध्यान । जो मी परमानंद परिपूर्ण । भेदशून्य चिदात्मा ॥ ११ ॥ तेथें वृत्ति करूनि निमग्न । सांडावें चिदाकाशाचेंही ज्ञान । तेव्हां ज्ञेय ज्ञाता ज्ञान । हेंही स्फुरण स्फुरेना ॥ १२ ॥

ध्यानांत लावितात. ९९ मनाला विषयांपासून परत फिरवून अखंड माझें ध्यान केलें असतां, तें मद्रूपच होईल, असें चिंतन करावें. ५०० चिंतनांत मन चंचल झालें असतां विवेकयुक्त बुद्धीच्या सामर्थ्यानें निःशंकपणें माझें स्मरण करावें. म्हणजे धारणेवांचूनच ध्यान ठसतें. १ धारणा जरी तुटली तरी ध्यानाचा उमटलेला ठसा तुटत नाहीं. मन मूर्तीच्या सर्वांगामध्यें जडून रहातें. २ जें चित्त ध्यानाच्या निमित्तानें मूर्तीच्या प्रत्येक अंगावर जडलेलें असतें, त्यालाहि आवरून एकाग्रतेनें केवल हास्यवदनावरच स्थिर करावें; ३ हरीच्या सर्व अंग-उपांगासह मूर्तीचें ध्यान सोडून चैतन्यघनाच्या केवल हास्यवदनाचेंच चिंतन करावें. ४ त्यानंतर हरीच्या सर्वावयवयुक्त मूर्तीचें ध्यान न करितां हास्यवदनाचें ध्यान करीत असतां मन तेथेंच तल्लीन करावें. ५ उद्धवानें प्रश्न केला होता कीं, तुझें ध्यान कशासारखें असावें ! त्याचें उत्तर सांगून त्यांतील आत्मस्वरूपाचें लक्षणहि श्रीकृष्ण सांगत आहे. ६ ध्यानांत हास्यवदन स्थिर झाल्यावर मग वदनहि सोडून केवल हास्याचेंच ध्यान करावें. हास्यामध्यें मन स्थिर झाल्यावर ७ तें हास्यहि सोडून द्यावें आणि त्या हास्यांतील जो आनंदघन परमात्मा त्यांत मनाचा प्रवेश करवावा व तेथेंच अति सावधानपणानें आत्मनिष्ठा ठेवावी. ८ तें चित्त आनंदानें आनंदयुक्त झाल्यावर तेथेंच साधकाला निश्चयानें आनंदाची प्राप्ति होते. ५०९.

तत्र लब्धपदं चित्तं आकृष्य व्योम्नि धारयेत्—त्या मुखामध्यें ज्याला स्थिर स्थान प्राप्त झालें आहे, अशा चित्ताला तेथून आकर्षण करून घेऊन सर्व कारणरूपांत स्थिर करावें. तत् च त्यक्त्वा मदारोहः किंचित् अपि न चिंतयेत्—आणि मग त्या कारणत्वाचाहि त्याग करून मज शुद्ध ब्रह्मामध्यें आरूढ होऊन भक्तानें ध्याता व ध्येय या विभागाचेंहि चिंतन करूं नये. ४४.

अशा आनंदपदाची प्राप्ति झाल्यावर सगळें चिदाकाशच दिसूं लागतें. त्या चिदाकाशांत अति सावधपणानें चित्त ठेवावें. ५१० नंतर ध्यानांतील चिदाकाश, चित्त व चिंतन हे त्रिपुटीचे भेद सोडून मी जो परिपूर्ण, परमानंद, भेदशून्य चिदात्मा, ११ त्याच्यामध्यें वृत्ति निमग्न करावी व चिदात्मकाशाचेंहि ज्ञान सोडून द्यावें. म्हणजे ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान यांचेंहि स्फुरण होणार नाहीं. ५१२.

एवं समाहितमतिर्मामेवात्मानमात्मनि । विचष्टे मयि सर्वात्मन् ज्योतिर्ज्योतिषि संयुतम् ॥ ४५ ॥

यापरी साधकांची निजवृत्ती । माझ्या स्वरूपीं मीनल्या स्वरूपस्थिती । तेव्हां मीपणाची स्फुरे जे स्फूर्ती । तेही अद्वैतीं विराली ॥ १३ ॥ तेथें मीतूंपणाचा भास । यापरी निमाला निःशेष । माझें परमानंद निजसुख । अद्वैतें देख कोंदलें ॥ १४ ॥ जेवीं ज्योतीसीं मीनल्या ज्योती । दोहींची होय एकचि दीप्ती । तेवीं जीवचैतन्यांची स्फूर्ती । अद्वैतसुखप्राप्ती समरसें ॥ १५ ॥ कोटि स्नेहसूत्रें मांडिती । तेणें कोटि दीप नामाभिव्यक्ती । ते कोटि दीपीं एक दीप्ती । तेवीं जीव अद्वैतीं चिन्मात्र ॥ १६ ॥ देहेंद्रियउपाधिवशें । जीवासी भिन्नत्व आभासे । अद्वैतबोध समरसें । जीवु प्रवेशे स्वरूपीं ॥ १७ ॥ तेव्हां एक परमसुख । हेंही म्हणतें नाहीं देख । एकाकी एकलें एक । सुखेंसी निजसुख कोंदलें ॥ १८ ॥ जेवीं साखरे साखर चाखित । कीं उदकीं उदक स्नान करित । हो कां घृत जाहलें घृताआंत । सुनिश्चित सुवासा ॥ १९ ॥ यापरी माझी ध्यानस्थिती । साधकां जाहली परमप्राप्ती । तेचि उपसंहारें श्रीपती । उद्धवाप्रती सांगत ॥ ५२० ॥

'ध्यानेनेत्थं सुतीव्रेण युञ्जतो योगिनो मनः । संयास्यत्याशु निर्वाणं द्रव्यज्ञानक्रियाभ्रमः ॥ ४६ ॥

एवं समाहितमतिः—याप्रमाणें ज्याची बुद्धि समाहित झाली आहे, अशा योग्यानें, मां एव आत्मनि विचष्टे—मलाच आत्म्यामध्यें पहावें, आत्मानं च सर्वात्मन् मयि संयुतं विचष्टे—आणि आत्म्याला सर्वात्मा जो मी, त्या माझ्यामध्यें एकरूप झालेलें पहावें. (याविषयीं दृष्टान्त—) ज्योतिषि संयुतं ज्योतिः इव—एकाच ज्योतीमध्यें संयुक्त झालेल्या दुसऱ्या ज्योतीप्रमाणें मजमध्यें एकरूप झालेल्या आत्म्याला पहावें. ४५.

अशाप्रकारें साधकाची आत्मवृत्ति माझ्या स्वरूपांत एकरूप होऊन तो मद्रूप झाला म्हणजे मीपणाची स्फूर्तीहि अद्वैतामध्यें विरून जाते. १३ याप्रमाणें 'मी-तूं-' पणाचा भास पूर्णपणें नाहींसा झाला म्हणजे माझें परमानंद आत्मसुख अद्वैतानें भरून जातें. १४ दिव्याची एक ज्योत दुसऱ्या ज्योतीला मिळाली असतां दोहोंचें तेज जसें एकरूप होतें, तशी जीव-चैतन्याची स्फूर्ति अद्वैतसुखानें एकरूप होऊन रहाते. १५ कोट्यवधि दिव्यांत तेलवात घालून ते लाविले असतां कोटि दिवे लागले आहेत असें म्हणतात; पण त्या कोटि दिव्यांचा प्रकाश मात्र एकरूपच असतो. त्याप्रमाणें जीव अद्वैतानें चित्स्वरूप होतो. १६ देह व इंद्रियें यांच्या उपाधीमुळें जीव वेगळा भासतो. पण अद्वैतबोधानें तो केवल ब्रह्मस्वरूपच असल्याचें प्रतीतीला येतें. १७ त्यावेळीं एक परमसुखच काय तें शिल्लक रहातें. पण तसें म्हणावयासहि दुसरें कोणी नसतें. १८ ज्याप्रमाणें साखरेनेंच साखरेची चव घ्यावी, किंवा पाण्यानें पाण्यांत स्नान करावें, किंवा खमंग वास येण्यासाठीं तुपानेंच तुपांत शिरावें, त्याप्रमाणें एकटें एक सुखासह आत्मसुखच भरून रहातें. १९ याप्रमाणें माझ्या ध्यानानें साधकाला परम प्राप्ति होते. हेंच शेवटीं श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. ५२०.

—अशा समाधीपर्यंत केलेल्या ध्यानाचें फल सांगतात—

इत्थं सुतीव्रेण ध्यानेन—अशा अति तीव्र ध्यानानें, मनः युञ्जतः योगिनः— मनाला समाहित करणाऱ्या योग्याचा, द्रव्यज्ञानक्रियाभ्रमः आशु निर्वाणं संयास्यति—अधिभूत-अधिदैव-अध्यात्मरूप किंवा दृश्य-द्रष्टा-दर्शनरूप भ्रम सत्वर शांतीला प्राप्त होतो. (त्याचा द्रव्यादिभ्रम पूर्णपणें निवृत्त होतो, असा याचा भावार्थ.) ४६.

यापरी तीव्र ध्यानस्थिती । समाधिपर्यंत माझी प्राप्ती । साधकासी होय शीघ्रगती । यथानिगुतीं ध्यान करितां ॥ २१ ॥ हें माझें ध्यान उत्तमोत्तम । सर्वदा ठसावलें जैं निःसीम । तैं अधिभूत अधिदैव अध्यात्म । हा त्रिविध भ्रम उरों नेदी ॥ २२ ॥ विषयीं विषयो विषयसंभ्रम । ज्ञेय ज्ञाता ज्ञानोपक्रम । कर्म कर्ता क्रियाभ्रम । यांचें रूपनाम उरों नेदी ॥ २३ ॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । मन मंता आणि मनन । यांचें समूळ भान उच्छेदी ॥ २४ ॥ देवो देवी देवता । भज्य भजन भजता । लक्ष्य लक्षण लक्षिता । हेही कथा नुरेचि ॥ २५ ॥ तेथ योग्यतेसीं महायोगू । समाधिसुखाचा सुखभोगू । जीवशिवांचा निजसंयोगू । हाही उपयोगू उडाला ॥ २६ ॥ तेथें बोध कैंचा कैंची बोधकता । कैंची बद्धता आणि मुक्तता । ब्रह्मनाम हेही वार्ता । जाण सर्वथा बुडाली ॥ २७ ॥ सत् चित् आणि आनंद । या नांवांचा जो प्रवाद । तो मज मायावी संबंध । ऐक तोही विशद विभाग ॥ २८ ॥ असंतांचें व्यावृत्तीं । 'संत' मातें म्हणतीं श्रुती । करितां जडाची समाप्ती । 'चिन्मात्र' म्हणती मजलागीं ॥ २९ ॥ तोडितां दुःखाचा संबंधू । मातें म्हणती 'परमानंदू' । एवं सच्चिदानंद-प्रवादू । हा विपरीत बोधू विद्येचा ॥ ५३० ॥ जेथ असंतचि नाहीं । तेथ संत म्हणणें घडे कायी । समूळ अज्ञानचि जेव्हां नाहीं । तेव्हां चिन्मात्र हेंही म्हणे कोण ॥ ३१ ॥ जेव्हां दुःखाचा लेशू नाहीं । तेव्हां सुख म्हणावें कोणे ठायीं । यालागीं नामरूप मज पाहीं । ठेवितां ठायीं तुकेना ॥ ३२ ॥ समूळ उडे त्रिपुटीचें भान । या नांव गा तीव्र ध्यान । माझें करूनियां भजन । निजसमाधान पावले ॥ ३३ ॥ एवं माझेनि ध्यानप्रकारें । संसार उडे चमत्कारें । माझें केवळ स्वरूपचि उरे । निजनिर्धारें उद्धवा ॥ ३४ ॥ ते स्वरूपीं सुख ना दुःख । नाहीं संतासंताचे लेख । ज्ञानाज्ञानाची अटक । ते ठायीं देख असेना ॥ ३५ ॥ तेथ नाम रूप गुण । नाहीं मीतूंपणाची खूण । विद्याअविद्याभान । आनंदघन निजरूप ॥ ३६ ॥ भक्तिसुखाचे हेलावे । नानाउपायगौरवें । उद्धवालागीं देवें । निजानुभवें दीधले

अशाप्रकारें तीव्र ध्यानानें वर सांगितल्याप्रमाणें ध्यान केलें असतां साधकाला समाधीपर्यंत माझी प्राप्ति त्वरित होते. २१ माझें हें अतिशय उत्तम ध्यान जेव्हां सतत मनामध्यें ठसतें, तेव्हां अधिभूत, अधिदैव व अध्यात्म हा तीन प्रकारचा भेद उरत नाहीं. २२ विषयसेवन करणारा, विषय व विषयभ्रम; ज्ञेय, ज्ञाता व ज्ञानोपक्रम; कर्म, कर्ता व क्रियाभ्रम; यांचें नांव-रूपहि शिल्लक राहूं देत नाहीं. २३ तेथें ध्येय, ध्याता ध्यान; दृश्य, द्रष्टा व दर्शन; भज्य, भजन व भजन करणारा; लक्ष्य, लक्षण, लक्षिता यांची वार्ताहि रहात नाहीं. २४ जेथें योग्यतेसह महायोग; किंवा समाधिसुखाचा उपभोग; किंवा जीवा-शिवांचे परस्पर संयोग; हेहि नाहींसे होतात २६ तेथें बोध कोठचा व बोधकता कोठची ! आणि बद्धता-मुक्तता तरी कोठची ! ब्रह्म-नामाचीहि वार्ता सर्वथा नाहींशी होते. २७ सत्-चित् आनंद या नांवाचा जो उच्चार तोहि माझ्याशीं मायावीच संबंध आहे. त्याविषयींहि स्पष्टीकरण ऐक. २८ असत् म्ह० जी मिथ्या माया तिच्या अपेक्षेनें मला श्रुति सच म्हणते. जडाचें मिथ्यात्व दाखविण्यासाठीं मला चिन्मात्र म्हणतात. २९ दुःखाचा संबंध तुटतो म्हणून मला परमानंद म्हणतात. याप्रमाणें मला सच्चिदानंद हें नांव मिळालें. हा विद्येचा विपरीत बोधच म्हटला पाहिजे. ५३० जेथें असत् नाहीं तेथें सत् कोणाला बोलावयाचें ! समूळ अज्ञानच नाहींसें झाल्यावर चिन्मात्र तरी कोण म्हणणार ! ३१ दुःखाचा लेशहि नाहींसा झाल्यावर सुख कशाला म्हणावयाचें ! यास्तव मला नाम-रूप लावूं गेलें असतां तें लागत नाहीं. ३२ त्रिपुटीचें भान समूळ नाहींसें होतें. यालाच तीव्र ध्यान असें म्हणतात. माझे भक्त माझें भजन करून आत्मसुखाला प्राप्त होतात. ३३ अशा माझ्या ध्यानानें संसार मोठ्या चमत्कारानें नाहींसा होतो. उद्धवा ! आत्मस्वरूपाच्या निश्चयानें केवल माझें स्वरूपच शिल्लक रहातें. ३४ त्या स्वरूपांत सुख-दुःख नाहीं; सत्-असत् यांची गणना नाहीं; ज्ञान-अज्ञानाचा अडथळा नाहीं; ३५ तेथें नाम, रूप, गुण, 'मी-तूं-' पणाची खूण, विद्या, अविद्याभान, हें केवल आनंदघन आत्मस्वरूप असतें. ३६ याप्रमाणें

॥ ३७ ॥ ठसावल्या माझी भक्ती । सकळ सिद्धींची होय प्राप्ती । संदेह नाहीं ये अर्थी । जाण निश्चितीं ॥ उद्धवा ॥ ३८ ॥ भजनपंथें निरंतर । दोहोनि भक्तिसुखक्षीर । त्याचेंही मंथोनियां सार । उद्धवासी श्रीवर देता झाला ॥ ३९ ॥ तो हा चौदावा अध्यावो । स्वमुखें बोलिला देवो । भक्तीसी मी वश्य पहावो । येर उपावो तो गौण ॥ ५४० ॥ सकळ योगांचें योगगव्हर । वेदांत निजभांडार । सकळ सिद्धींचें परम सार । भक्ती साचार हरीची ॥ ४१ ॥ निजभाग्याची परम जोडी । महासुखाची आवडी गाढी । सकळ गोडियांची गोडी । भक्ती रोकडी हरीची ॥ ४२ ॥ भावें करितां भगवद्भजन । श्वपच जाहले पावन । जेणें भक्तीशीं विकिलें मन । त्याआधीन सदा देवो ॥ ४३ ॥ उपेक्षूनियां निजमुक्ती । एका जनार्दनीं पढिये भक्ती । त्याचेनि प्रसादें भगवत्प्राप्ती । जाहली अहोराती खेळणें ॥ ४४ ॥ तो जरी भगवत्प्राप्ती नेघे । तरी ते दाटूनि घर रिघे । ऐसे गुरुभक्तीचेनि योगें । देवो सर्वांगें भुलला ॥ ४५ ॥ भगवत्प्राप्ती पाहिजे ज्यासी । तेणें न विसंबावें मद्भक्तीसी । अखंड स्मरे जो हरिनामासी । देवो त्यापाशीं तिष्ठत ॥ ४६ ॥ सकळ भजनाचे शिरीं । रामनाम दों अक्षरीं । सदा गर्जे ज्याची वैखरी । धन्य चराचरीं तो एक ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण । इतुकें करितां नामस्मरण । पाठिमोरें होय जन्ममरण । महासिद्धी आंगण वोळंगती ॥ ५४८ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां श्रीकृष्णोद्धवसंवादे भक्तिरहस्यावधारणयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

देवानें उद्धवाला आपल्या अनुभवानें अनेक उपायांनीं युक्त असे भक्तिसुखाचे झोंके दिले. ३७ उद्धवा ! माझी भक्ति अशाप्रकारें मनांत ठसली कीं, तत्काल सर्व सिद्धींची प्राप्ती होते, यांत मुळींच संशय नाहीं, असें तूं निश्चयानें जाण. ३८ भक्तिसुखरूपी दूध भजनमार्गानें काढून, तें सतत घुसळून, त्याचें साररूपी लोणीं श्रीकृष्णानें उद्धवाला दिलें. ३९ तो हा चवदावा अध्याय श्रीकृष्णानें स्वमुखानें सांगितला. भगवान् भक्तीनें वश होतो. इतर सर्व उपाय गौण आहेत. ५४० हरीची भक्तीच खरोखर सगळ्या योगांचें सार, वेदान्ताचें भांडार, सगळ्या सिद्धींचें रहस्य आहे. ४१ हरीची एकनिष्ठ भक्ति, आत्मसुखाची परम जोड देणारी, महासुखाची अत्यंत आवड व सर्व गोडींतील गोडी आहे. ४२ श्रद्धेनें भगवद्भजन करून चांडालहि पावन झाले. ज्यानें भक्तीला मन विकलें त्याच्या अधीन देव होतो. ४३ मुक्तीची उपेक्षा करून एकनाथानें जनार्दनाची आवडीनें भक्ति केली. त्याच्या प्रसादानें भगवद्भक्ति रात्रंदिवस त्याच्या हातांतील खेळणें होऊन बसली. ४४ तो भगवत्प्राप्तीला घेत नसला तरी ती आपण होऊन त्याच्या दाराशीं येते. असा गुरुभक्तीच्या योगानें देव सर्वांगीं भुलतो. ४५ ज्याला भगवत्प्राप्ति पाहिजे असेल त्यानें माझ्या भक्तीला न विसंबता अखंड हरिनामाचें स्मरण करावें. म्हणजे देव त्याच्याजवळ तिष्ठत उभा रहातो. ४६ ज्याची वाणी सर्व भजनाहून श्रेष्ठ अशीं 'राम' हीं दोन अक्षरें सर्वदा उच्चारीत असते, तोच सर्व चराचर सृष्टींत धन्य होय. ४७ एकनाथ जनार्दनाला शरण जाऊन एवढें नामस्मरण करितांच त्याचें जन्म-मरण पळून गेलें व महासिद्धि त्याच्या अंगणांत तिष्ठत बसल्या. ५४८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील भक्तिरहस्यावधारणयोग नांवाचा चवदावा अध्याय समाप्त झाला.